NUTA BULLETIN
OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION
Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. AMT/RNP/78/2024-2026
YEAR : 50) 15th January 2025 ( No. of Pages 20 ) ( No : 02

# संगणक शास्त्र या विषयाला दिल्या जाणाऱ्या भेदभावपूर्ण वागणुकीचे निर्मूलन

**- प्रा.बी.टी.देशमुख**
*माजी विधान परिषद सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*

**१.** विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांनी आपल्यावर होणाऱ्या अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठी विधिमय मार्गाचाच वापर करावा व वाटेल त्या मार्गाचा वापर करून आपले काम करून घेण्याच्या गैरमार्गाकडे दुरुनसुद्धा न पाहता विधिमय मार्गानेच आपले प्रश्न सोडवून घेण्याच्या निर्धाराचे एक उदाहरण म्हणून संगणक शास्त्र अनुदान कृती समिती (महाराष्ट्र प्रदेश) या संघटनेच्या नेतृत्वाखाली संबंधित शिक्षकांनी मिळविलेले उत्तम यश सांगता येईल. या संगणक शास्त्र शिक्षकांवरील अन्यायाचे स्वरूप काय होते? या विषयी सर्वप्रथम माहिती देणे मला आवश्यक वाटते. महाराष्ट्रामध्ये मेडिकल, इंजीनिअरिंग व फार्मसी इत्यादी विषयांची महाविद्यालये ही विना अनुदान तत्त्वावर सुरू करण्याची व्यवस्था अस्तित्वात आली. संपूर्ण महाविद्यालयच व्यावसायिक अभ्यासक्रमाचे महाविद्यालय समजून विना अनुदान धोरणानुसार या महाविद्यालयांना परवानग्या देण्यात येत होत्या. अशा स्थितीत १०० टक्के अनुदानावर मान्यता असलेल्या विज्ञान महाविद्यालयात किंवा विज्ञान शाखेत संगणक शास्त्र हा एकटा विषय व्यावसायिक विषय आहे असे समजून उच्च शिक्षण विभागाने या एका विषयाला विना अनुदान तत्त्वावर मान्यता देण्याचे धोरण स्वीकारले. हे धोरणच या शिक्षकांच्या व्यथा निर्मितीचे कारण होते.

**२.** त्याच विज्ञान महाविद्यालयामध्ये पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र व गणित या वैकल्पिक विषयांना १०० टक्के अनुदान दिले जाणार व त्याच महाविद्यालयामध्ये संगणक शास्त्र हा विषय मात्र संपूर्णपणे विना अनुदानित विषय म्हणून चालविला जाणार. ही एकंदर व्यवस्थाच भारतीय संविधानाच्या कलम १४ च्या विरोधात होती. "The State shall not deny to any person equality before the law or the equal protection of the laws within the territory of India" अशी ही घटनेतील व्यवस्था आहे. अर्थ असा की, समान व्यक्तींना समान परिस्थितीत कायद्याने समान वागणूक दिली पाहिजे व त्याची समान रीतीने अंमलबजावणी केली पाहिजे. इथे मात्र अशा वागणुकीला तिलांजली देऊन संगणक शास्त्र या विषयाला विज्ञान महाविद्यालयांमध्ये विना अनुदान तत्वावर चालविले जाण्यासाठी एकटे पाडले जात होते. महाराष्ट्रभर निरनिराळ्या विद्यापीठांतून व महाविद्यालयांतून अनेक शिक्षक संपूर्ण विना अनुदानावर कार्यरत होते. हा अन्याय दूर करून घेण्यासाठी या शिक्षकांनी कोणकोणत्या विधिमय मार्गांचा वापर केला याबाबतची माहिती देणे मला आवश्यक वाटते.

**३.** अशा प्रकारच्या भेदभावाचे विषय हे एक एकट्या शिक्षकाने हाताळायचे विषय नसतात याची जाणीव ठेऊन या सर्व शिक्षकांनी यासाठी संघटनेची बांधणी करण्याचे ठरविले व **संगणक शास्त्र अनुदान कृती समिती (महाराष्ट्र प्रदेश)** या संघटनेची स्थापना केली. सन २००६-०७ या वर्षामध्ये कळंब येथील प्रा.संजय घुले हे अध्यक्ष, आंबेजोगाई येथील प्रा.पराग भालचंद्र हे उपाध्यक्ष व परभणी येथील प्रा.वैभव पाठक हे या संघटनेचे सचिव होते. यांच्या नेतृत्वाखाली संघटनेने आपल्या कामाला सुरुवात केली. विविध विधिमय आयुधांचा वापर केला. शासनाला निवेदन सादर करणे, शासनाच्या धोरणातील विसंगती लक्षात आणून देणे, माहितीच्या अधिकारात माहिती प्राप्त करून शासन धोरणातील विसंगती उघड करणे, इतक्या ऊपर शासन ऐकत नसेल तर उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल करणे, उच्च न्यायालयात निर्णय झाल्यानंतरसुद्धा शासन योग्य ती पावले उचलत नसेल तर विधानमंडळ सदस्यांशी संपर्क करून आपल्या व्यथा त्यांच्या लक्षात आणून देणे, जे विधानमंडळ सदस्य या कामी मन लावून मदत करतात त्यांना सर्व कागदपत्रे व युक्तिवाद पुरविणे या विधिमय मार्गांचा वापर करण्याचा सपाटा या संघटनेने लावला व अतिशय उत्तम यश या कामी मिळविले.

**४.** सन २००७ च्या वर्षभर या कृती समितीच्या वतीने वेगवेगळ्या मार्गांचा वापर करण्यात आला असे दिसून येते. सन २००७ च्या सुरुवातीला जगदंब महाविद्यालय, अचलपूर येथील प्रा.लक्ष्मीधर मुळे यांनी माझी भेट घेऊन याबाबतीत कृती समितीच्या वतीने करण्यात आलेल्या व करण्यात येत असलेल्या प्रयत्नांची मला माहिती करून दिली. विज्ञान शाखेमध्ये संगणकशास्त्र या एकाच विषयाच्या बाबतीत कसा भेदभाव केल्या जात आहे याविषयीची काही कागदपत्रेसुद्धा त्यांनी माझ्या सुपूर्त केलीत.

**५.** या कृती समितीचे एक पदाधिकारी श्री.पराग भालचंद्र यांनी सन २००७ च्या विधानमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात 'मॅजेस्टिक' आमदार निवास, मुंबई येथील माझ्या निवासस्थानी माझी भेट घेतली व कृती समितीच्या वतीने करण्यात आलेल्या व करण्यात येत असलेल्या प्रयत्नांची मला माहिती करून दिली. त्यांच्याशी झालेल्या या चर्चेमध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या मा.नागपूर खंडपीठासमोर याचिका दाखल करण्यात आलेली आहे अशी माहिती त्यांनी मला दिली व दुसरी गोष्ट म्हणजे त्यांच्याशी झालेल्या चर्चेमध्ये त्यांनी अनेक कागदपत्रांचे उल्लेख केलेत. उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल झालेली असेल व ती सुनावणीत असेल तर त्याबाबतीत सभागृहामध्ये कोणताही प्रश्न उपस्थित करता येत नाही असे मी त्यांना सांगितले व मी त्यांना असेही सांगितले की, तुम्ही चर्चेमध्ये नमूद केलेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रती माझ्याकडे पाठविल्यास याचिका निकाली निघाल्यानंतर सभागृहामध्ये आपल्याला हा प्रश्न उपस्थित करता येईल. वर वर पाहता हा अन्याय तीव्र असून भारतीय संविधानाच्या कलम १४ चा भंग करणारे वर्तन या प्रकरणी झालेले आहे अशी माझी खात्री पटली असून सभागृहामध्ये याबाबतीत निश्चितपणे आपल्याला न्याय मिळविता येईल असे मला वाटते. हेही मी त्यांना सांगितले.

**६.** झालेल्या चर्चेप्रमाणे प्रा.पराग भालचंद्र यांनी त्यांच्या सहकाऱ्यांशी चर्चा केली. योगायोगाचा भाग असा की, मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठापुढे सन २००७ ची याचिका क्रमांक ९९८ ही दिनांक २६ नोव्हेंबर २००७ रोजी निकाली निघाली. आता मला असे वाटते की, माझ्याशी झालेल्या चर्चेमुळे प्रा.पराग भालचंद्र हे याचिका निकाली निघण्याची वाटच पहात होते. दिनांक १७ डिसेंबर २००७ रोजी प्रा.पराग भालचंद्र यांनी मला पत्र पाठवून नागपूर खंडपीठाच्या निर्णयाची प्रत पाठविली व त्यासोबतच आमच्या पूर्वीच्या चर्चेमध्ये उल्लेख झालेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रती व्यवस्थित लावून पृष्ठ क्रमांक व अनुक्रमणिकेसह माझ्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठविल्या. मला दिलेल्या

**संगणक शास्त्र या विषयाला दिल्या जाणाऱ्या भेदभावपूर्ण वागणुकीचे निर्मूलन - विशेषांक**

दिनांक १७ डिसेंबर २००७ रोजीच्या पत्रामध्ये "तब्बल २१ वर्षे झाली तरी शासनाने याबाबत अनुदान धोरण स्पष्ट केलेले नाही. संगणक व माहिती तंत्रज्ञानाच्या युगात संगणकाचे प्रशिक्षण देणारा प्राध्यापक विवंचनेत आहे. धोरण नसतांना तब्बल ३०-४० महाविद्यालयात वेगवेगळे निकष लावून संगणकशास्त्र विषयास मंजूर केलेले आहे." असे त्यांनी त्याच्या पत्राच्या दुसऱ्या परिच्छेदामध्ये नमूद केलेले होते व शेवटी त्यांनी सांगितल्याप्रमाणे मुद्देसुद फाईल व आवश्यक ते सर्व पुरावे व उच्च न्यायालयाच्या निर्णयाची प्रत असलेले कागदपत्रं सोबत पाठविले होते. पत्राच्या शेवटी "**सदरील वैकल्पिक विषयास एकच अनुदान धोरण महाराष्ट्र स्तरावर लागू करण्यासाठी प्रयत्न करावे**" अशी विनंती केली होती. प्रा.पराग भालचंद्र यांनी दिनांक १७ डिसेंबर २००७ रोजी पाठविलेले पत्र सोबत **सहपत्र : १** म्हणून प्रसृत केलेले आहे.

**७.** याच काळामध्ये कला वाणिज्य महाविद्यालय, किरण नगर, अमरावतीचे प्राचार्य श्री.श्रीकांत देशपांडे तसेच श्रीमती नरसम्मा हिरैय्या शैक्षणिक ट्रस्टचे सचिव श्री.नानासाहेब चिमणपूरे यांनी काही प्राध्यापकांसमवेत माझ्या निवासस्थानी माझी भेट घेऊन याबाबतीत होणाऱ्या अन्यायाची तपशीलवार माहिती मला दिली. उच्च न्यायालयातील घडामोडींची व तदुपरान्त करण्यात आलेल्या पत्रव्यवहाराची कागदपत्रे सुद्धा माझ्या सुपूर्द केलीत.

**८.** संघटनेचे ज्येष्ठ पदाधिकारी प्रा.पराग भालचंद्र यांनी दिनांक २२ मे २००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळविण्या करिता उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे केलेल्या अर्जानुसार निरनिराळ्या दहा मुद्यांची माहिती शासनाकडून प्राप्त करण्यासाठी अर्ज केला होता. शासननिर्णयातील विसंगती उघडकीस आणण्यासाठी या अर्जाच्या उत्तरातून मिळणारी माहिती खुपच उपयुक्त ठरणार होती. हा अर्ज सोबत **सहपत्र : २** म्हणून प्रसृत केलेला आहे.

**९.** प्रा.पराग भालचंद्र यांनी माहिती अधिकारामध्ये जी माहिती मागितली त्याला शासनाने दिनांक ३० जून २००७ रोजी उत्तर दिलेले होते. दिलेले उत्तर वर वर पाहता तांत्रिक स्वरूपाचे होते. उदाहरणार्थ, प्रा.पराग भालचंद्र यांनी माहिती मागविलेला ९ वा मुद्दा पुढीलप्रमाणे होता :- " शासन पूरकपत्र दि. २४.०९.९१ (क्र. एनजीसी-१०९१/(३५६७)/विशि-२) नुसार संगणकशास्त्र विषयास कायम विनाअनुदान तत्त्वावर मंजुरी देण्यात येते अशा प्रकारे मंजुरी घेण्यात आलेल्या मंत्रीमंडळाच्या ठरावाची, उच्च शिक्षणमंत्र्यांच्या बैठकीच्या ठरावाची, धोरणात्मक निर्णयाची (Policy Decision) सत्यप्रत उपलब्ध करून देणे." **या मुद्याला शासनाचे वतीने देण्यात आलेले उत्तर हे पुढीलप्रमाणे होते :-** "शासन पूरक पत्र दि. २४.०९.१९९१ शिवाय याप्रकरणी कोणताही मंत्रिमंडळ ठराव, उच्च शिक्षणमंत्र्यांच्या बैठकींचा ठराव, धोरणात्मक निर्णय झालेला नाही त्यामुळे त्यांची प्रत देता येत नाही."

म्हणजे काय मौज आहे पहा. महाविद्यालय १०० टक्के अनुदानावर असतांना त्या महाविद्यालयातील फक्त संगणकशास्त्र विषयाला मात्र अनुदान द्यायचे नाही असा भारतीय संविधानाच्या कलम १४ चा भंग करणारा धोरणात्मक निर्णय मंत्रीमंडळाने घेतला नव्हता, खात्याच्या मंत्र्यांनी घेतला नव्हता, उच्च शिक्षणमंत्र्यांच्या बैठकीत सुद्धा असा निर्णय झालेला नव्हता. धोरणात्मक निर्णयच झालेला नव्हता. त्यामुळे बिचारे उच्च शिक्षण विभागातील अधिकारी त्या निर्णयाची प्रत उपलब्ध करून देऊ शकत नव्हते. मात्र त्या निर्णयाची धुमधडाक्यात अंमलबजावणी करण्यात तेच अधिकारी आपली शक्ती खर्च करीत होते.

**१०.** प्रा.पराग भालचंद्र यांनी माहिती मागविलेला १० वा मुद्दा पुढीलप्रमाणे होता :-

"पदवीस्तरावरील (B.Sc.) वैकल्पिक संगणकशास्त्र विषयास अनुदान नाकारणाऱ्या/ना मंजूर करणाऱ्या आदेशांच्या प्रती उपलब्ध करून देणे."

त्याला शासनातर्फे देण्यात आलेले उत्तर हे पुढीलप्रमाणे होते :-

"शासन पूरक पत्र दि. २४.०९.१९९१ सोडून अशा स्वरूपाचे कोणतेही आदेश अस्तित्वात नाहीत. त्यामुळे ते देता येत नाहीत."

मंत्रीमंडळाचा निर्णय नसतांना, याबाबत कोणताही शासननिर्णय अस्तित्वात नसतांना अधिकाऱ्यांनीच काढलेल्या एका पुरक पत्राच्या आधारावर संविधानातील तरतुदींशी विसंगत असे धोरणात्मक वर्तन उच्च शिक्षण विभागातील अधिकारी उत्साहात करीत होते. ही आश्चर्यकारक गोष्ट असली तरी चिवटपणाने या शिक्षकांनी दिलेल्या लढ्यामुळे ते वर्तन आता इतिहास जमा झालेले आहे. प्रा.पराग भालचंद्र यांनी उपस्थित केलेले मुद्दे व त्याला देण्यात आलेली उत्तरे यांचा अभ्यास हा एक उत्तम मनोरंजनाचा विषय होईल म्हणून शासनाचे दिनांक ३० जून २००७ रोजीचे उत्तर **सहपत्र : ३** म्हणून सोबत प्रसृत केलेले आहे.

**११.** दरम्यानच्या काळामध्ये दिनांक २६ नोव्हेंबर २००७ रोजी मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर केलेली याचिका (W.P.No. 998 of 2007) निकाली निघाली होती. या याचिकेमध्ये याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी

*सहपत्र १ : परिच्छेद ६ पहा*

**दिनांक : १७.१२.२००७**

**आदरणीय आ.बी.टी.देशमुख सर,**

नमस्कार,

**पावसाळी अधिवेशन २००७ च्या दरम्यान आपल्या आमदार निवासातील खोलीमध्ये झालेल्या चर्चेनुसार पदवीस्तरावरील संगणकशास्त्र या वैकल्पिक विषयाबाबत उच्चशिक्षण खात्याने चालविलेल्या मनमानी धोरणाबाबतचे सर्वस्पष्ट निवेदन सोबत पाठवित आहे.** मध्यंतरी याबाबत उच्च न्यायालय, खंडपीठ **नागपूर येथे प्रलंबित असणाऱ्या याचिकेमुळे आपण थांबवण्यास सांगितले होते. या याचिकेच्या निकालाची प्रत ही सोबत पाठवित आहे.**

संगणक व माहिती तंत्रज्ञानाच्या युगात संगणकाचे प्रशिक्षण देणारा प्राध्यापक विवंचनेत आहे. तब्बल २१ वर्षे झाली तरी शासनाचे याबाबत अनुदान धोरण स्पष्ट केलेले नाही. धोरण नसतांना तब्बल ३०-४० महाविद्यालयात वेगवेगळे निकष लावून संगणकशास्त्र विषयास मंजूर केलेले आहे. सद्यःस्थितीत शासनाकडे फक्त चारओळी असणारे एक पूरकपत्र असून त्यामध्ये या विषयाच्या कायम विना अनुदान धोरणाबाबत उल्लेख आलेला आहे.

हे एक पत्र असून अधिकृत शासन निर्णय नसल्याचा पुरावा आम्ही माहिती अधिकारात उपलब्ध केलेला आहे. पदवीस्तरावरील संगणकशास्त्र हा विषय मुळात विज्ञान शाखेचा भाग आहे. महाराष्ट्रात विज्ञानशाखा पूर्णतः अनुदानित असतांना या विषयाला विनाअनुदान तत्वावर कसे ठेवता येईल? सद्यःस्थितीत शासनाचे धोरण विद्याशाखांना अनुदान देण्याचे आहे. मग असा भेदभाव का? आपल्याकडून खालील अपेक्षांची पूर्ती होणे प्रार्थनीय आहे.

(१) शासन निर्णय नसतांना, या विषयाला अनुदानापासून वंचित का ठेवले? याबाबत स्पष्टीकरण मागणे.

(२) महाराष्ट्र स्तरावर एकच सर्वंकष धोरण लागू करण्यासाठी प्रयत्न करणे.

(३) एकाच महाविद्यालयातील, एकाच अभ्यासक्रमासाठी कार्यरत असणाऱ्या प्राध्यापकांमध्ये भेदभाव कसा करता येईल? याबाबत खुलासा मागणे. (उदा. बी.एस्सी. स्तरावर विद्यार्थी तीन विषय वैकल्पिक म्हणून घेतो. जर त्याने भौतिकशास्त्र, गणित व संगणकशास्त्र हे विषय घेतले तर भौतिकशास्त्र व गणित विषयासाठी कार्यरत असणाऱ्या प्राध्यापकास वेतन अनुदान मिळते तर संगणकशास्त्र विषयाच्या प्राध्यापकाला वेतन अनुदान मिळत नाही.)

(४) संगणकशास्त्र हा वैकल्पिक विषय अव्यावसायिक आहे. मग याला कायम विनाअनुदान धोरण कसे लागू करता येईल. याचा पुरावा सोबतच्या फाईलमध्ये आहे.

(५) शासनाच्या मते हा विषय व्यावसायिक आहे. एखादा विषय व्यावसायिक असतो का? माझ्या मते अभ्यासक्रम किंवा विद्याशाखा व्यावसायिक असतात. तसेच बी.एस्सी. हा अभ्यासक्रम अव्यावसायिक आहे.

पुनश्चः विनंती की, सदरील वैकल्पिक विषयास एकच अनुदान धोरण महाराष्ट्रस्तरावर लागू करण्यासाठी प्रयत्न करणे.

**आपण सांगितल्याप्रमाणे मुद्देसुद फाईल व आवश्यक ते सर्व पुरावे सोबत पाठवित आहे.** कृपया यामधील त्रुटीबद्दल मार्गदर्शन करावे. त्यानंतर या निवेदनाच्या प्रती मा.उच्च शिक्षणमंत्री व मा.प्रधान सचिव, उच्च शिक्षण विभाग यांच्याकडे पोहचत्या करून त्याचा पुरावा आपल्याकडे सादर करण्यात येईल.

धन्यवाद !

आपला विश्वासू

**प्रा.पराग भालचंद्र**

(संगणक अनुदान कृती समिती)

गणेशपार, अंबाजोगाई, जि.बीड

फोन नं. ०२४४६-२४७५६५ मोबा.९४२२२४०३०१

प्रा.संजय घुले, प्रा.रेवते, प्रा.मूळजकर, प्रा.पाठक, प्रा.निसार, प्रा.पत्की, प्रा.शिंदे, प्रा.थेटे - (मराठवाडा) प्रा.सावरकर, प्रा.मुळे, प्रा.पटेल पाईक - (विदर्भ) प्रा.दिपक पाटील, प्रा.निकम - (पश्चिम महाराष्ट्र) प्रा.वैद्य, प्रा.भराटे, प्रा.शिनकर- (उत्तर महाराष्ट्र)

मा.उच्च न्यायालयासमोर "संगणकशास्त्राचे शिक्षण ही काळाची गरज असून एक्त एका विषयाला अनुदान न देण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घ्यायला नको होता. शासननिर्णयातील हा भाग रद्दबातल करण्यात यावा" अशी बाजू मांडली त्याविषयीचा मा.उच्च न्यायालयाच्या निकालपत्रामध्ये उल्लेख आहे - तो पुढीलप्रमाणे :-

"If the Institution/College/Society fulfills other criteria and procedure applicable in this regard. It is contended that the subject of computer science being the need of the hour, the State Government ought not to have taken a policy decision to grant such faculty only on no grant basis and, therefore, the said Government Resolution to that extent be held to be bad in law."

**१२.** याबाबतीत शासनाच्या अधिवक्त्यांनी असे म्हणणे मांडले की, या विषयाला कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता देण्याचा राज्यशासनाचा हा धोरणात्मक निर्णय असून याबाबतीत मा.उच्च न्यायालयाने कोणताही हस्तक्षेप न करणे हे केव्हाही उचित होईल. शासकीय अधिवक्त्यांनी मांडलेल्या या मताची नोंदसुद्धा उच्च न्यायालयाच्या निकालपत्रामध्ये पुढील शब्दात करण्यात आलेली आहे. :-

"It is the policy decision of the State Government to grant permission to start the above referred subject at the graduation level on permanent no grant basis and, therefore, it is prayed that this Court may not show any indulgence particularly when the decision reflected in the Government Resolution is the policy decision of the State Government."

**१३.** शेवटी मा.उच्च न्यायालयाने पुढीलप्रमाणे निर्णय दिला:- "However, if State Government has granted permission to some of the Colleges/Institutions to start the above referred subject on no grant basis, in that case, we permit the petitioners to make a representation in this regard to the State Government within a period of four weeks from today and if such representation is made, the State Government is directed to take a decision on its own merits according to law and procedure applicable in this regard within a period of eight weeks from the date of receipt of such representation." मा.उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे या एकूणच उठावाला चांगलेच बळ मिळाले होते.

**(i)** काही महाविद्यालयात No Grant Basis या तत्त्वावर मान्यता दिली असली तर याचिकाकर्त्यांनी चार आठवड्याच्या आत याबाबतीत शासनाकडे निवेदन सादर करावे.

**(ii)** असे निवेदन सादर करण्यात आल्यापासून आठ आठवड्याच्या आत शासनाने त्यावर कायद्याला धरून निर्णय घ्यावा असे स्पष्ट आदेश या प्रकरणी न्यायालयाने दिले. हे मुदतबंद आदेश असल्यामुळे चार आठवड्याच्या आत निवेदनाद्वारे भेदभाव लक्षात आणून देण्याची जबाबदारी ही आता याचिकाकर्त्यांवर येऊन पडली व असे निवेदन सादर झाल्यापासून आठ आठवड्याच्या आत त्या निवेदनावर कायद्यानुसार निर्णय घेण्याची जबाबदारी ही शासनावर निश्चित करण्यात आली होती. ही मोठी उपलब्धी होती. मा.उच्च न्यायालयाचा हा दिनांक २६ नोव्हेंबर २००७ रोजीचा निर्णय सोबत **सहपत्र : ४** म्हणून प्रसृत

### *सहपत्र २ : परिच्छेद ८ पहा*

(भाग चार-ब) महाराष्ट्र शासन राजपत्र, अ.सा. नोव्हेंबर १८, २००५/कार्तिक - २७

**जोडपत्र - अ (पहा नियम ३)**

माहितीचा अधिनियम, २००५ अन्वये माहिती मिळविण्याकरिता
अर्जाचा नमूना

प्रति,

राज्य जन माहिती अधिकारी (कार्यालयाचे नाव व पत्ता) : मा.माहिती अधिकारी/अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, विस्तार भवन मंत्रालय, मुंबई

(१) अर्जदाराचे संपूर्ण नांव : प्रा.पराग भालचंद्र

(२) पत्ता : द्वारा - डॉ.उपेंद्र भालचंद्र, गणेशपार, भटगल्ली, अंबाजोगाई, जि.बीड-४३१५१७ फोन : ०२४४६-२४७५६५ / ९४२२२४०३०१ ई-मेल : pub1976@rediffmail.com

(३) हव्या असलेल्या माहितीचा तपशील

(एक) माहितीचा विषय : पदवीस्तरावरील (१०+२+३) विज्ञान महाविद्यालयातील वैकल्पिक विषयाबाबत माहिती.

(दोन) ज्या कालावधी संबंधात माहिती हवी असेल तो कालावधी : इ.स. १९८० ते इ.स. २००७

(तीन) हव्या असलेल्या माहितीचे वर्णन : (१) १००% अनुदानित विज्ञान महाविद्यालयाची व्याख्या स्पष्ट करावी व उपलब्ध करून द्यावी.

(२) विज्ञान महाविद्यालयात शिकविल्या जाणाऱ्या पदार्थ विज्ञान (Physics) या मान्यताप्राप्त वैकल्पिक विषयास अनुदान मंजूर करावे असा स्पष्ट निर्देश असणारे शासन परिपत्रक, निर्णय, मंत्रीमंडळ ठराव उपलब्ध करून द्यावे.

(३) विज्ञान महाविद्यालयात शिकविल्या जाणाऱ्या रसायनशास्त्र (Chemistry) या मान्यताप्राप्त वैकल्पिक विषयास अनुदान मंजूर करावे असा स्पष्ट निर्देश असणारे शासन परिपत्रक, निर्णय, मंत्रीमंडळ ठराव उपलब्ध करून द्यावे.

(४) विज्ञान महाविद्यालयात शिकविल्या जाणाऱ्या गणितशास्त्र (Mathematics) या मान्यताप्राप्त वैकल्पिक विषयास अनुदान मंजूर करावे असा स्पष्ट निर्देश असणारे शासन परिपत्रक, निर्णय, मंत्रीमंडळ ठराव उपलब्ध करून द्यावे.

(५) शासनाच्या सध्याच्या धोरणानुसार विज्ञान विद्याशाखेला अनुदान देण्याचे धोरण स्वीकारलेले आहे? किवा अभ्यासक्रम, विषयांना अनुदान देण्याची धोरण स्वीकारलेले आहे? याची माहिती उपलब्ध करून देणे.

(६) शासनाच्या सध्याच्या धोरणानुसार विज्ञान विद्याशाखेला कायम विनाअनुदान तत्वावर मंजुरी देण्याचे अवलंबिलेले आहे. अशा प्रकारे मंजुरी देणारा शासननिर्णय, परिपत्रक, मंत्रीमंडळ ठराव उपलब्ध करून देणे. अशा प्रकारे मंजुरी केव्हापासून देण्यात येते?

(७) विज्ञान विद्याशाखेतील एखाद्या मान्यताप्राप्त वैकल्पिक अभ्यासक्रमाला अनुदान देण्यासाठी ग्राह्य धरण्यात येणाऱ्या निकषांच्या व अटींची माहिती उपलब्ध करून देणे.

(८) शासन पूरकपत्र दि. २४.०९.९१ (क्र. एनजीसी-१०९१/(३५६७)/विशी-२) नुसार संगणकशास्त्र विषयास कायम विनाअनुदान तत्वावर मंजुरी देण्यात येते अशा प्रकारे मंजुरी देण्यासाठी ग्राह्य धरण्यात आलेल्या निकषांची, बाबींची माहिती उपलब्ध करून देणे.

(९) शासन पूरकपत्र दि. २४.०९.९१ (क्र. एनजीसी-१०९१/(३५६७)/विशि-२) नुसार संगणकशास्त्र विषयास कायम विनाअनुदान तत्वावर मंजुरी देण्यात येते अशा प्रकारे मंजुरी घेण्यात आलेल्या मंत्रीमंडळाच्या ठरावाची, उच्च शिक्षणमंत्र्यांच्या बैठकीच्या ठरावाची, धोरणात्मक निर्णयाची (Policy Decision) सत्यप्रत उपलब्ध करून देणे.

(१०) पदवीस्तरावरील (B.Sc.) वैकल्पिक संगणकशास्त्र विषयास अनुदान नाकारणाऱ्या/ना मंजूर करणाऱ्या आदेशांच्या प्रती उपलब्ध करून देणे.

(चार) माहिती टपालाद्वारे हवी की व्यक्तिश :

हवी आहे (प्रत्यक्ष टपाल खर्च अतिरिक्त फी मध्ये समाविष्ट करण्यात येईल) :

(नोंदणीकृत) रजिस्टर टपालाद्वारे हवी आहे. त्यासाठी किती खर्च येईल तो कळवावा म्हणजे नियमाप्रमाणे आपल्या कार्यालयात जमा करता येईल.

(पाच) टपालाद्वारे हवी असल्यास (सर्व साधारण नोंदणीकृत किंवा शिघ्र) : नोंदणीकृत (रजि. टपालाद्वारे)

(४) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे किंवा कसे (असल्यास त्याबाबतच्या पुराव्याच्या छायांकित प्रत जोडावी) : नाही.

**(५)** किती कालावधीत माहिती हवी आहे : १० दिवस

**ठिकाणी :** अंबाजोगाई

**दिनांक :** २२.०५.२००७

अर्जदाराची सही

**प्रा.पराग उपेंद्र भालचंद्र**

केलेला आहे.

**१४.** मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे याचिकाकर्त्यांना चार आठवड्याच्या आत भेदभावपूर्ण वागणूक दर्शविणारे निवेदन शासनाला सादर करावयाचे होते. ही जबाबदारी मुख्य याचिकाकर्त्यांवरच होती. नागपूर खंडपीठासमोर याचिकेमधील मुख्य याचिकाकर्ते एक म्हणजे श्री.सु.वा.चिमणपुरे,सचिव, श्रीमती नरसम्मा हिरैय्या शैक्षणिक ट्रस्ट, अमरावती व दुसरे म्हणजे श्री.श्रीकांत देशपांडे, प्राचार्य, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किरण नगर, अमरावती हे होते. या दोन पदाधिकाऱ्यांनी आपली. जबाबदारी यथोचितरीत्या पार पाडली असे दिसून येते. दिनांक १९ डिसेंबर २००७ रोजी या उभय याचिकाकर्त्यांनी एक तपशीलवार निवेदन प्रधान सचिव, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर केले. संगणकावर टंकलिखित केलेले हे निवेदन अकरा पृष्ठांचे असून त्यामध्ये संगणकशास्त्र या विषयाला वेगवेगळ्या ठिकाणी राज्यभर कशी भेदभावपूर्ण वागणूक दिली जात आहे हे सोदाहरण नमूद केलेले होते. या निवेदनाचे वैशिष्ट असे की, ते काळजीपूर्वक पाहिले तर, राज्यभरातील कृती समितीचे सर्व पदाधिकारी एकमेकांच्या संपर्कात होते असे स्पष्टपणे दिसून येते. कारण या निवेदनामध्ये प्रतिपादन करतांना प्रा.पराग भालचंद्र यांनी माहितीच्या अधिकारामध्ये यापूर्वी प्राप्त करून घेतलेल्या माहितीचा उल्लेख बऱ्याच मुद्यांमध्ये आहे असे दिसून येते. या निवेदनामध्ये भेदभावपूर्ण वागणुकीचे निरनिराळे २३ मुद्दे शासनाकडे सादर करण्यात आले होते ते २३ मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत :-

**मुद्दा क्रमांक १ :** काही महाविद्यालयांमध्ये संगणकशास्त्र ह्या विज्ञान विद्याशाखेतील ऐच्छिक विषयाला अनुदान प्राप्त आहे. ही महाविद्यालये (विभागवार) खालीलप्रमाणे आहेत. *(पुढे अशा महाविद्यालयांची यादी दिलेली होती.)*

**मुद्दा क्रमांक २ :** संगणकशास्त्र या विषयासाठीच्या परवानग्या निरनिराळ्या पाच प्रकारच्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे :- (१) अनुदानित (२) विनाअनुदानित (३) कायम विनाअनुदानित (४) पूवी. घालून दिलेल्या अटीनूसार (५) नवीन शिक्षकवर्ग नेमावा लागत नसेल तरच विषय सुरू करावा.

**मुद्दा क्रमांक ३ :** महाविद्यालयाचे नाव नमूद करून, "पूर्वोदाहरण न समजण्याच्या अटीवर सध्या संगणकशास्त्र या विषयासाठी विद्यापीठ मान्यता प्राप्त कार्यरत असलेल्या फक्त एका शिक्षक पदासाठी देय असलेले अनुदान मंजूर करण्याबाबत संचालकांना आदेश दिलेले आहेत."

**मुद्दा क्रमांक ४ :** महाविद्यालयाचे नाव नमूद करून, "संपूर्ण विज्ञान विद्याशाखेसह संगणकशास्त्र ह्या विषयाला सुद्धा अनुदान निरंतर देय आहे. दोन अधिव्याख्यात्यांचे मासिक वेतन अनुदान रुपये २७१५८/- निरंतर देण्यात येत आहे."

**मुद्दा क्रमांक ५ :** महाविद्यालयाचे नाव नमूद करून, "संपूर्ण विज्ञान विद्याशाखेसह संगणकशास्त्र ह्या विषयाला सुद्धा अनुदान निरंतर देय आहे."

**मुद्दा क्रमांक ६ :** महाविद्यालयाचे नाव नमूद करून "संपूर्ण विज्ञान विद्याशाखेसह संगणकशास्त्र ह्या विषयाला सुद्धा अनुदान निरंतर देय, आहे."

**मुद्दा क्रमांक ७ :** महाविद्यालयाचे नाव नमूद करून, "जून १९९८ पासून संगणकशास्त्र या विषयाची सुरुवात विज्ञान विद्याशाखेसोबत विनाअनुदान तत्वावर झालेली आहे. २००२-०३ मध्ये १००% अनुदान प्राप्त आहे संगणकशास्त्र ह्या विषयाला सुद्धा या कालावधीपासून निरंतर अनुदान प्राप्त आहे."

**मुद्दा क्रमांक ८ :** महाविद्यालयाचे नाव नमूद करून, "ह्या महाविद्यालयाला विनाअनुदान तत्वावर परवानगी देऊन दि. २४.०९.१९९१ नंतर वार्षिक सुमारे ९,८६,९८८ रु. इतके अनुदान दिले जाते. अशी अमरावती विभागात ८ महाविद्यालये आहेत. *(पुढे अशा महाविद्यालयांची यादी दिलेली होती.)*

**मुद्दा क्रमांक ९ :** महाविद्यालयाचे नाव नमूद करून, "नवीन शिक्षकवर्ग नेमावा लागत नसेल तरच प्रत्यक्षात नवीन विषय सुरू करावा" ह्या अटीवर मान्यता देण्यात आलेली आहे. परंतु नंतरच्या काळात ही अट रद्द केलेली आहे

**मुद्दा क्रमांक १० :** महाविद्यालयाचे नाव नमूद करून, "सुरुवात करतानाचे ह्या अभ्यासक्रमाचे अनुदानाचे स्वरूप - कायम विनाअनुदानित - सदर महाविद्यालयास २०००-२००१ पासून तीन प्राध्यापकांसाठी मासिक वेतन रुपये ७२८७७/- निरंतर देण्यात येत आहे."

**मुद्दा क्रमांक ११ :** महाविद्यालयाचे नाव नमूद करून, "विद्यार्थ्यांचे आंदोलन होऊ नये म्हणून संचालनालयाने दि. २२.०९.२००३ रोजी या महाविद्यालयास मागील थकबाकी देता येणार नाही या अटीच्या अधीन राहून संगणकशास्त्र या विषयास सन २००३-२००४ पासून अनुदान देण्यात आले."

**मुद्दा क्रमांक १२ :** प्रा.पराग भालचंद्र यांनी माहितीच्या अधिकारात मिळविलेल्या माहितीच्या आधारावर "संगणकशास्त्र ह्या ऐच्छिक विषयाच्या अनुदाना संदर्भात दि. २४.९.९१ च्या परिपत्रकाप्रमाणे ह्या विषयास १९८५ ते आजतागायतच्या काळात फक्त आणि फक्त कायम विनाअनुदान तत्त्वावरच मान्यता देतो."

**मुद्दा क्रमांक १३ :** संगणकशास्त्र विषयास पूर्ण अनुदानित समजावे असा आदेश नसल्यामुळे या विषयाला अनुदान देता येत नाही अशी शासनाची भूमिका आहे. परंतु संगणकशास्त्र विषयास अनुदान देऊ नये असे कोठेही लिहिलेले नाही. तसेच कोणत्याही विषयाला स्वतंत्ररित्या अनुदानित समजावे असा स्वतंत्र शासननिर्णय शासन काढत नसते.

**मुद्दा क्रमांक १४ :** ईलेक्ट्रॉनिक्स विषयासाठी कायम विनाअनुदान धोरण स्वीकारलेले आहे. परंतु असा आदेश शासनाने एका स्वतंत्र शासननिर्णयाने श्री.पराग भालचंद्र यांचा माहितीचा अधिकार अर्ज दि. २२.०५.०७ व त्याला शासनाने दिलेले उत्तरान्वये कळविले आहे.

**मुद्दा क्रमांक १५ :** दिनांक ४ जानेवारी १९८९, ८ ऑगस्ट १९९१ व दि. २४.९.९१ चे पूरकपत्र हे अशासकीय महाविद्यालयांसाठी आहे. असे असतांना सुद्धा शासकीय विज्ञान संस्था नागपूर (Institute of Science, Nagpur), शासकीय विज्ञान महाविद्यालय औरंगाबाद, अमरावती, मुंबई येथे या विषयासाठी अनुदान मिळत नाही.

*सहपत्र ३ : परिच्छेद १० पहा*

***महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्रशिक्षण विभाग***

क्रमांक : माअधि २००७/(१७२/०७)/मशि-३

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२

**दिनांक : ३० जून, २००७**

प्रति,

प्रा.पराग उपेंद्र भालचंद्र

द्वारा - डॉ.उपेंद्र भालचंद्र,

गणेशपार, भटगल्ली, अंबाजोगाई, जि.बीड-४३१५१७

**विषय** : माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती - पदवी स्तरावरील विज्ञान महाविद्यालयातील वैकल्पिक विषयाबाबत माहिती.

महोदय,

आपण महाराष्ट्र माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये आपल्या दि. २२.०५.२००७ च्या पत्रान्वये शासनाकडे अर्ज केला आहे. आपण मागितलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

(१) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे १००% वेतन शासन अदा करते तसेच त्यानुषंगाने निवृत्ती वेतन वैद्यकीय सवलत इत्यादी शासनाकडून देण्यात येते.

(२), (३) व (४) अशा प्रकारच्या विशिष्ट विषयासाठींचे शासन परिपत्रक, निर्णय, मंत्रिमंडळ ठराव अस्तित्वात नाहीत. त्यामुळे ते देता येत नाहीत.

(५) व (६) शासनाचे सध्याचे धोरण कायम विना अनुदान तत्वावर परवानगी देण्याचे आहे. याबाबतच्या दि. २२ मे, २००१ च्या परिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे.

(७) विज्ञान शाखेतील वैकल्पिक विषयास पूर्वीच्या अनुदानाच्या धोरणानुसार अनुदान देण्यासाठी ग्राह्य धरण्यात येण्याच्या अटींमध्ये पुरेसा कार्यभार असणे, मागासवर्गीय आरक्षण, शैक्षणिक पात्रता, विद्यापीठाने अध्यापकास मान्यता दिलेली असावी इत्यादी यांचा समावेश होतो.

(८) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम ८२(५) नुसार विद्यापीठाने शिफारस केलेल्या, न केलेल्या प्रस्तावावर शासन निर्णय घेते. याशिवाय कोणतेही निकष विहित केलेले नाही.

(९) शासन पूरक पत्र दि. २४.०९.१९९१ शिवाय याप्रकरणी कोणताही मंत्रिमंडळ ठराव, उच्च शिक्षणमंत्र्यांच्या बैठकींचा ठराव, धोरणात्मक निर्णय झालेला नाही त्यामुळे त्यांची प्रत देता येत नाही.

(१०) शासन पूरक पत्र दि. २४.०९.१९९१ सोडून अशा स्वरुपाचे कोणतेही आदेश अस्तित्वात नाहीत. त्यामुळे ते देता येत नाहीत.

आपला विश्वासू,

**(वि.वा.सुतार)**

**प्रत** : शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अर्जदारास मुद्दा क्र. १ ची माहिती उपलब्ध करून द्यावी.

**मुद्दा क्रमांक १६ :** महाविद्यालयाचे नाव नमूद करून, "संगणकशास्त्र विषयासाठी नवीन शिक्षकवर्ग नेमावा लागत नसेल तरच नवीन विषय सुरू करावा"

**मुद्दा क्रमांक १७ :** महाविद्यालयाचे नाव नमूद करून, "या विषयाचा शिक्षकवर्ग नेमावा लागत नसेल तरच नवीन विषय सुरू करावा" अशी परवानगी मिळालेली आहे.

**मुद्दा क्रमांक १८ :** महाविद्यालयाचे नाव नमूद करून, तीन वर्षाच्या संघर्षामुळे (शारीरिक, मानसिक, आर्थिक) या एका विषयास ८.६.२००० च्या आदेशान्वये अनुदान मंजूर झाले. पूर्वी हा विषय सुरू करणारी अनेक महाविद्यालये असतांनासुद्धा फक्त काही महाविद्यालयांनाच अनुदान मिळत आहे.

**मुद्दा क्रमांक १९ :** स्वा.रा.ती.मराठवाडा विद्यापीठ नांदेड ची स्थापना १९९४ नंतरची आहे. या विद्यापीठाअंतर्गत चालणाऱ्या अनेक महाविद्यालयांना १९९६, १९९८, २००० साली संगणकशास्त्र विषयास अनुदान दिलेले आहे.

**मुद्दा क्रमांक २० :** भारतीय राज्यघटनेमधील कलम १४ आहे. ह्या ठिकाणी भारतीय राज्यघटनेच्या तत्त्वाला छेद गेलेला आहे. संपूर्ण महाराष्ट्रात १९८५ ते आजपर्यंतच्या काळात अनेक महाविद्यालयांमध्ये संगणकशास्त्र ह्या विषयाला अनुदान प्राप्त आहे.

**मुद्दा क्रमांक २१ :** आधीच्या सर्व अव्यावसायिक महाविद्यालयात विज्ञानशाखा १००% अनुदानित आहे. त्यातील अनेक महाविद्यालयांमध्ये विज्ञान शाखेअंतर्गत संगणकशास्त्र हा वैकल्पिक विषय मात्र कायम विनाअनुदानित आहे व काही ठिकाणी अनुदानित आहे असे हे धोरण विसंगतीपूर्ण आहे.

**मुद्दा क्रमांक २२ :** समान परिस्थितीत समान न्याय या भारतीय राज्यघटनेच्या कलम १४ चे हे सरळ सरळ उल्लंघन आहे. स्वतःच घेतलेल्या निर्णयाची बूज स्वतः न राखणे व याचिकाकर्त्यांनी निर्णयाचे भान ठेवले नाही असे म्हणणे हे शासनाचे या संदर्भातील विसंगत धोरण स्पष्ट करते.

**मुद्दा क्रमांक २३ :** शासनाच्या दृष्टीने हा विषय व्यावसायिक समजण्यात आलेला नाही. माहितीच्या अधिकारात शासनाला याबद्दल विचारणा केली असता या विषयाला व्यावसायिक समजणारा शासन ठराव वा निर्णय अस्तित्वात नाही असे उत्तर देण्यात आलेले आहे. (श्री.पराग भालचंद्र यांचा माहितीचा अधिकार अर्ज दि. २८.११.०६)

**१५.** शासनाकडे याचिकाकर्त्यांचे उपरोक्त निवेदन पोहचल्यावर आठ आठवड्याच्या आत शासनाने त्यावर निर्णय घ्यावा असे मा.उच्च न्यायालयाच्या आदेशात नमूद होते. त्याप्रमाणे दिनांक ६ फेब्रुवारी २००८ रोजीच्या पत्रान्वये उच्च व तंत्रशिक्षण विभागाने निवेदनकर्त्या याचिकाकर्त्यांना उत्तर पाठविले.

**(i) अद्ययावत स्थितीदर्शक निवेदन :** शासनाकडून ज्यावेळेला अशा निवेदनाचे उत्तर दिले जाते त्यावेळेला ते निवेदन याविषयीच्या अद्ययावत स्थितीवर भाष्य करणारे असावे असे अपेक्षित असते. अद्ययावत निवेदनाचा अर्थ असा आहे की, प्राप्त परिस्थितीमध्ये उद्भवलेले अद्ययावत प्रश्न विचारात घेऊन राज्यमंत्रीमंडळाच्या किंवा खात्याच्या मंत्र्यांच्या स्तरावर निर्णय झाल्यानंतरची स्थिती सांगणारे ते असावे. त्याला अद्ययावत स्थितीदर्शक निवेदन म्हणता येईल.

**(ii) सद्यस्थिती दर्शक निवेदन :** मंत्रीमंडळाला किंवा खात्याच्या मंत्र्यांना अद्ययावत स्थिती लक्षात घेऊन निर्णय घेण्यासाठी वेळ नसेल किंवा अन्य कोणत्याही कारणाने असा निर्णय होऊ शकला नसेल तर मग संबंधित विषयाबाबत जी काही स्थिती त्यावेळेला अस्तित्वात असेल मग ती भेदभावपूर्ण असो, न्यायकारक असो, अन्यायकारक असो, जी काय असेल ती, काहीतरी स्थिती

*सहपत्र ४ : परिच्छेद १३ (ii) पहा*

**IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY : NAGPUR BENCH : NAGPUR**

**WRIT PETITION NO.998 OF 2007**

*(Smt. Narsamma Hiraiyya Educational Trust and another vs. State and others)*

**CORAM : D.D. SINHA AND SMT. VASANTI A. NAIK, JJ.**

DATED : NOVEMBER 26, 2007

Heard Shri Parchure, learned Counsel for the petitioners, and Shri Sambre, learned Government Pleader for the respondents.

In the present petition, the grievance of the petitioners is in respect of part of Government Resolution dated 24.9.1991, which is annexed as Annexure V to the petition.

Shri Parchure, learned Counsel for the petitioners, states that in para (2) of the above referred Government Resolution, it is mentioned that the subject of computer science/engineering and other concerned subjects at the graduation level for science and commerce faculties are permitted only on permanent no grant basis, **if the Institution/College/Society fulfills other criteria and procedure applicable in this regard. It is contended that the subject of computer science being the need of the hour, the State Government ought not to have taken a policy decision to grant such faculty only on no grant basis and, therefore, the said Government Resolution to that extent be held to be bad in law.**

Shri Sambre, learned Government Pleader for the respondents, after obtaining necessary instructions from the competent authority has made a categorical statement that **it is the policy decision of the State Government to grant permission to start the above referred subject at the graduation level on permanent no grant basis and, therefore, it is prayed that this Court may not show any indulgence particularly when the decision reflected in the Government Resolution is the policy decision of the State Government.**

At this stage, Shri Parchure, learned Counsel for the petitioners, states that State Government after issuance of Government Resolution dated 24.9.1991 has granted permission to start subject of computer science at graduation level to some Colleges/Institutions on no grant basis and in due course of time, as per policy of the State Government, the said subject would be admitted to grant-in-aid. It is contended that State Government has given discriminatory treatment to the petitioners and, therefore, appropriate direction in this regard may be issued.

In the backdrop of the above referred facts, so far as policy decision of the State Government to grant permission to start subject of computer science/engineering at the graduation level on permanent no grant basis is concerned, it is difficult for us to show indulgence. **However, if State Government has granted permission to some of the Colleges/Institutions to start the above referred subject on no grant basis, in that case, we permit the petitioners to make a representation in this regard to the State Government within a period of four weeks from today and if such representation is made, the State Government is directed to take a decision on its own merits according to law and procedure applicable in this regard within a period of eight weeks from the date of receipt of such representation.**

With these observations and direction, the petition is disposed of.

**JUDGE** **JUDGE**

ही विभागात उपलब्ध असते. त्या स्थितीचे दर्शन घडविणारे निवेदन म्हणजे सद्यस्थिती दर्शक निवेदन म्हणता येईल. यासंदर्भात शासनाने याचिकाकर्त्यांना जे उत्तर पाठविले ते उच्च न्यायालयाचा निर्णय व याचिकाकर्त्यांचे निवेदन विचारात घेऊन पाठविलेले निवेदन होते असे मला वाटत नाही. कारण या निवेदनामध्ये केलेली महत्त्वाची विधाने लक्षात घेतली तर ते सद्यस्थिती दर्शक निवेदन होते हे कोणाच्याही लक्षात येईल.

**१६.** दिनांक ६ फेब्रुवारी २००८ रोजी उच्च शिक्षण विभागाने याचिकाकर्त्यांना जे उत्तर पाठविले त्या उत्तरातील महत्त्वपूर्ण विधाने पुढीलप्रमाणे:-

**(i)** राज्यामध्ये महाविद्यालयांतर्गत सर्व विद्याशाखांसाठी कायम विना अनुदानाचे धोरण सन २००१-०२ पासून राबविले जात आहे.

**(ii)** इलेक्ट्रॉनिक्स, शिक्षणशास्त्र, संगणकशास्त्र, अभियांत्रिकी व शारीरिक शिक्षणशास्त्र हे वैकल्पिक व व्यावसायिक स्वरूपाचे विषय प्रारंभापासून कायम विना अनुदान तत्त्वावर असतील याचा उल्लेख करावयाचा राहून गेला.

**(iii)** कायम विना अनुदानाचे धोरण असताना राज्यातील काही महाविद्यालयांना विशिष्ट परिस्थितीत विज्ञान शाखेअंतर्गत संगणकशाखेस अनुदान दिले गेले आहे.

**(iv)** स्पष्ट नियम असावेत याकरिता निर्णय घेण्याची बाब विभागाच्या विचाराधीन आहे.

**(v)** जो काही निर्णय होईल तो सर्व महाविद्यालयातील संगणक विद्याशाखांच्या बाबतीत लागू होईल.

**(vi)** निर्णय घेण्याकरिता अपेक्षित असलेली माहिती/तपशील संकलित करून घेण्यास वेळ लागणार असल्यामुळे ह्या निर्णयास काही कालावधी लागणार आहे.

शासनाचे हे उत्तर काळजीपूर्वक वाचले तर न्यायालयाच्या निर्णयातून व याचिकाकर्त्यांच्या निवेदनातून निर्माण झालेल्या कोणत्याही मुद्याला या पत्राने स्पर्श केलेला नाही. त्यामुळे त्याला अद्ययावत स्थितीदर्शक निवेदन असे म्हणता येणार नाही. यापूर्वी घेतलेल्या निर्णयांचा पुन्हा उल्लेख करणारे व आठ आठवड्याच्या आत निर्णय घेण्याच्या मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाची औपचारिकता पूर्ण करणारे हे शासनाचे निवेदन आहे. त्यामुळे त्याचा दर्जा सद्यस्थिती दर्शक निवेदन असाच आहे. पण या पत्राचा एक फायदा असा की, याचिकाकर्त्यांचे म्हणणे रास्त असून भेदभावपूर्ण वागणूक झालेली आहे ही गोष्ट या पत्रातून झिरपल्याने स्पष्ट झाली. उच्च शिक्षण विभागाचे दिनांक ६ फेब्रुवारी २००८ रोजीचे हे पत्र **सहपत्र : ५** म्हणून सोबत प्रसृत केलेले आहे.

**१७.** वस्तुतः उच्च शिक्षण विभागाने पाठविलेले दिनांक ६ फेब्रुवारी २००८ रोजीचे हे पत्र फक्त याचिकाकर्ते सचिव, श्रीमती नरसम्मा हिरय्या शैक्षणिक ट्रस्ट, अमरावती यांना पाठविले होते. परंतु असे दिसून येते की, संगणकशास्त्र अनुदान कृती समितीचे सर्वच सदस्य एकमेकांच्या संपर्कात होते. या कृती समितीच्या वतीने शासनाचे दिनांक ६ फेब्रुवारी २००८ रोजीचे पत्र विचारात घेऊन त्या पत्रातील त्रुटी लक्षात आणून देणारे एक तपशीलवार निवेदन मा.मंत्री महोदय, उच्च शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांना संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत दिनांक २६ मार्च २००८ रोजी सादर केले गेले. या निवेदनाचा विषय "मा.उच्च न्यायालयाचे आदेश असतांनासुद्धा पदवी स्तरावरील अनुदानप्राप्त विज्ञान विद्याशाखेअंतर्गत शिकविल्या जाणाऱ्या संगणकशास्त्र या वैकल्पिक विषयाच्या अनुदान धोरणातील भेदभावपूर्ण वागणूक संपुष्टात न आणल्याबाबत" असा होता.

**१८.** या २६ मार्च २००८ च्या निवेदनामध्ये कृती समितीने शासनाच्या भेदभावपूर्ण वागणुकीचे मुद्दे पुन्हा शासनाच्या लक्षात आणून दिले होते. विज्ञान शाखेअंतर्गत संगणकशास्त्र या विषयाला प्रारंभापासूनच शासनाकडून अनुदानासंदर्भात भेदभावपूर्ण वागणूक दिल्या गेली आहे असे नमूद करून अनुदान सुरू असलेल्या महाविद्यालयांपैकी आजही अनुदान सुरू असलेल्या १६ महाविद्यालयांची यादी या निवेदनामध्ये सादर केलेली होती. त्याचबरोबर अनुदान नाकारलेल्या १५ महाविद्यालयांची यादीसुद्धा या निवेदनामध्ये नमूद केलेली होती. "हे भारतीय घटनेतील कलम १४ चे सरळ सरळ उल्लंघन आहे" असेही या निवेदनामध्ये नमूद केले होते. शेवटी या निवेदनान्वये शासनाला पुढीलप्रमाणे विनंती करण्यात आलेली होती.:-

"(१) संपूर्ण महाराष्ट्र राज्यात अनुदानित विज्ञान शाखेअंतर्गत शिकविल्या जाणाऱ्या संगणकशास्त्र या मान्यताप्राप्त वैकल्पिक विषयास अनुदान देण्यासंबंधी सर्वंकष व एकच अनुदान धोरण लागू करावे. या धोरणाचा कालावधी विषयाच्या प्रारंभापासून ते शैक्षणिक सत्र २०००-२००१ पर्यंतचा असावा.

(२) सदर विषयाच्या अध्यापनासाठी कार्यरत असणाऱ्या विद्यापीठ व शासन नियमानुसार नियुक्त महाविद्यालयीन शिक्षकांच्या सेवा या सेवानिवृत्ती

*सहपत्र ५ : परिच्छेद १६ पहा*

***महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्र शिक्षण विभाग***

क्रमांक : सीटीसी २००७/(९८/भाग-२)/मशि-३

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०००३२

**दिनांक : ६ फेब्रुवारी २००८**

प्रति,<br>सचिव,<br>श्रीमती नरसम्मा हिरय्या शैक्षणिक ट्रस्ट,<br>किरण नगर, अमरावती

**विषय :** मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी याचिका क्र. ९९८/२००७ मध्ये दि. २६.११.०७ रोजी दिलेल्या आदेशानुसार प्राप्त निवेदनावर करावयाची कारवाई.

आपले दि. १९.१२.०७ चे वरील विषयास अनुसरून विभागामध्ये दि.३१.१२.०७ रोजी प्राप्त झालेल्या निवेदना अनुषंगाने विभागाचा निर्णय खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

२. आपल्या निवेदनामध्ये एकूण २३ मुद्दे उपस्थित केले असून हे सर्व मुद्दे, आपल्या संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांतर्गत संगणक विद्याशाखेस, राज्यामधील ज्या महाविद्यालयातील संगणक विद्याशाखेस दि.२४.०९.९१ पूर्वी आणि त्यानंतर अनुदान दिले जाते त्याच धर्तीवर अनुदान दिले जावे असा एकूण प्रस्ताव आपल्या निवेदनातून सादर केला आहे.

३. त्यातील मुद्दा क्र. २ मध्ये नमूद केलेल्या अनुदानाच्या मुद्याबाबत स्पष्ट करण्यात येते की, अनुदानित संस्थांना अनुदान कशा स्वरुपात वितरित केले जाईल याची कार्यपद्धती शासन आदेश क्र. एनजीसी २०८८/१६५२/विशि-२ (अ), दि. ०४.०१.८९ आणि ०८.०८.९१ च्या आदेशान्वये विहित केले आहे. **राज्यामध्ये महाविद्यालयांतर्गत सर्व विद्याशाखांसाठी कायम विना अनुदानाचे धोरण सन २००१-०२ पासून राबविले जात आहे.**

४. शासन आदेश क्र. एनजीसी १०९१/३५६७/विशि-२(अ), दि. २४.०९.९१ च्या पूरक पत्रान्वये वर उल्लेख केलेल्या दि. ०४.०१.८९ आणि ०८.०८.९१ च्या आदेशात अनुदान वितरणाचे धोरण स्पष्ट करताना ज्या विद्याशाखा जसे **इलेक्ट्रॉनिक्स, शिक्षणशास्त्र, संगणकशास्त्र, अभियांत्रिकी व शारीरिक शिक्षणशास्त्र हे वैकल्पिक व व्यावसायिक स्वरूपाचे विषय प्रारंभापासून कायम विना अनुदान तत्वावर असतील याचा उल्लेख करावयाचा राहून गेला** असल्यामुळे दि. २४.०९.९१ च्या पूरक पत्रान्वये तसे स्पष्ट करून दि. ०४.०१.८९ आणि ०८.०८.९१ च्या आदेशामध्ये केवळ दुरुस्ती करण्यात आलेली आहे. यावरून असे स्पष्ट होईल की, संगणक विद्याशाखेबरोबर इतरही चार विद्याशाखा ह्या कायम विना अनुदान तत्वावर राबविण्याचे धोरण दि. २४.०९.९१ पूर्वीपासून पूर्वलक्षीप्रभावाने म्हणजेच या अभ्यासक्रमाच्या प्रारंभापासून आणि त्यानंतर देखील शासनाने स्वीकारले आहे.

५. शासनाचे संगणक विद्याशाखेसह इतर चार विद्याशाखांच्या बाबतीत दि.२४.०९.९१ च्या पूरक पत्रान्वये स्पष्ट केल्याप्रमाणे **कायम विना अनुदानाचे धोरण असताना राज्यातील काही महाविद्यालयांना विशिष्ट परिस्थितीत विज्ञान शाखेअंतर्गत संगणकशाखेस अनुदान दिले गेले आहे.**

६. वरील बाबी लक्षात घेऊन अनुदान मंजुरीत **स्पष्ट नियम असावेत याकरिता सर्वकष असा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर ठेवून त्यावर उचित असा निर्णय घेण्याची बाब विभागाच्या विचाराधीन असून त्याप्रमाणे जो निर्णय होईल तो सर्व महाविद्यालयातील संगणक विद्याशाखांच्या बाबतीत लागू होईल. परंतु असा निर्णय घेण्याकरिता अपेक्षित असलेली माहिती/तपशील संकलित करून घेण्यास वेळ लागणार असल्यामुळे ह्या निर्णयास काही कालावधी लागणार आहे.** सद्यस्थितीत आपण केलेल्या विनंती अनुषंगाने विभागस्तरावर कोणतीही निर्णय घेऊन त्याप्रमाणे कारवाई करणे हे वर नमूद परिस्थितीत विभागास शक्य होणार नाही.

**(सु.ल.तिडके)**<br>अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत :** संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रयोजनासाठी व वेळोवेळी मिळणाऱ्या इतर लाभांसाठी ग्राह्य धरण्यात याव्या." दिनांक २६ मार्च २००८ रोजीचे हे कृती समितीने सादर केलेले निवेदन सोबत **सहपत्र : ६** म्हणून प्रसृत केलेले आहे.

**१९.** सन २००७ च्या डिसेंबर महिन्याच्या शेवटी व २००८ च्या सुरुवातीच्या काळात उपलब्ध असलेल्या स्थितीचे दर्शन घडविणारी कागदपत्रे चारही बाजूंनी माझ्या दप्तरी उपलब्ध झाली होती. प्रा.पराग भालचंद्र, श्री.नानासाहेब चिमणपूरे व प्राचार्य श्री.श्रीकांत देशपांडे यांच्याकडून मुख्यत्वे ही कागदपत्रे माझ्यापर्यंत पोहचलेली होती. आता याबाबतचा संघर्ष सभागृहामध्ये सुरू करणे ही माझी व्यक्तिगत जबाबदारी होती.

**२०.** सभागृहामध्ये संघर्ष उपस्थित करतांना त्या शब्दयुद्धामध्ये शासनाकडून जे मंत्री किंवा राज्यमंत्री उत्तरे देत असतात त्यांच्या जवळील माहितीचे उगमस्थान हे म्हणजे त्यांच्या विभागाच्या डेस्क ऑफिसरपासून तर सचिवांपर्यंतच्या अधिकाऱ्यांच्या उतरंडीतील व्यक्तींकडून येणारी कागदपत्रे यामध्ये असते. याच्या उलट परिस्थिती ही प्रश्न उपस्थित करणाऱ्या सभासदाची असते. तक्रारदारांनी सादर केलेली निवेदने, व्यथित तक्रारदारांशी झालेली चर्चा, वृत्तपत्रांतून आलेली माहिती व त्याशिवाय सरकारने घेतलेली भूमिका अशा विविध पद्धतीने सदस्या जवळ ही माहिती गोळा झालेली असते. आता याबाबतीत सभागृहामध्ये शासनाची स्थिती किंवा भूमिका काय असेल याचा अंदाज आलेला असल्यामुळे अंदाजावर विसंबून न राहता त्या बाबी सभागृहात निश्चित करून घेणे आवश्यक होते.

**२१.** अशारीतीने शासनाची भूमिका सभागृहामध्ये नोंदविण्यासाठी **अतारांकित प्रश्नांचा** वापर केल्या जातो. अतारांकित प्रश्नोत्तरामध्ये लेखी माहिती मागविणे एवढाच उद्देश असतो. त्यावर अनुपूरक चर्चा होत नाही. व्हावी अशी अपेक्षा नसते. अनुपूरक चर्चा करण्याची इच्छा असेल तर त्यासाठी **तारांकित प्रश्नाची** नोटीस द्यावी लागते. या कामी **लक्षवेधी सूचनेचा** सुद्धा वापर करण्यात येतो. लक्षवेधी सूचनेवर चर्चा होऊ शकते तसेच अनुपूरक प्रश्न सुद्धा विचारल्या जाऊ शकतात. सभागृहामध्ये चर्चेसाठी न आलेल्या लक्षवेधी सूचनेवरील निवेदने ही शेवटच्या दिवशी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतात. त्यावर चर्चा होत नाही किंवा अनुपूरक प्रश्न होत नाहीत. शासनाची भूमिका सभागृहामध्ये नोंदबद्ध व्हावी यासाठी मी शेवटच्या म्हणजे **"लक्षवेधी सूचनेवरील निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवणे"** या पर्यायाचा वापर करण्याचे ठरविले.

**२२.** आम्ही सादर केलेल्या लक्षवेधी सूचनेवरील शासनाचे निवेदन हे शनिवार, दिनांक २६ जुलै २००८ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. अशी लक्षवेधी सूचना दाखल करीत असतांना सूचनेच्या मसुद्यामध्ये आपल्याला आवश्यक असलेल्या सर्व मुद्द्यांचा समावेश करणे आवश्यक असते. ज्या मुद्द्यांचा समावेश नसेल त्या मुद्द्यांची माहिती शासनाच्या निवेदनामध्ये समाविष्ट असत नाही. आमच्या या लक्षवेधी सूचनेमध्ये कोणकोणते मुद्दे समाविष्ट करण्यात आले होते हे लक्षात येण्यासाठी या सूचनेचा मसुदा लक्षात घ्यावा लागेल. तो शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"पदवी स्तरावरील अनुदानप्राप्त विज्ञान शाखेअंतर्गत शिकविल्या जाणाऱ्या संगणक शास्त्र या वैकल्पिक विषयाला अनुदान देतांना दिली जाणारी भेदभावपूर्ण वागणूक, याबाबत मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने २००७ च्या याचिका क्रमांक ९९८ मध्ये दिनांक २६ नोव्हेंबर २००७ रोजी दिलेला निर्णय, **काही महाविद्यालयांना बिनाअनुदान तत्त्वावर व काही महाविद्यालयांना कायम बिना अनुदान तत्त्वावर मान्यता देण्याच्या भेदभावपूर्ण वागणुकीबाबत तपासणी करण्याचा स्पष्ट उल्लेख त्या निर्णयामध्ये असणे,** या निर्णयानुसार १९ डिसेंबर २००७ रोजी तपशीलवार पत्र पाठवून याचिका कर्त्यांनी भेदभावपूर्ण वागणुकीचे **२३ मुद्दे शासनाच्या लक्षात आणून देणे,** आठ आठवड्यामध्ये याबाबत शासनाने कायद्याला धरून निर्णय घ्यावा असे मा. उच्च न्यायालयाचे आदेश असतांनासुद्धा याबाबत कोणतीही कारवाई न होणे, "विज्ञान शाखेअंतर्गत संगणक शास्त्र या विषयास काही महाविद्यालयांना अनुदान देण्यात आले" **ही बाब शासनाने ६ फेब्रुवारी २००८ च्या पत्रान्वये मान्य करणे,** आठ आठवड्यात निर्णय होणे तर बाजूलाच राहिले याउलट "कारवाई करणे विभागास शक्य होणार नाही" असे शासनाने ६ फेब्रुवारी २००८ च्या पत्रान्वये कळविणे, ह्या सर्व बाबी संगणक शास्त्र अनुदान कृती समितीने दिनांक २६ मार्च २००८ रोजी मा. मंत्री उच्च शिक्षण यांना, उच्च शिक्षण संचालकामार्फत एक निवेदन पाठवून लक्षात आणून दिल्यानंतर सुद्धा याबाबत कोणतीही कारवाई होत नसल्याने शिक्षण क्षेत्रात निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : शनिवार, दिनांक २६ जुलै २००८ : खंड १४९, क्रमांक ९, पृष्ठ १५७-१५८)*

**२३.** आम्ही दाखल केलेल्या या लक्षवेधी सूचनेवर मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांनी केलेल्या निवेदनात जी उत्तरे देण्यात आलेली होती, ती काळजीपूर्वक पाहिली तर याबाबतच्या सर्वच विसंगती शासनाने मान्य केल्या होत्या असे दिसून येते. अशा विसंगती मान्य करणारी तसेच महत्त्वाची शासनाच्या निवेदनातील निरनिराळी दहा विधाने पुढीलप्रमाणे :-

(१) "संगणकशास्त्र विषयाची पदवी प्राप्त केल्यानंतर व्यवसायाच्या चांगल्या संधी उपलब्ध असल्यामुळे हा व्यावसायिक अभ्यासक्रम मानला गेला आहे."

(२) "सन १९८८ पर्यंत संगणक शास्त्र विषयास मंजुरी देतांना, नवीन शिक्षक वर्ग नेमावा लागत नसेल तरच प्रत्यक्षात नवीन विषय सुरू करावा या अटीवर शासनाने परवानगी दिली आहे."

(३) "शासन निर्णय दिनांक २४ सप्टेंबर, १९९१ अन्वये, संगणक या विषयास कायम विना अनुदान तत्त्वावर मान्यता देण्यात आलेली आहे असे समजण्यात यावे, असा खुलासा करण्यात आला."

(४) "विशेष परिस्थितीत/कारणांमुळे काही महाविद्यालयातील संगणकशास्त्र विषयास वर नमूद अट शिथिल करून विनाअनुदान तत्त्वावर परवानगी बदलून देण्यात आली आहे."

(५) "विज्ञान शाखा १०० टक्के अनुदानावर असल्यास संगणकशास्त्र या विषयास ओघाने अनुदान देणे क्रमप्राप्त ठरते असे समजून अनुदान मंजूर करण्यात आले आहे."

(६) "तात्कालिन परिस्थिती लक्षात घेवून शासन स्तरावर संगणकशास्त्र विषयाची कायम विनाअनुदान तत्त्वाची अट काही महाविद्यालयांच्या बाबतीत काढून टाकण्यात आली आहे."

(७) "यापुढे शैक्षणिक संस्थांना कायम स्वरूपी विना अनुदान तत्त्वांवर खाजगी क्षेत्रात नवीन महाविद्यालय उघडण्याची परवानगी देण्यात यावी, असा निर्णय घेण्यात आला."

(८) "राज्यामध्ये महाविद्यालयांतर्गत सर्व विद्याशाखांसाठी कायम विना अनुदानाचे धोरण सन २००१-०२ पासून राबविले जात आहे."

(९) "१९ डिसेंबर २००७ रोजीच्या पत्रातील २३ मुद्यांचा खुलासा तसेच संगणकशास्त्र विषयाबाबत सुरू असलेल्या कार्यवाहीबाबतची सद्यःस्थिती संबंधित संस्थेला शासनाच्या ६ फेब्रुवारी २००८ च्या पत्रान्वये कळविण्यात आली आहे."

(१०) "कार्यभारानुसार एकूण शिक्षकांची संख्या, विद्यार्थी संख्या मागविण्यात आली असून त्यानंतर यावर निर्णय घेणे शक्य होणार आहे. परंतु असा निर्णय घेण्याकरिता काही कालावधी लागण्याची शक्यता आहे."

या लक्षवेधी सूचनेवरील महाराष्ट्र विधानपरिषदेच्या कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन सोबत **सहपत्र : ७** म्हणून प्रसृत केलेले आहे.

**२४.** तक्रारकर्त्यांनी पुरविलेली माहिती आणि त्या माहितीच्या बाबतीत शासनाची भूमिका आता स्पष्ट झालेली होती. शासनाची भूमिका ही पूर्णपणे भारतीय संविधानाच्या कलम १४ च्या विरोधात होती हेही स्पष्ट झाले होते. त्यामुळे आता पुन्हा चर्चा घडवून विसंगती शासनाच्या लक्षात आणून देणे आवश्यक झालेले होते आणि त्यामुळेच तारांकित प्रश्न या संसदीय आयुधाचा वापर करण्याचे आम्ही ठरविले. **"संगणक शास्त्र या वैकल्पिक विषयाला अनुदान देतांना दिली जाणारी भेदभावपूर्ण वागणूक"** या विषयावरील आमचा तारांकित प्रश्न क्रमांक ४६२०० हा सभागृहामध्ये मंगळवार, दिनांक २३ डिसेंबर २००८ रोजी उत्तरासाठी तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीत पाचव्या क्रमांकावर होता व त्यामुळेच त्यावर अनुपूरक चर्चा होणे सहज शक्य होते व तशी ती झालीही.

**२५.** आम्ही विचारलेल्या तारांकित प्रश्नाच्या "पदवी स्तरावरील अनुदानप्राप्त विज्ञान शाखेअंतर्गत शिकविल्या जाणाऱ्या संगणक शास्त्र या वैकल्पिक विषयाला अनुदान देताना दिल्या जाणाऱ्या भेदभावपूर्ण वागणूकीबाबत मा. उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने २००७ ची याचिका क्रमांक ९९८ मध्ये दिलेल्या निर्णयाप्रमाणे शासनाने काय कारवाई केली आहे," या प्रश्न भाग एक ला मा.उच्च शिक्षणमंत्र्यांनी "याचिका क्रमांक ९९८/२००७ वर मा.उच्च न्यायालयाने दि. २६.११.२००७ रोजी दिलेल्या आदेशानुसार उचित असा निर्णय घेण्याची बाब विभागाच्या विचाराधीन असून त्याप्रमाणे मंत्रीमंडळासमोर लवकरच प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. त्यात जो निर्णय होईल तो संगणक शास्त्र विषयाच्या बाबतीत लागू होईल." असे उत्तर दिले होते. "असल्यास, शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे," या प्रश्न भाग दोन ला "परंतु प्रशासकीय कारणास्तव असा निर्णय घेण्याकरिता काही कालावधी लागण्याची शक्यता आहे." असे उत्तरामध्ये नमूद केले होते.

**२६.** या तारांकित प्रश्नावरील अनुपूरक चर्चा सभागृहामध्ये सुरू झाली. पहिल्याच उपप्रश्नामध्ये "विज्ञान शाखेअंतर्गत संगणकशास्त्र या विषयाला काही महाविद्यालयांमध्ये अनुदान दिले जाते हे खरे आहे काय? अनेक महाविद्यालयात संगणकशास्त्र या विषयाची कायम विनाअनुदानित ही अट काढून टाकली पण काही महाविद्यालयांमध्ये ती अट काढण्यात आलेली नाही. असा भेदभाव झालेला आहे हे खरे आहे काय? असे विचारले असता दोनही मुद्यांच्या बाबतीत **खरे आहे.** असे उत्तर दिले होते. शासनाच्या व संचालकांच्या स्तरावर डिस्क्रीमिनेशन झाले आहे ही गोष्ट सुद्धा मंत्र्यांनी मान्य केली होती. ती अनुपूरक चर्चा पुढीलप्रमाणे :-

"**प्रा.बी.टी.देशमुख :** संगणकशास्त्र या वैकल्पिक विषयाला अनुदान देताना जो भेदभाव करण्यात येतो त्या अनुषंगाने मला असे विचारावयाचे आहे की, "संगणक शास्त्र हा विषय विज्ञान शाखेअंतर्गत शिकविला जातो म्हणून विज्ञान शाखा १०० टक्के अनुदानावर असल्याने संगणक शास्त्र या एका विषयाला ओघाने अनुदान देणे क्रमप्राप्त ठरते. **असे असतांना काही महाविद्यालयांमध्ये संगणक शास्त्र विज्ञान शाखाअंतर्गत असतांनाही अनुदान दिले तर काहींना दिले नाही," ही गोष्ट खरी आहे काय?** त्याचप्रमाणे "महाविद्यालयात विज्ञान शाखा १०० टक्के अनुदानावर असूनही संगणक शास्त्र या वैकल्पिक विषयाला कायम विना अनुदानित तत्वावर परवानगी देण्यात आली आहे **त्यामुळे अशा कॉलेजेसमधील विद्यार्थ्यांमध्ये भेदभाव निर्माण होतो असे निदर्शनास आले. त्यामुळे अनेक महाविद्याल्यात संगणक शास्त्र या विषयाची कायम विना अनुदानित ही अट काढून टाकली तर काही कॉलेजेसची कायम विनाअनुदानित ही अट काढली नाही," हे खरे आहे काय?**

**श्री.राजेश टोपे :** महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी दोन प्रश्न विचारले ते दोन्ही **प्रश्न खरे आहेत.** एक मात्र नक्की आहे की, जे धोरण राज्यशासनाने निश्चित केले होते त्यानुसार सन १९९१ नंतर वैकल्पिक विषयाला कायम विना अनुदानित ग्राह्य धरणार होतो. त्यानंतर सुध्दा अशा काही मान्यताप्राप्त विज्ञान शाखा आणि त्यांना अटॅच असलेले वैकल्पिक विषय असतील त्यांना अनुदान देण्याच्या दृष्टीने काही प्रमाणात **निश्चित प्रकारे शासन आणि संचालक पातळीवर डिस्क्रीमिनेशन झाले आहे, जी विसंगती घडलेली आहे ते मी सांगू इच्छितो."** *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक २३ डिसेंबर २००८ : खंड १५०, क्रमांक ७, पृष्ठ १२)*

या विषयावर सभागृहात चर्चा सुरू असतांना मा.उच्च शिक्षणमंत्र्यांनी स्वहस्ताक्षरात लिहिलेली एक चिठ्ठी माझ्याकडे पाठविली. मजकूर पुढीलप्रमाणे:-

"मा.श्री.बी.टी.देशमुख साहेब

कृ. मी २ महिन्यांच्या कालावधीत हा प्रश्न मंत्रीमंडळ समोर नेऊन सोडवतो व नक्की करून देतो. - टोपे"

**२७.** तसाच भेदभाव शारीरिक शास्त्र या विषयाच्या बाबतीत सुद्धा झालेला आहे ही गोष्ट खरी आहे काय? असे विचारले असता "त्याचबरोबर कम्प्युटर सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स इत्यादी विषयांच्या बाबतीत सुद्धा शारीरिक शास्त्र या विषया बरोबरच भेदभाव झाला असून हा विषय मंत्रीमंडळासमोर

*सहपत्र ६ : परिच्छेद १८ पहा*

## *संगणकशास्त्र अनुदान कृती समिती (महाराष्ट्र प्रदेश)*

**अध्यक्ष,** प्रा.संजय घुले, कळंब जि.उस्मानाबाद **उपाध्यक्ष,** प्रा.पराग भालचंद्र, अंबाजोगाई, जि.बीड **सचिव,** प्रा.चंद्रशेखर सावरकर, अमरावती
**सहसचिव,** प्रा.वैभव पाठक, परभणी : कार्यालयीन पत्ता : घर क्र. ०७, महात्मा फुले कॉलनी, शांतीनगर, यशोदानगर क्र. २, अमरावती, पिन : ४४४६०२
दूरध्वनी : ९३७१७७७११७, ९४२२२४०३०१, ०७२१-२५६०३९४, ०७२१-३२९०४८६

प्रति,
**मा.मंत्री महोदय,**
उच्च शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२

**विषय :** पदवी स्तरावरील मा.उच्च न्यायालयाचे आदेश असतांनासुद्धा अनुदानप्राप्त विज्ञान विद्याशाखेअंतर्गत शिकविल्या जाणाऱ्या संगणकशास्त्र या वैकल्पिक विषयाच्या अनुदान धोरणातील भेदभावपूर्ण वागणूक संपुष्टात न आणल्याबाबत.

**मार्फत :** संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

मा.महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भात मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे दाखल झालेल्या श्रीमती नरसम्मा हिरय्या शैक्षणिक ट्रस्ट, अमरावती विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर (याचिका क्र. ९९८/२००७) या याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालय यांनी पुढीलप्रमाणे आदेश दिला आहे.

"If State Government has granted permission to some of the Colleges/Institutions to start the above referred subject on no grant basis, in that case, we permit the petitioners to make a representation in this regard to the State Government within a period of four weeks from today and if such representation is made, the State Government is directed to take a decision on its own merits according to law and procedure applicable in this regard within a period of eight weeks from the date of receipt of such representation." (सहपत्र क्र. १ - याचिका क्र. ९९८/२००७ या याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालय यांनी दिलेल्या निर्णयाची प्रत, पृष्ठ क्र. ०४ ते ०६)

मा.उच्च न्यायालयाच्या उपरोक्त आदेशाप्रमाणे श्रीमती नरसम्मा हिरय्या शैक्षणिक ट्रस्टने विहित मुदतीच्या आत शासनाकडे आपले निवेदन सादर करून त्यात संगणकशास्त्र विषयाच्या अनुदानासंदर्भात शासनाकडून झालेल्या भेदभावपूर्ण व विसंगत वागणुकीसंबंधीचे उदाहरणांसह दाखले दिले आहेत. (सहपत्र क्र. २ - श्रीमती नरसम्मा हिरय्या शैक्षणिक ट्रस्टने सादर केलेले निवेदन, पत्र क्र. SNHST/297/1/2007, dated 19.12.2007, पृष्ठ क्र. ०७ ते १८)

संस्थेच्या उपरोक्त निवेदनावर शासनाने दि. ०६.०२.२००८ चे (पत्र क्र. CTC२००७/(९८/भाग-२/मशि-३) उत्तर पाठविले आहे (सहपत्र क्र. ३, पृष्ठ क्र. १९). या पत्रामध्ये शासनाने खालील बाबी मान्य केल्या आहेत.

(१) राज्यामध्ये महाविद्यालयांतर्गत सर्व विद्याशाखांसाठी कायम विनाअनुदानाचे धोरण सत्र २००१-०२ पासून राबविले जात आहे.

(२) शासननिर्णय दि. ४ जानेवारी १९८९ व ८ ऑगस्ट १९९१ या अनुदानाचे धोरण ठरविणाऱ्या निर्णयांमध्ये संगणकशास्त्र हा विषय कायम विनाअनुदानित असल्याबद्दलचा उल्लेख करावयाचा राहून गेला.

(३) संगणकशास्त्र हा विषय कायम विनाअनुदान तत्वावर राबविण्याचे धोरण **दि. २४.०९.१९९१ पासून पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजेच या अभ्यासक्रमाच्या प्रारंभापासूनच (साधारणतः १९८५-८६ साला पासून) आणि त्यानंतर देखील** शासनाने स्वीकारलेले आहे.

(४) दि. २४.०९.१९९१ च्या पुरकपत्रान्वये स्पष्ट केल्याप्रमाणे कायम विनाअनुदानाचे धोरण असतांना राज्यातील काही महाविद्यालयांना **विशिष्ट परिस्थितीत** विज्ञानशाखे अंतर्गत संगणकशास्त्र या विषयास अनुदान दिले गेले आहे.

(५) वरील बाबी लक्षात घेता संगणकशास्त्र या विषयास अनुदान मंजुरी संबंधी स्पष्ट नियम असावेत या करीता सर्वंकष असा प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर ठेवून त्यावर उचित निर्णय घेण्याची बाब उच्च शिक्षण विभागाच्या विचाराधीन आहे.

वरील बाबी लक्षात घेता शासनाने हे स्पष्ट कबूल केले आहे की, विज्ञान विद्यशाखे अंतर्गत संगणकशास्त्र विषयाच्या प्रारंभापासूनच शासनाकडून संगणकशास्त्र विषयाला अनुदानासंदर्भात भेदभावपूर्ण वागणूक दिल्या गेली आहे.

अनुदान सुरू असलेल्या महाविद्यालयांपैकी काही महाविद्यालये खालीलप्रमाणे आहेत.

(अ.क्र.) महाविद्यालयाचे नाव : विषयास परवानगीचे वर्ष

(०१) श्री.शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती : १९८८-८९

(०२) श्री.शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला : १९८७-८८

(०३) श्री.शिवाजी महाविद्यालय, चिखली, जि.बुलढाणा : १९८८-८९

(०४) आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वे, जि.अमरावती : १९८७-८८

(०५) जी.एस.विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगाव, जि.बुलढाणा : १९८७-८८

(०६) अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ : १९८७-८८

(०७) पी.एन.महाविद्यालय, पुसद, जि.यवतमाळ : १९८७-८८

(०८) श्री.शिवाजी शिक्षण संस्थेचे विज्ञान महाविद्यालय, नागपूर : १९८९-

नेऊन लवकरच याबाबतीत निर्णय घेतला जाईल अशी माहिती मा.उच्च शिक्षणमंत्र्यांनी पुढील शब्दात दिली. :-

"**श्री.राजेश टोपे :** सभापती महोदय, मी अगोदरच, सन १९९१ नंतर वैकल्पिक विषयाला कायम विना अनुदानित म्हणूनच मान्यता राहील, असे स्पष्ट धोरण असताना काही प्रमाणात राज्यात ज्या घटना घडल्या ते मान्य केले. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, सन २००१ ला कायम विनाअनुदानित तत्वावर महाविद्यालयांना मान्यता देण्यासंबंधीचे धोरण शासनाने स्वीकारले. त्यामुळे सन १९९१ ते २००१ या काळात कायम विनाअनुदानित कॉलेजेसना मान्यता देणार काय? यासंदर्भात मला असे स्पष्ट करावयाचे आहे की, यापूर्वी ज्या चुका घडल्या त्यांच्याबाबत चौकशी होणे आवश्यकच आहे आणि ती करण्यात येईल. परंतु कोर्टाने मधल्या काळात ऑर्डर्स दिल्या होत्या की याबाबत शासनाने उचित निर्णय घ्यावा. **त्या अनुषंगाने मी सभागृहाला सांगू इच्छितो की, अनेक वैकल्पिक विषय मग त्यात कॉम्प्युटर सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स सायन्स, शारीरिक शास्त्र या विषयांची व्याप्ती तसेच त्यासाठी नेमलेले प्राध्यापक आणि अधिव्याख्याते तसेच विद्यार्थ्यांची संख्या** ही सर्व व्याप्ती लक्षात घेऊन निश्चितपणे मंत्रीमंडळासमोर हा विषय जाणार आणि लवकरात लवकर निर्णय घेतला जाईल." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक २३ डिसेंबर २००८ : खंड १५०, क्रमांक ७, पृष्ठ १३)*

**२८.** सभागृहात होणारी चर्चा ही पूर्वी सदस्याने दिलेल्या मुद्यांवर होत असते. अनेकदा ज्या मुद्यांची पूर्वसूचना दिलेली नाही असे मुद्दे सुद्धा अनुपूरक प्रश्नांच्या रूपाने उपस्थित केले तर मग मंत्र्यांकडून त्याविषयी मोघम उत्तरे दिली जातात. मा.उच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतरसुद्धा ज्या अधिकाऱ्यांनी ही कागदपत्रे दाबून ठेवली त्या अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाणार काय? व भेदभाव संपुष्टात आणणारा निर्णय आठ आठवड्यात घेतला जाईल काय? असा प्रश्न विचारला असता दोनही प्रश्नांना "होय" असे उत्तर मा.उच्च शिक्षणमंत्र्यांनी दिले. ती चर्चा पुढीलप्रमाणे :-

"**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, हा विषय मूळ प्रश्नापासून दूर जाता कामा नये अशी विनंती आहे. या सभागृहात संगणकशास्त्र या वैकल्पिक विषयाला अनुदान देतांना भेदभावपूर्ण वागणूक दिली आहे, हे मान्य करावयाचे परंतु हा भेदभाव दूर करण्यासाठी काहीही प्रयत्न करावयाचे नाहीत, असे या शासनाचे धोरण आता झाले आहे. या प्रश्नाच्या संदर्भात कोर्टाने २६ नोव्हेंबर, २००७ रोजी जे निर्देश दिलेले आहेत ते मी या ठिकाणी वाचून दाखवतो.

"However, if the State Government has granted permission to some colleges and institutions to start the above subject on No Grant Basis, in that case, we permit the Petitioner to make representation in this regard to the State Government within a period of four weeks from today and if such representation is made, the State Government is directed to take decision on merit, according to the Law and Procedure applicable in this regard, **within a period of 8 weeks of the date of such**

---

९०

(०९) श्री.गुरुबुद्धी स्वामी महाविद्यालय, पूर्णा (जं.), जि.परभणी : १९९८-९९

(१०) संत जनाबाई शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गंगाखेड जि.परभणी : १९९६-९७

(११) ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जिंतूर जि.परभणी : १९९२-९३

(१२) सेठ केसरीमल पोरवाल महाविद्यालय, कामठी, जि.नागपूर : १९८८-८९

(१३) बी.पी.आर्टस, एस.एम.ए. सायन्स, ॲंड के.के.सी. कॉमर्स कॉलेज, चाळीसगाव, जि.जळगाव : १९८६-८७

(१४) राष्ट्रीय कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चाळीसगाव, जि.जळगाव : १९८६-८७

(१५) आर.डी.आय.के. महाविद्यालय, बडनेरा जि.अमरावती : १९९१-९२

(१६) धुंडा महाराज महाविद्यालय, देगलूर जि.नांदेड : १९९७-९८

अनुदान नाकारलेल्या महाविद्यालयांपैकी काही महाविद्यालये खालील प्रमाणे आहेत.

(अ.क्र.) महाविद्यालयाचे नाव : विषयास परवानगीचे वर्ष

(०१) एच.पी.टी. आर्टस ॲन्ड आर.वाय.के सायन्स कॉलेज, नाशिक : १९८६-८७

(०२) के.के.डब्ल्यु आर्टस सायन्स ॲन्ड कॉमर्स कॉलेज, पिंपळगाव बसवंत : १९८६-८७

(०३) मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव : १९८७-८८

(०४) भुसावळ कला, विज्ञान आणि पू.ओ.नाहटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ : १९८७-८८

(०५) जानकीदेवी बजाज महाविद्यालय, वर्धा : १९८८-८९

(०६) हिस्लॉप कॉलेज, नागपूर : १९८६-८७

(०७) कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किरण नगर, अमरावती : १९९५-९६

(०८) कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चिखलदरा : १९९५-९६

(०९) योगेश्वरी महाविद्यालय, अंबाजोगाई : १९९२-९३

(१०) खंडेलवाल महाविद्यालय, अकोला : १९९८-९९

(११) बनमेरू महाविद्यालय, लोणार : १९९८-९९

(१२) बुरुंगले महाविद्यालय, शेगाव : १९९८-९९

(१३) यशवंत महाविद्यालय, नांदेड : १९९१ च्या आधी

(१४) ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी : १९९१ च्या आधी

(१५) जगदंब महाविद्यालय, अचलपूर, जि.अमरावती : १९९२-९३

उच्च न्यायालयाच्या निर्णयात शासनाकडून संगणकशास्त्र विषयास अनुदानासंदर्भात भेदभावपूर्ण वागणूक दिल्या गेली असल्यास शासनाने वरील बाबींसंदर्भात कायदेशीर व गुणवत्तापूर्ण निर्णय घ्यावा असे आदेश शासनाला दिले आहेत. तथापि, शासनाने विहित मुदतीत निर्णय न घेता अनुदान संदर्भातील निर्णय प्रलंबित ठेवून मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाची अवहेलना केली आहे, असे आमचे स्पष्ट मत आहे. तसेच "समान परिस्थितीत समान न्याय" या भारतीय राज्यघटनेतील कलम १४ चे हे सरळ सरळ उल्लंघन आहे. संगणकशास्त्र हा विषय काळाची गरज आहे, या विषयासंदर्भात अनुदानित विद्याशाखेत संगणकशास्त्र या वैकल्पिक विषयासाठी कायम विनाअनुदान धोरण राबवून शासन या विषयाशी, विद्यार्थ्यांशी, संबंधित प्राध्यापकांशी व महाविद्यालयांशी जीवघेणा खेळ खेळत आहे. ते त्वरीत थांबविणे आवश्यक आहे.

संपूर्ण महाराष्ट्र राज्यात अनुदानित विज्ञान शाखेअंतर्गत शिकविल्या जाणाऱ्या संगणकशास्त्र या मान्यताप्राप्त वैकल्पिक विषयास अनुदान नाकारण्यासाठी शासन पूरकपत्र (दुरुस्ती पत्र क्र. एनजीसी/१०९१/(३५६७)/विशि-२), दि.२४.०९.१९९१ (सहपत्र क्र. ४, पृष्ठ क्र. २०) चा आधार घेणे न्यायालयाच्या आदेशाच्या पार्श्वभूमीवर उचित ठरत नाही. मा.उच्च न्यायालयाच आदेश लक्षात घेऊन अनुदाना संदर्भातील भेदभावपूर्ण वागणूक संपुष्टात आणण्यासाठी शासनाने त्वरित निर्णय घेऊन खालील मागण्या मान्य करून आम्हाला न्याय द्यावा ही विनंती.

(१) संपूर्ण महाराष्ट्र राज्यात अनुदानित विज्ञान शाखेअंतर्गत शिकविल्या जाणाऱ्या संगणकशास्त्र या मान्यताप्राप्त वैकल्पिक विषयास अनुदान देण्यासंबंधी सर्वंकष व एकच अनुदान धोरण लागू करावे. या धोरणाचा कालावधी विषयाच्या प्रारंभापासून ते शैक्षणिक सत्र २०००-२००१ पर्यंतचा असावा.

(२) सदर विषयाच्या अध्यापनासाठी कार्यरत असणाऱ्या विद्यापीठ व शासन नियमानुसार नियुक्त महाविद्यालयीन शिक्षकांच्या सेवा या सेवानिवृत्ती प्रयोजनासाठी व वेळोवेळी मिळणाऱ्या इतर लाभांसाठी ग्राह्य धरण्यात याव्या.

धन्यवाद !

**स्थळ :** अमरावती

**दिनांक :** २६ मार्च २००८

आपले विश्वासू

**प्रा.चंद्रशेखर सावरकर, सचिव,**

संगणकशास्त्र अनुदान कृती समिती (महाराष्ट्र प्रदेश)

व इतर सदस्य, प्रा.पराग भालचंद्र, प्रा.संजय घुले, प्रा.वैभव पाठक, प्रा.अच्युत मुळजकर, प्रा.नरेंद्र जाठे, प्रा.दिनेश सातंगे, प्रा.लक्ष्मीधर मुळे, प्रा.दिपक पाटील, प्रा.आर.पी.वैद्य

**प्रतिलिपी :** (१) मा.प्रधान सचिव, उच्च शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (२) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य (३) मा.बी.टी.देशमुख, आमदार (पदवीधर मतदार संघ), सदस्य, विधानपरिषद, मुंबई यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.

**representation."**

**या प्रश्नाच्या संदर्भात भेदभाव झाला हे मान्य करावयाचे परंतु हा भेदभाव दूर करण्यासाठी शासनाकडून काहीही प्रयत्न होत नाहीत. हे बरोबर नाही.** घटनेच्या कलम १४ प्रमाणे आपल्याला अशा प्रकारचा भेदभाव करता येत नाही, असे असतांनाही या प्रश्नाच्या संदर्भात शासनाकडून भेदभाव झालेला आहे. **या प्रश्नाच्या संदर्भात कोर्टाने २६ नोव्हेंबर, २००७ रोजी ८ आठवडयात निर्णय घ्यावा, असे निर्देश दिलेले आहेत.** या विषयाच्या संदर्भात भेदभावाचे एकूण २३ मुद्दे आहेत, हे सर्व मुद्दे महत्त्वाचे आहेत. २६ नोव्हेंबर, २००७ रोजी ८ आठवडयात निर्णय घ्यावा, असे कोर्टाने निर्देश दिलेले असतांना एक वर्ष उलटून गेले तरी शासनाकडून काही सुद्धा कार्यवाही झाली नाही, निर्णय घेतला गेला नाही. कोर्टाने जे निर्देश दिलेले आहेत त्याच्या विरुध्द आपल्याला वागता येत नाही. त्यामुळे कोर्टाने सांगितल्या प्रमाणे या विषयाच्या संदर्भात ८ आठवडयात भेदभाव संपुष्टात आणणारा निर्णय घेतला जाईल काय? तसेच हे **जे हायकोर्टाचे कागदपत्र ज्या अधिकाऱ्याने इतके दिवस दाबून ठेवले त्या अधिकाऱ्यावर कारवाई केली जाईल काय?**

**श्री.राजेश टोपे : या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी विचारलेल्या दोन्ही प्रश्नांना होय असेच उत्तर आहे.**"

**२९.** एका बाजूला मा.उच्च न्यायालयाचा निर्णय व दुसऱ्या बाजूला उच्च शिक्षण विभागाने घेतलेली भूमिका याबाबतीत सर्वच मुद्यांवर शासनाची भूमिका स्पष्ट झालेली होती. याबाबतची या दिवशीची बराच वेळ चाललेली चर्चा मुळातून वाचायची तर ती आपल्याला महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : मंगळवार, दिनांक २३ डिसेंबर २००८ : खंड १५०, क्रमांक ७ च्या पृष्ठ ११-१५ वर उपलब्ध होईल.

**३०.** सभागृहामध्ये मंगळवार, दिनांक २३ डिसेंबर २००८ रोजी जी तडाखेबंद चर्चा झाली या चर्चेमध्ये भेदभावपूर्ण वागणूक संगणकशास्त्र या विषयाला देण्यात आलेली आहे ही गोष्ट मा.उच्च शिक्षणमंत्र्यांना सभागृहात मान्य करावी लागली. याच चर्चेमध्ये **आठ आठवड्यात भेदभाव संपुष्टात आणणारा निर्णय घेतला जाईल काय? या प्रश्नाला मा.उच्च शिक्षणमंत्र्यांनी "होय" असे उत्तर दिले होते.** हस्ते पर हस्ते ही बातमी संगणकशास्त्र अनुदान कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांमार्फत या सर्व शिक्षकांपर्यंत पोहचली होती.

*सहपत्र ७ : परिच्छेद २३ पहा*

## *संगणक शास्त्र या वैकल्पिक विषयाला अनुदान देतांना दिली जाणारी भेदभावपूर्ण वागणूक*

*महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : शनिवार, दिनांक २६ जुलै २००८ : दुसरे अधिवेशन २००८*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १४९, क्रमांक ९, पृष्ठ १५७-१५९*

**श्री. प्रा.बी.टी.देशमुख व श्री. वसंतराव खोटरे** विधानपरिषद सदस्य यांनी, महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे.

"पदवी स्तरावरील अनुदानप्राप्त विज्ञान शाखेअंतर्गत शिकविल्या जाणाऱ्या संगणक शास्त्र या वैकल्पिक विषयाला अनुदान देतांना दिली जाणारी भेदभावपूर्ण वागणूक, याबाबत मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने २००७ च्या याचिका क्रमांक ९९८ मध्ये दिनांक २६ नोव्हेबर २००७ रोजी दिलेला निर्णय, **काही महाविद्यालयांना बिनाअनुदान तत्त्वावर व काही महाविद्यालयांना कायम बिना अनुदान तत्त्वावर मान्यता देण्याच्या भेदभावपूर्ण वागणुकीबाबत तपासणी करण्याचा स्पष्ट उल्लेख त्या निर्णयामध्ये असणे,** या निर्णयानुसार १९ डिसेंबर २००७ रोजी तपशीलवार पत्र पाठवून याचिका कर्त्यांनी भेदभावपूर्ण वागणुकीचे **२३ मुद्दे शासनाच्या लक्षात आणून देणे,** आठ आठवड्यामध्ये याबाबत शासनाने कायद्याला धरून निर्णय घ्यावा असे मा. उच्च न्यायालयाचे आदेश असतांनासुद्धा याबाबत कोणतीही कारवाई न होणे, "विज्ञान शाखेअंतर्गत संगणक शास्त्र या विषयास काही महाविद्यालयांना अनुदान देण्यात आले" **ही बाब शासनाने ६ फेब्रुवारी २००८ च्या पत्रान्वये मान्य करणे,** आठ आठवड्यात निर्णय होणे तर बाजूलाच राहिले याउलट "कारवाई करणे विभागास शक्य होणार नाही" असे शासनाने ६ फेब्रुवारी २००८ च्या पत्रान्वये कळविणे, ह्या सर्व बाबी संगणक शास्त्र अनुदान कृती समितीने दिनांक २६ मार्च २००८ रोजी मा. मंत्री उच्च शिक्षण यांना, उच्च शिक्षण संचालकामार्फत एक निवेदन पाठवून लक्षात आणून दिल्यानंतर सुद्धा याबाबत कोणतीही कारवाई होत नसल्याने शिक्षण क्षेत्रात निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना.

### मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे निवेदन

इलेक्टॉनिक्स, कॉम्प्युटर सायन्स, अभियांत्रिकी विज्ञान, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण हे वैकल्पिक विषय म्हणून शिकविले जातात. **संगणकशास्त्र विषयाची पदवी प्राप्त केल्यानंतर व्यवसायाच्या चांगल्या संधी उपलब्ध असल्यामुळे हा व्यावसायिक अभ्यासक्रम मानला गेला आहे.**

**सन १९८८ पर्यंत संगणक शास्त्र विषयास मंजुरी देतांना, नवीन शिक्षक वर्ग नेमावा लागत नसेल तरच प्रत्यक्षात नवीन विषय सुरू करावा या अटीवर शासनाने परवानगी दिली आहे.** शासन निर्णय ४ जानेवारी, १९८९ अन्वये टप्प्याटप्प्याने अनुदान मंजुरीचे धोरण शासनाने स्वीकारले. परंतु त्यातील अनुदानाच्या सूत्रात बदल करण्यासाठी शासन स्पष्टीकरण दिनांक ८ ऑगस्ट, १९९१ अन्वये सुधारणा करण्यात आली. **शासन निर्णय दिनांक २४ सप्टेंबर, १९९१ अन्वये, संगणक या विषयास कायम विना अनुदान तत्त्वावर मान्यता देण्यात आलेली आहे असे समजण्यात यावे, असा खुलासा करण्यात आला.** संगणकशास्त्र विषयास अद्यापही कायम विना अनुदान तत्त्वावर परवानगी देण्यात येते.

२. खालील **विशेष परिस्थितीत/कारणांमुळे काही महाविद्यालयातील संगणकशास्त्र विषयास वर नमूद अट शिथिल करून विनाअनुदान तत्त्वावर परवानगी बदलून देण्यात आली आहे.**

अ) संगणकशास्त्र हा विषय विज्ञान विद्याशाखेअंतर्गत शिकविला जातो म्हणून **विज्ञान शाखा १०० टक्के अनुदानावर असल्यास संगणकशास्त्र या विषयास ओघाने अनुदान देणे क्रमप्राप्त ठरते असे समजून अनुदान मंजूर करण्यात आले आहे.**

ब) महाविद्यालयांमध्ये विज्ञान विद्याशाखा १०० टक्के अनुदानावर असूनही संगणकशास्त्र या वैकल्पिक विषयास कायम विना अनुदान तत्त्वावर परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे विज्ञान शाखेतील प्राध्यापकांमध्ये व विद्यार्थ्यांमध्ये भेदभाव निर्माण होतो असे शासनाच्या निदर्शनास आणले गेल्यामुळे **तात्कालिन परिस्थिती लक्षात घेवून शासन स्तरावर संगणकशास्त्र विषयाची कायम विनाअनुदान तत्त्वाची अट काही महाविद्यालयांच्या बाबतीत काढून टाकण्यात आली आहे.**

शासनाच्या आर्थिक परिस्थितीवर ताण आल्याने केंद्र शासनाशी केलेल्या सामंजस्य कराराच्या अनुषंगाने दि. २४ नोव्हेंबर, २००१ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत **यापुढे शैक्षणिक संस्थांना कायम स्वरुपी विना अनुदान तत्त्वांवर खाजगी क्षेत्रात नवीन महाविद्यालय उघडण्याची परवानगी देण्यात यावी, असा निर्णय घेण्यात आला.**

अनुदानित संस्थांना अनुदान कशा स्वरुपात वितरित केले जाईल याची कार्यपद्धती शासन आदेश क्र. एनजीसी २०८८/१६५२/विशि-२ (अ), दि. ०४.०१.८९ आणि ०८.०८.९१ च्या आदेशान्वये विहित केले आहे. **राज्यामध्ये महाविद्यालयांतर्गत सर्व विद्याशाखांसाठी कायम विना अनुदानाचे धोरण सन २००१-०२ पासून राबविले जात आहे.**

याचिका क्रमांक ९९८/२००७ वर **मा. उच्च न्यायालयाने दि. २६.११.२००७ रोजी दिलेल्या आदेशानुसार उचित असा निर्णय घेण्याची बाब विभागाच्या विचाराधीन असून त्याप्रमाणे मंत्रिमंडळासमोर लवकरच प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. त्यात जो निर्णय होईल तो संगणक विद्याशाखांच्या बाबतीत लागू होईल.** शासनास प्राप्त झालेल्या दिनांक **१९ डिसेंबर २००७ रोजीच्या पत्रातील २३ मुद्यांचा खुलासा तसेच संगणकशास्त्र विषयाबाबत सुरू असलेल्या कार्यवाहीबाबतची सद्यःस्थिती संबंधित संस्थेला शासनाच्या ६ फेब्रुवारी २००८ च्या पत्रान्वये कळविण्यात आली आहे.** या अभ्यासक्रमास शासनाने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने व या अभ्यासक्रमास अनुदान देण्याविषयीची मागणी अनेक निवेदनांद्वारे (२६ मार्च २००८ सह) शासनाकडे येत असलेल्याच्या पार्श्वभूमीवर शासन मान्यता दिलेल्या महाविद्यालय/संस्थांची माहिती त्यांच्या **एकूण कार्यभारानुसार एकूण शिक्षकांची संख्या, विद्यार्थी संख्या मागविण्यात आली असून त्यानंतर यावर निर्णय घेणे शक्य होणार आहे. परंतु असा निर्णय घेण्याकरिता काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.**

वृत्तपत्रांमध्ये सुद्धा या चर्चेला चांगलीच प्रसिद्धी मिळालेली होती. त्यामुळे या शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण होते. अशा स्थितीमध्ये संगणकशास्त्र अनुदान कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी माझी भेट घेऊन संगणकशास्त्र अनुदान कृती समितीच्या वतीने राज्यस्तरीय मेळावा आम्ही आयोजित करीत आहोत. आपण उपस्थित राहून मार्गदर्शन करावे अशी विनंती केली. या समितीला व या शिक्षकांना स्वाभाविकपणे विधानमंडळाच्या स्तरावर जी काही या विषयाबाबत प्रगती झालेली आहे त्याची प्रत्यक्ष माहिती करून घ्यावी अशी इच्छा होती व त्यामुळेच मी या कार्यक्रमासाठी होकार दिला.

**३१.** हा राज्यस्तरीय मेळावा दिनांक १९ फेब्रुवारी २००९ रोजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किरणनगर, अमरावती, येथे पार पडला. श्रीमती नरसम्मा हिरय्या शैक्षणिक ट्रस्टचे सचिव श्री.नानासाहेब चिमणपूरे हे मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी होते व मला मार्गदर्शक म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. प्राचार्य डॉ.श्रीकांत देशपांडे प्रमुख अतिथी होते. संगणकशास्त्र अनुदान कृती समितीचे राज्यभरातील पदाधिकारी या मेळाव्याला हजर होते. त्यात प्रामुख्याने आंबेजोगाईचे प्रा.पराग भालचंद्र, परभणीचे प्रा.वैभव पाठक, कोल्हापूरचे प्रा.लक्ष्मीकांत गावंडे, गोंदियाचे प्रा.राकेश धुवारे, अचलपूरचे प्रा.लक्ष्मीधर मुळे, अमरावतीचे प्रा.चंद्रशेखर सावरकर, जळगावचे प्रा.बऱ्हाटे, पुण्याचे प्रा.अरुण नागर्डे, कोल्हापूरचे प्रा.दिपक पाटील इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी संघटनेतर्फे झालेल्या व होत असलेल्या प्रयत्नांचे तपशील विशद केले.

**३२.** या राज्यस्तरीय मेळाव्याला मार्गदर्शन करतांना भेदभावपूर्ण वागणूक देण्यात आलेली आहे याची नोंद सभागृहात होणे ही मोठी उपलब्धी आहे. त्याबरोबरच असा भेदभाव संपुष्टात आणण्याचे मुदतबंद आश्वासन मा.उच्च शिक्षणमंत्र्यांनी सभागृहात दिले हीसुद्धा फार मोठी उपलब्धी आहे असे सांगून याविषयी सभागृहात झालेल्या चर्चेची तपशीलवार माहिती मी या मेळाव्यामध्ये विशद केली.

**३३.** बऱ्याच दिवसांपासून एखादा प्रश्न सुटलेला नाही किंवा सुटत नाही व सभागृहातील चर्चेमुळे प्रश्न सुटणार अशी थोडी जरी आशा निर्माण झाली तरी ती गोष्ट उच्च शिक्षण विभाग व उच्च शिक्षण संचालनालयातील कारकून मंडळींना लवकर समजते व त्यांच्यामार्फत गैरमार्गाचा वापर करण्यासाठी आघाडी उघडल्या जाते व तक्रारदारांपैकी काही लोक याला बळी पडतात. अशा स्थितीत मुख्य तक्रारदारांच्या प्रयत्नात दुबळेपणा येतो व त्या प्रमाणात सभागृहातील संघर्षसुद्धा ढिला पडू शकतो, असा माझा यापूर्वी काही प्रकरणात आलेला अनुभव होता. या मेळाव्याचा मुख्य फायदा असा झाला की, संगणकशास्त्र अनुदान कृती समितीच्या नेतृत्वाखाली एकत्रित झालेले हे सर्व शिक्षक राज्यभर कोणत्याही गैरमार्गाला बळी पडायचे नाही व विधिमय मार्गानेच आपला प्रश्न आपल्या संघटनेच्या प्रयत्नांनी सुटू शकतो व सुटेल असा आत्मविश्वास घेऊन आपआपल्या गावी परतले. ही या राज्यस्तरीय मेळाव्याची फार मोठी उपलब्धी होती असे म्हणावे लागेल.

**३४.** "**संगणक शास्त्र या वैकल्पिक विषयाला अनुदान देतांना दिली जाणारी भेदभावपूर्ण वागणूक**" या विषयावरील आमचा तारांकित प्रश्न क्रमांक ५०१६६ हा गुरुवार, दिनांक ४ जून २००९ रोजी विधानपरिषदेमध्ये तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये समाविष्ट होता. "पदवी स्तरावरील अनुदानप्राप्त विज्ञान शाखेअंतर्गत शिकविल्या जाणाऱ्या संगणक शास्त्र या वैकल्पिक विषयाला अनुदान देताना दिल्या जाणाऱ्या भेदभावपूर्ण वागणुकीबाबत मा. उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने २००७ ची याचिका क्रमांक ९९८ मध्ये दिलेल्या निर्णयाप्रमाणे कारवाई करण्याच्या विचाराधीन प्रश्नावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय;" या प्रश्न भाग एक ला मा.उच्च शिक्षणमंत्र्यांनी "या. क्र. ९९८/२००७ या न्यायालयीन प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिलेल्या निर्णयानुसार संगणकशास्त्र या विषयास अनुदान मंजूर करण्यासाठी राज्य मंत्रीमंडळापुढे प्रस्ताव सादर करण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे." "याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे;" या प्रश्न भाग दोनच्या उत्तरामध्ये त्यांनी "अद्याप निर्णय झालेला नाही" असे नमूद केले होते.

**३५.** याच विषयावर सन २०१० च्या पहिल्याच अधिवेशनामध्ये अतारांकित प्रश्न शुक्रवार, दिनांक २६ मार्च २०१० रोजीच्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये समाविष्ट होता. "पदवी स्तरावरील अनुदानप्राप्त विज्ञान शाखेअंतर्गत शिकविल्या जाणाऱ्या संगणक शास्त्र या वैकल्पिक विषयाला अनुदान देताना दिल्या जाणाऱ्या भेदभावपूर्ण वागणुकीबाबत मा. उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने २००७ ची याचिका क्रमांक ९९८ मध्ये दिलेल्या निर्णयाप्रमाणे कारवाई करण्याच्या विचाराधीन प्रश्नावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय;" या प्रश्न भाग एक ला मा.उच्च शिक्षणमंत्र्यांनी "याचिका क्रमांक ९९८/२००७ या न्यायालयीन प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिलेल्या निर्णयानुसार संगणकशास्त्र या विषयास अनुदान मंजूर करण्यासाठी मंत्रीमंडळाच्या विचारार्थ प्रस्ताव सादर करण्यात येत आहे." असे उत्तर दिले होते. सारांश काय तर २००९ च्या शेवटी व २०१० च्या सुरुवातीला उत्तरे तीच ती होती. कंटाळा न करता अशी उत्तरे गोळा करावी लागतात कारण पुढे होणाऱ्या प्रश्नोत्तराच्या वेळी त्यामुळे दबाव वाढत जातो.

**३६.** आता तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून या प्रश्नावर सभागृहात चर्चा घडवून आणण्याची आवश्यकता होती. त्याबाबतीत आम्हाला सन २०१० च्या पहिल्या अधिवेशनामध्ये उत्तम यश मिळाले. आमचा तारांकित प्रश्न क्रमांक २६३५ हा गुरुवार, दिनांक १ एप्रिल २०१० रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये समाविष्ट होता व तो पाचव्याच क्रमांकावर असल्यामुळे त्यावर तपशीलवार चर्चा होण्याची शक्यता होती व तशी ती झालीसुद्धा. "पदवी स्तरावरील अनुदानप्राप्त विज्ञान शाखेअंतर्गत शिकविल्या जाणाऱ्या संगणक शास्त्र या वैकल्पिक विषयाला अनुदान देतांना दिल्या जाणाऱ्या भेदभावपूर्ण वागणुकीबाबत मा.उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने २००७ च्या याचिका क्रमांक ९९८ मध्ये दिलेल्या निर्णयाप्रमाणे कारवाई करण्याच्या विचाराधीन प्रश्नावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय," या प्रश्न भाग एक ला उच्च शिक्षणमंत्र्यांनी एका शब्दात "नाही" असे उत्तर दिले होते. त्यामुळे उच्च न्यायालयाचा निर्णय, तसेच भेदभावाचे वेगवेगळे मुद्दे व भेदभाव आहे हे शासनाने मान्य केले ह्या साऱ्या गोष्टी सभागृहात उघड करणे आवश्यक होते व त्याचा योग्य तो परिणामही झाला. कारण मा.उच्च शिक्षण राज्यमंत्र्यांनी "एका हप्त्यामध्ये हा विषय निर्णयासाठी कॅबिनेट पुढे घेऊन जाऊ" असे आश्वासन दिले. सभागृहाच्या अधिकृत प्रतिवेदनातून ती चर्चा शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, 'शासन स्तरावर कार्यवाही चालू आहे, हे उत्तर नॉर्मली बरोबर आहे पण हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतर सुध्दा दोन दोन वर्षे ही कार्यवाही चालूच आहे हे बरोबर नाही. सभापती महोदय, मी आपली परवानगी मागतो. सभागृहाचा वेळ घेण्याची माझी कधीच इच्छा नसते पण माननीय उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने २००७ च्या याचिका क्रमांक ९९८ मध्ये दिनांक २६ नोव्हेंबर, २००७ मध्ये निकाल दिलेला आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "However, if the State Government has granted permission to some colleges and institutions to start the above subject on No Grant Basis, in that case, we permit the Petitioner to make representation in this regard to the State Government within a period of four weeks from today and if such representation is made, the State Government is directed to take decision on merit, according to the Law and Procedure applicable in this regard, within a period of 8 weeks of the date of such representation." सभापती महोदय, माननीय उच्च न्यायालयाने निर्णय दिला दि.२६ नोव्हेंबर, २००७ रोजी. याचिकाकर्त्यांनी दि.१९-१२-२००७ रोजी रिप्रेझेंन्टेशन किंवा निवेदन आपणास सादर केलेले आहे. त्यानंतर आठ आठवडयाच्या आत शासनाने याबाबतचा निर्णय घ्यावयाचा होता पण तसा तो घेतला नाही. सभागृहामध्ये याबाबतीत काय निर्णय घेण्यात येणार आहे, सांगण्यात आले आहे. २३ भेदभावाचे मुद्दे त्या निवेदनामध्ये आपल्या लक्षात आणून दिले, हे खरे आहे काय ? असा प्रश्न विचारला असता आपण 'होय' अशा पद्धतीचे उत्तर दिलेले आहे. शासनाने केवळ 'होय' असे उत्तर दिलेले नाही तर सभागृहामध्ये २३.१२.२००८ रोजी माननीय मंत्रिमहोदयांनी सभागृहात असे सांगितले की, "**पुढच्या अधिवेशनाच्या अगोदर हा विषय उच्च शिक्षण विभागाकडून मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी आणला जाईल आणि पुढील अधिवेशनाच्या अगोदर या विषयाच्या संदर्भात सकारात्मक निर्णय घेतला जाईल,**" पण तसा निर्णय घेतला गेला नाही. सभापती महोदय, त्यानंतर एक ॲफिडेव्हिट शासनाच्या वतीने कोर्टामध्ये करण्यात आले. त्यावर कोर्टाने निर्णय दिलेला आहे. खरे म्हणजे हे सचिवांचे काम असते. दुसऱ्या एका प्रकरणामध्ये प्रधान सचिवांना ५० हजार रुपये दंड झाला, तिसऱ्या एका प्रकरणामध्ये त्यांना ५ हजार रुपये दंड झाला. या प्रकरणामध्ये दंड झालेला नाही. परंतु हायकोर्टाने शासनाच्या ॲफिडेव्हिट बाबत जो निर्णय दिला त्यामध्ये असे म्हटले आहे की,

"....it is mentioned in the affidavit that the proposal of the Petitioners for grant-in-aid could not be decided by the Cabinet/ Competent Authority because of imposition of Code of Conduct by the Election Commissioner. It is also mentioned in the affidavit that as soon as period of Code of Conduct comes to an end, issue about extending grant-in-aid to the computer science course run by the Petitioners will be placed before the Cabinet/ Competent Authority for necessary consideration and decision."

हायकोर्टाने पुढे असे म्हटले आहे की, "In the circumstances, we dispose of the writ petition and expect that the decision be taken as early as possible after the period of Code of Conduct comes to an end.' माझे असे म्हणणे आहे की, आपण स्वतः सभागृहामध्ये सांगितले की, आठ आडवड्यांच्या आत आम्ही निर्णय घेऊ. भेदभाव झालेला आहे. निरनिराळे २३ प्रकारचे भेदभाव आहेत. ते भारतीय संविधानाच्या खंड १४ च्या विरुद्ध आहे. आपण याबाबतीतील निर्णय आठ दिवसांमध्ये, पंधरा दिवसांमध्ये घेणार काय?

**प्रा.वर्षा गायकवाड :** सभापती महोदय, जेव्हा आपण या कोर्सला अनुदान दिले होते त्यावेळी तो ऑप्शनल विषय होता. त्यानंतर कॉम्प्युटर सायन्स हा विषय रेग्युलर चालू झाला आहे. त्यानंतर मधल्या काळात कायम विनाअनुदानितचा कायदा आणला. सन्माननीय सदस्यांचा असा प्रश्न आहे की, एका हप्त्यामध्ये निर्णय घेणार काय? एका हप्त्यामध्ये हा विषय निर्णयासाठी कॅबिनेटपुढे घेऊन जाऊ. *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरुवार, दिनांक १ एप्रिल, २०१० : खंड १५५, क्रमांक ११, पृष्ठ ३३ ते ३४)*

**३७. "संगणकशास्त्र या वैकल्पिक विषयाला अनुदान देतांना दिली जाणारी भेदभावपूर्ण वागणूक"** या विषयीच्या आमच्या लक्षवेधी सूचनेवरील शासनाचे निवेदन शुक्रवार, दिनांक २३ एप्रिल २०१० रोजी सभागृहाच्या पटावर ठेवण्यात आले. मूळ लक्षवेधी सूचनेमध्ये कोण कोणते मुद्दे उपस्थित करण्यात आले होते हे लक्षात येण्यासाठी लक्षवेधी सूचनेचा मसुदा शब्दशः पुढीलप्रमाणे :-

*सहपत्र ८ : परिच्छेद ४८ पहा*

*अकृषी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील संगणकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स व शारीरिक शिक्षण या विषयांना अनुदान मंजूर करण्याबाबत*

## *महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्र शिक्षण विभाग*

**शासन निर्णय क्रमांक : नाविस २००५/(७६/०५)/मशि-४ : मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२**

**दिनांक : ४ एप्रिल, २०१२**

**वाचा :** (१) शासन निर्णय एनजीसी-२०८८/(१६५२)/विशि-२ (अ), दिनांक : ४ जानेवारी, १९८९

(४) शासन निर्णय एनजीसी-२०९१/(३५६७)/विशि-२ (अ), दिनांक : ८ ऑगस्ट, १९९१

(५) शासन निर्णय एनजीसी-१०९१/(१६५२)/विशि-२ (अ), दिनांक : २४ सप्टेंबर, १९९१

***प्रस्तावना***

राज्यातील खाजगी अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्र व विधी महाविद्यालयांना शासनाकडून वेतन व वेतनेतर अनुदान मंजूर करण्यात येते. **यापैकी व्यावसायिक महाविद्यालय वा अभ्यासक्रमास अनुदान देण्याचे शासनाचे धोरण नाही. राज्यातील काही महाविद्यालयात सन १९८८ पर्यंत "नवीन शिक्षकवर्ग नेमावा लागत नसेल तरच प्रत्यक्षात नवीन विषय सुरू करावा" या अटीवर विज्ञान व वाणिज्य विद्याशाखेमध्ये संगणकशास्त्र विषयास मान्यता देण्यात आली.** त्यानंतर शासननिर्णय दिनांक ४ जानेवारी, १९८९ अन्वये खाजगी महाविद्यालयांना अनुदान देण्याविषयीचे सुधारित धोरण शासनाने स्वीकारले. त्यामध्ये चौथ्या वर्षापासून १०० टक्के अनुदान मंजूर करण्याची तरतूद करण्यात आली. तद्नंतर शासननिर्णय दिनांक ८ ऑगस्ट, १९९१ अन्वये अनुदान सूत्रात बदल करण्यात येऊन ४ थ्या वर्षानंतर २५ टक्के, ५ व्या वर्षानंतर ५० टक्के, ६ व्या वर्षानंतर ७५ टक्के आणि ७ व्या वर्षानंतर १०० टक्के अनुदान देण्याची सुधारणा करण्यात आली. शासननिर्णय एनजीसी २०९१/३५६७-विशि-२ अ, दि. ८.८.१९९१ अन्वये **अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांना नवीन विद्याशाखा/नवीन विषय/नवीन अभ्यासक्रम/जादा तुकड्या मंजूर केल्यास त्यांना अनुदानाचे सूत्र लागू करण्यात आले.**

२. इलेक्ट्रॉनिक्स हा विषय बी.एससी. अभ्यासक्रमातंर्गत वैकल्पिक विषय म्हणून मंजूर न करण्याचा निर्णय शासननिर्णय क्र. युपीए १०८५/११०४२०/(९३१५)-विशि-१, दि. ३० मार्च १९८८ अन्वये निर्गमित केला आहे. तरीही, **नवीन महाविद्यालयाचे प्रस्ताव पाठवितांना विषयांची सूची न जोडली गेल्यामुळे १९८९-९० नंतरच्या कालावधीत विद्यापीठाने प्रस्तावित केल्यानुसार शासनाने नवीन महाविद्यालयांना परवानगी दिली, त्यामध्ये इलेक्ट्रॉनिक्स या विषयाला मान्यता दिली गेली.** अशा संगणकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स किंवा शारीरिक शिक्षण या विषयांना देखील अनुदानासाठी पात्र धरले जाण्याची शक्यता होती, या कारणास्तव शासन पुरकपत्र दिनांक **२४ सप्टेंबर, १९९१ अन्वये १९८९-९० पूर्वी संगणकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स व शारीरिक शिक्षण या विज्ञान व वाणिज्य विद्याशाखांतर्गत विषयांना जरी विना अनुदान तत्वावर मान्यता दिली असली तरी ती "कायम विना अनुदान" तत्वावर देण्यात आलेली आहे, असे समजण्यात यावे** असा खुलासा करण्यात आला. तसेच कॉम्प्युटर सायन्स/अभियांत्रिकी विज्ञान व तद्नुषंगिक विषयही पदवी स्तरावर विज्ञान व वाणिज्य विद्याशाखांमध्ये विषय म्हणून कायम विना अनुदान तत्वावर मंजूर करण्यात येतात. नवीन महाविद्यालयांच्या प्रस्तावात अथवा अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात नवीन विद्याशाखा सुरू करण्याच्या प्रस्तावात विद्यापीठाने हे विषय दिले असल्यास ते कायम विना अनुदान तत्वावर आहेत असे समजावे. त्याचबरोबर शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण हे वैकल्पिक विषय अथवा स्पेशल विषय असल्यास ते कायम विना अनुदान तत्वावर समजण्यात यावेत असेही सदर दि. २४.९.१९९१ च्या पुरकपत्राद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे. परिणामी या कालावधीपर्यंत मंजूर करण्यात आलेल्या अशा सर्व विषयांच्या मंजुरी कायम विना अनुदान तत्वावर समजण्यात आल्या. **असे असले तरी पुढीलप्रमाणे मंजुरीमध्ये काही विसंगती झाल्या.**

(अ) संगणकशास्त्र -

(१) महाविद्यालयांची "नवीन शिक्षकवर्ग नेमावा लागत नसेल तरच प्रत्यक्षात नवीन विषय सुरू करावा" ही अट २४ मे १९८९, १२ जून १९८९, ९ सप्टेंबर १९९१ च्या आदेशाद्वारे शिथिल करण्यात येऊन काही महाविद्यालयातील विषयांना विना अनुदान तत्वावर आणण्यात आले.

(२) याशिवाय काही महाविद्यालयांना, त्या महाविद्यालयाच्या संगणकशास्त्र विषयास दिनांक २४ सप्टेंबर १९९१ पूर्वी मान्यता देण्यात आलेली असल्याने कायम विना अनुदान तत्वाची अट बदलून विना अनुदान तत्वावर मंजुरी देण्यात आली.

(३) काही महाविद्यालयांनी संगणकशास्त्र विषय सुरू केला व नंतर शासनाची मान्यता प्राप्त केली. या कारणास्तव कायम विना अनुदानाची अट बदलून देण्यात आली.

(४) संगणकशास्त्र हा विषय विज्ञान शाखेअंतर्गत शिकविला जातो. विज्ञान शाखा १०० टक्के अनुदानावर असल्याने संगणकशास्त्र हा विषय देखील अनुदानास पात्र ठरतो, असे समजून कायम विना अनुदानाची अट शिथिल करण्यात आली.

(५) काही महाविद्यालयांना खास बाब म्हणून व पूर्वोदाहरण न समजण्याच्या अटीवर या विषयाची कायम विना अनुदान तत्वाची अट बदलून विना अनुदानाच्या अटीवर मंजुरी देण्यात आलेली आहे.

अशा प्रकारे १८ खाजगी महाविद्यालयांना संगणकशास्त्र विषय कायम विना अनुदान तत्वाची अट बदलून मंजुरी दिली गेली आहे.

(ब) शारीरिक शिक्षण व इलेक्ट्रॉनिक्स -

नवीन महाविद्यालयाचे प्रस्ताव पाठवितांना विषयांची सूची न जोडल्याने विद्यापीठांनी विहित केलेल्या महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमातील विषय समजून १९८५ ते २००० या कालावधीतील इलेक्ट्रॉनिक्स विषयास अनुदान देण्यात येत आहे. सध्या अशी एकूण ८९ महाविद्यालये आहेत. याच कारणास्तव शारीरिक शिक्षण विषयासही अनुदान देण्यात येत असून या महाविद्यालयांची संख्या १० इतकी आहे.

३. आर्थिक निर्बंधाच्या पार्श्वभूमीवर दि. २४.११.२००१ रोजी मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयास अनुसरुन सन २००१-०२ पासून कायम विना अनुदानाचे धोरण सर्व विषयाकरिता अंमलात आले. तसेच वर दि. २४.९.१९९१ च्या शासन पुरक पत्राद्वारे स्पष्टीकरण दिल्यानंतरही जून २००१ पर्यंत संगणकशास्त्र विषय सुरू असलेल्या एकूण १८ अनुदानित महाविद्यालयांना संगणकशास्त्र या

"पदवी स्तरावरील अनुदानप्राप्त विज्ञान शाखेअंतर्गत शिकविल्या जाणाऱ्या संगणकशास्त्र या वैकल्पिक विषयाला अनुदान देताना दिल्या जाणाऱ्या भेदभावपूर्ण वागणुकीबाबत मा.उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने २००७ च्या याचिका क्रमांक ९९८ मध्ये दिलेल्या निर्णयाप्रमाणे कारवाई करण्याच्या बाबतीत सातत्याने होत असलेला विलंब पुढच्या अधिवेशनाच्या अगोदर हा विषय उच्च शिक्षण विभागाकडून मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी आणला जाईल आणि पुढील अधिवेशनाच्या अगोदर या विषयाच्या संदर्भात सकारात्मक निर्णय घेतला जाईल. असे दिनांक २३ डिसेंबर, २००८ रोजी व त्यानंतर या.क्र. ९९८/२००७ या न्यायालयीन प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिलेल्या निर्णयानुसार संगणकशास्त्र या विषयास अनुदान मंजूर करण्यासाठी राज्य मंत्रीमंडळापुढे प्रस्ताव सादर करण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे. असे दिनांक ४ जून २००९ रोजी सभागृहात सांगून सुद्धा याबाबत कोणतीही कारवाई झालेली नसल्याने संबंधित शिक्षकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाहीः अधिकृत प्रतिवेदन : शुक्रवार, दिनांक २३ एप्रिल, २०१० : खंड १५५, क्रमांक २५, पृष्ठ १३० ते १३१)*

**३८.** शासनाच्या निवेदनामध्ये कायम विना अनुदानाचे धोरण सन २००१ पासून अंमलात आले असले तरी काही बाबतीत विसंगती निर्माण झाली असे नमूद करून विसंगतीचे निरनिराळे पाच प्रकार शासनाच्या निवेदनात नमूद केले होते. निवेदनातील तो भाग शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"सन २०००-०१ पासून कायम विना अनुदानाचे धोरण सर्व विषयाकरिता अंमलात आले. तथापि, या धोरणाच्या अनुषंगाने खालील विसंगती निर्माण झाली.

१. नवीन शिक्षक नेमावा लागत नसेल तरच प्रत्यक्षात नवीन विषय सुरू करावा ही अट शिथिल करण्यात येऊन १२ महाविद्यालयांना विना अनुदान तत्वावर आणण्यात आले.

२. महाविद्यालयांची "नवीन शिक्षकवर्ग नेमावा लागत नसेल याशिवाय काही महाविद्यालयांना, त्या महाविद्यालयाच्या संगणकशास्त्र विषयास दिनांक २४ सप्टेंबर, १९९१ पूर्वी मान्यता देण्यात आलेली असल्याने कायम विना अनुदान तत्वाची अट बदलून विना अनुदान तत्त्वावर मंजुरी देण्यात आली.

३. काही महाविद्यालयांनी संगणकशास्त्र विषय सुरू केला व नंतर शासनाची मान्यता प्राप्त केली. या कारणास्तव कायम विना अनुदानाची अट बदलून देण्यात आली.

४. संगणकशास्त्र हा विषय विज्ञान शाखेअंतर्गत शिकविला जातो. विज्ञानशाखा १०० टक्के अनुदानावर असल्याने संगणकशास्त्र हा विषय देखील अनुदानास पात्र ठरतो, असे समजून कायम विना अनुदानाची अट शिथिल करण्यात आली.

५. काही महाविद्यालयांना खास बाब म्हणून व पूर्वोदाहरण न समजण्याच्या अटीवर कायम विना अनुदान तत्त्वाची अट बदलून विना अनुदानाच्या अटीवर मंजुरी देण्यात आलेली आहे." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाहीः अधिकृत प्रतिवेदन : शुक्रवार, दिनांक २३ एप्रिल, २०१० : खंड १५५, क्रमांक २५, पृष्ठ १३१ ते १३२)*

**४०.** शासनाच्या या निवेदनामध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचा सुद्धा उल्लेख करण्यात आला होता तो शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"रिट याचिका क्र. ९९८/२००७ श्रीमती नरसम्मा हिरय्या एज्युकेशन ट्रस्ट, अमरावती विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर या प्रकरणी मात्र मा.उच्च न्यायालयाने, पिटीशनरला राज्यशासनाकडे योग्य ते निवेदन करण्याची अनुमती देऊन अशा प्रकारच्या निवेदनावर शासनाने ८ आठवड्याच्या आत निर्णय घेण्याचे निर्देश दिले होते."

**४१.** सभागृहामध्ये यापूर्वी दिलेल्या दिलेल्या आश्वासनांचा सुद्धा उल्लेख या निवेदनामध्ये होता. तो पुढीलप्रमाणे :-

"३. याच विषयावर विधानपरिषदेत दिनांक १ एप्रिल, २०१० रोजी तारांकित प्रश्न क्रमांक २६३५ सभागृहात चर्चेला आला असता सदर प्रश्नाच्या अनुषंगाने सभागृहाच्या चर्चेत हा विषय निर्णयासाठी मंत्रीमंडळापुढे घेऊन जाऊ असे आश्वासन देण्यात आले आहे. या सर्व बाबी विचारात घेऊन मंत्रीमंडळाच्या विचारार्थ प्रस्ताव सादर करण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाहीः अधिकृत प्रतिवेदन : शुक्रवार, दिनांक २३ एप्रिल, २०१० : खंड १५५, क्रमांक २५, पृष्ठ १३२)*

**४२.** दिनांक २६ जुलै २००८ पासून तर २३ जुलै २०१० पर्यंत निरनिराळ्या सात वेळेला हा प्रश्न सभागृहामध्ये चर्चेसाठी किंवा उत्तरासाठी आला. यावेळेला झालेल्या चर्चेचे सर्व तपशील शब्दशः सहपत्र म्हणून या लेखासोबत प्रसृत करण्याचा मुळात विचार होता. परंतु स्थलाअभावी तसे करणे शक्य नाही असे दिसून येते. पण या विषयावरील चर्चेची अधिकृत प्रतिवेदने मुळातून पहावयाची असतील तर त्यासाठी मुद्दाम महाराष्ट्र विधानपरिषदेच्या कार्यवाहीच्या अधिकृत प्रतिवेदनाचे तपशील नमूद करण्यात येत आहेत. ते पुढीलप्रमाणे :-

## *संगणक शास्त्र या वैकल्पिक विषयाला अनुदान देतांना दिली जाणारी भेदभावपूर्ण वागणूक*

**(१)** महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : दुसरे अधिवेशन २००८ शनिवार, दिनांक २६ जुलै २००८ अधिकृत प्रतिवेदन, खंड १४९, क्रमांक ९, पृष्ठ १५७-१५९

---

विषयास अनुदान दिले जात आहे. तसेच इलेक्ट्रॉनिक्स या विषयास सदरील कालावधीत सुरू असलेल्या एकूण ८९ महाविद्यालयांना अनुदान दिले जात आहे व शारीरिक शिक्षण या विषयास सदरील कालावधीत एकूण १० महाविद्यालयास अनुदान दिले जात आहे. राज्यातील काही महाविद्यालयांना संगणकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स व शारीरिक शिक्षण विषय कायम विना अनुदान तत्वावर बदलून विना अनुदान तत्वावर मंजूर केल्याने राज्यातील इतर महाविद्यालयांनी त्यांचेकडील याच विषयासाठी कायम विना अनुदानाची अट बदलण्याची शासनाकडे मागणी केली. **सदर एकाच विषयी दोन वेगवेगळ्या भूमिका ही विसंगती दूर करण्याची बाब विचारात घेता सन १९८८-८९ पूर्वी तसेच १९८९ ते १९९१ व १९९१ ते जून २००१ पर्यंत राज्यातील राहिलेल्या** अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील संगणकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स व शारीरिक शिक्षण या विषयांना अनुदान तत्वात बदल करून अनुदान मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

### *शासननिर्णय*

अकृषी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील संगणकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स व शारीरिक शिक्षण या विषयांना अनुदान मंजूर करण्याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

१. शासनाने सन १९८८-८९ पूर्वी, तसेच १९८९ ते २३.९.१९९१ व **१९९१ ते जून २००१ पर्यंत ज्या महाविद्यालयांना त्यांच्या विज्ञान व वाणिज्य विद्याशाखांतर्गत संगणकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स व शारीरिक शिक्षण या विषयांना कायम विनाअनुदानाच्या अटीवर परवानगी दिली होती, त्यात सुधारणा करून या शासननिर्णयासोबतच्या परिशिष्ट-अ प्रमाणे संगणकशास्त्र-१००, परिशिष्ट-ब प्रमाणे इलेक्ट्रॉनिक्स-१३, व परिशिष्ट-क प्रमाणे शारीरिक शिक्षण-४१ महाविद्यालयातील विषयांना अनुदान तत्वात बदल करून दि. १ एप्रिल, २०१२ पासून १००% अनुदानावर आणण्यास मंजुरी देण्यात येत आहे.**

२. **वरीलप्रमाणे एकूण १५४ महाविद्यालयातील वाणिज्य/विज्ञान शाखेतील सदर विषयांसाठी ऑक्टोबर २०१० च्या विद्यार्थी संख्येवर एकूण २६१ पदे अनुदानास पात्र राहतील** आणि विहित अर्हताप्राप्त व विधीवत विहित मार्गाने नियुक्त झालेल्या व्यक्ती अशा पदांवर पदस्थापित असतील तरच अनुदान देय राहील.

३. हे अनुदान शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अटी व निकष पूर्ण करणाऱ्या महाविद्यालयांनाच मंजूर करण्यात येईल.

४. यासाठी येणाऱ्या अतिरिक्त योजनेतर अंदाजे रु. ८.०० कोटी इतक्या आवर्ती खर्चास मान्यता देण्यात येत असून सदर खर्च "मागणी क्र. डब्ल्यू-२, २२०२-सर्वसाधारण शिक्षण, ०३-विद्यापीठीय व उच्च शिक्षण, १०४-अशासकीय महाविद्यालयांना व संस्थांना सहाय्य, (०१) (०१) - अशासकीय वाङ्मय, विज्ञान, वाणिज्य व विधी महाविद्यालयांना अनुदाने (२२०२ ०८७२), ३६-सहाय्यक अनुदाने (वेतन) या लेखाशिर्षाखाली मंजूर होणाऱ्या दरवर्षीच्या तरतुदींतून भागविण्यात यावा.

हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ५८/१२/व्यय-५, दि.१०.२.२०१२ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासननिर्णय www.maharashtra.gov.in ह्या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१२०४०४०८१८०३४३००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(सदाशिव शिवदास)**

सहसचिव, महाराष्ट्र शासन

(२) महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : तिसरे अधिवेशन २००८ मंगळवार, दिनांक २३ डिसेंबर २००८ अधिकृत प्रतिवेदन, खंड १५०, क्रमांक ७, पृष्ठ ११-१५

(३) महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : दुसरे अधिवेशन २००९ गुरुवार, दिनांक ४ जून २००९ अधिकृत प्रतिवेदन, खंड १५२, क्रमांक ४, पृष्ठ ४७

(४) महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : पहिले अधिवेशन २०१० शुक्रवार, दिनांक २६ मार्च २०१० अधिकृत प्रतिवेदन, खंड १५५, क्रमांक ७, पृष्ठ वि.प. ५ (१)

(५) महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाहीः पहिले अधिवेशन, २०१० गुरुवार, दिनांक १ एप्रिल, २०१० अधिकृत प्रतिवेदन, खंड १५५, क्रमांक ११, पृष्ठ ३२ ते ३४

(६) महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाहीः पहिले अधिवेशन, २०१० शुक्रवार, दिनांक २३ एप्रिल, २०१० अधिकृत प्रतिवेदन, खंड १५५, क्रमांक २५, पृष्ठ १३० ते १३२

(७) महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : दुसरे अधिवेशन २०१० शुक्रवार, दिनांक २३ जुलै २०१० अधिकृत प्रतिवेदन, खंड १५६, क्रमांक ९, पृष्ठ ३३ ते ३५

**४३.** शुक्रवार, दिनांक २३ जुलै २०१० रोजी "**संगणक शास्त्र या वैकल्पिक विषयाला अनुदान देतांना दिली जाणारी भेदभावपूर्ण वागणूक**" या विषयावरील आमचा तारांकित प्रश्न क्रमांक ६९१२ हा तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये समाविष्ट होता. तो क्रमांक ६ वर असल्यामुळे त्यावर अनुपूरक चर्चा होण्याची शक्यता होती व तशी ती झालीसुद्धा. या प्रश्नावर सभागृहात चर्चा होण्याच्या पूर्वी उच्च शिक्षणमंत्री श्री.राजेश टोपे यांनी मला सभागृहाच्या लॉबीमध्ये बोलाविले व असे सांगितले की, "मी सभागृहामध्ये आश्वासन दिल्याप्रमाणे आमची पुढील कारवाईची सर्व तयारी पूर्ण झालेली आहे. मात्र संगणकशास्त्र हा विषय सोडून इतर विषयांची माहिती आमच्याकडे येण्यास होत असलेल्या विलंबामुळे थोडा उशीर झालेला आहे. तथापि, याबाबतीत सोमवारी मी स्वतः मुख्यमंत्र्यांकडे विनंती करून बैठक आयोजित केली असून या प्रश्नाचा निकाल लावण्याचा माझा विचार आहे. माझी थोडी अडचण असल्यामुळे आज उत्तरे राज्यमंत्री देतील." यावर तुम्ही मला आता जे सांगितले ते मा.राज्यमंत्र्यांनी सभागृहात सांगितले पाहिजे असे त्यांना मी म्हणालो. मुख्यमंत्र्यांकडे सोमवारी बैठक लावण्यात येईल असे जेव्हा श्री.राजेश टोपे सांगतात त्यावेळेला त्या गोष्टीला निश्चितच अर्थ आहे/असतो. असा माझा पुर्वानुभव होता. तो पुर्व अनुभव याठिकाणी नमूद करणे मला आवश्यक वाटते.

**४४.** सहाव्या वेतन आयोगाच्या संघर्षाच्या काळामध्ये सन १९९१ ते २००० या काळात भरती झालेले नेट-सेट मुक्त शिक्षक हे बेकायदेशीरपणे भरती झालेले असून त्यांना सहाव्या वेतन आयोगातील कोणतीही वेतनश्रेणी द्यायची नाही असे उच्च शिक्षण विभागाचे सचिव श्री.सहारिया यांनी धोरण ठरविले होते. त्याप्रमाणे दिनांक १२ ऑगस्ट २००९ रोजी शासननिर्णयसुद्धा निर्गमित करण्यात आला होता. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने बेमुदत कामबंद आंदोलन जाहीर केले होते व सचिवांच्या या भूमिकेला संपूर्ण महाराष्ट्रभर तीव्र विरोध होत होता. अशा स्थितीत दिनांक २० ऑगस्ट २००९ रोजी मा.मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण यांनी बैठक बोलाविली. या बैठकीला स्वतः मुख्यमंत्री, उच्च शिक्षणमंत्री, महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे कार्यकारी मंडळ व उच्च शिक्षण सचिव उपस्थित होते. मा.मुख्यमंत्र्यांनी सचिवांना **(i)** चौथ्या वेतन आयोगाच्या वेळी यांना तुम्ही बॉटम स्केल दिले होते काय? **(ii)** पाचव्या वेतन आयोगाच्या

*सहपत्र ९ : परिच्छेद ७१ पहा*

## *शासन निर्णय क्र. नाविस २००५/(७६/०५)/मशि-४ दि. ४ एप्रिल, २०१२ सोबतचे जोडपत्र-अ*

*टिप : सदरहू जोडपत्रातील उतारा : सुरुवातीला महाविद्यालयाचे नाव व त्यानंतर अनुज्ञेय पदाची संख्या नमूद केलेली आहे.*

### *संगणकशास्त्र विषय*

**_जळगाव विभाग_**

(१) धनाजी नाना चौधरी विद्या प्रबोधनीचे कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, जळगांव (१ पद)

(२) सहजीवन शिक्षण प्रसारक मंडळाचे राणी लक्ष्मीबाई कला व विज्ञान महाविद्यालय, पारोळा ता.पारोळा जि.जळगांव (१ पद)

(३) किसान विद्या प्रसारक संस्थेचे एस.पी.डी.एम. कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे (१ पद)

(४) नं.ता.वि.स. गजमल तुळशीराम पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदूरबार (१ पद)

(५) आदिवासी सेवा सहायक मंडळाचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नवापूर जि.नंदूरबार (१ पद)

(६) लेवा एज्युकेशन युनियनचे डॉ.अे.जी.डी.बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगांव (३ पदे)

(७) सरस्वती विद्या प्रसारक मंडळ संचालित पी.के.कोटेचा महिला महाविद्यालय, भुसावळ जि.जळगांव (१ पद)

(८) दि भुसावळ पिपल्स बँक चॅरिटेबल संस्थेचे देविदास नामदेव भोळे महाविद्यालय, भुसावळ जि.जळगांव (५ पदे)

(९) श्रीमती जी.जी.खडसे विज्ञान व श्रीमती के.एम.सी. कला महाविद्यालय, मुक्ताईनगर, जि.जळगांव (८ पदे)

(१०) आर.सी.पटेल कला व विज्ञान महाविद्यालय, शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे (७ पदे)

(११) खान्देश शिक्षण मंडळाचे प्रताप महाविद्यालय, अमळनेर जि.जळगांव (१ पद)

**_औरंगाबाद विभाग_**

(१२) योगेश्वरी महाविद्यालय, अंबाजोगाई (४ पदे)

(१३) मौलाना आझाद महाविद्यालय, औरंगाबाद (१ पद)

(१४) जे.ई.एस. महाविद्यालय, जालना (१ पद)

(१५) मिलिंद विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद (१ पद)

(१६) बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना (२ पदे)

(१७) शिक्षणमहर्षी ज्ञानदेव मोहेकर कला, वाणिज्य विज्ञान महाविद्यालय, कळंब जि.उस्मानाबाद (२ पदे)

(१८) सरस्वती भूवन विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद (४ पदे)

(१९) स्वा.सावरकर महाविद्यालय, बीड (२ पदे)

(२०) श्रीमती एस.के.गांधी महाविद्यालय, कडा (१ पद)

(२१) छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा जि.उस्मानाबाद (३ पदे)

(२२) कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बदनापूर (२ पदे)

(२३) कै.लक्ष्मीबाई देशमुख महाविद्यालय, परळी (२ पदे)

(२४) वसंतराव नाईक महाविद्यालय, औरंगाबाद (२ पदे)

(२५) कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय, माजलगांव जि.बीड (१ पद)

(२६) डॉ.रफिक झकेरिया कॉलेज फॉर वुमेन, औरंगाबाद नावात बदल झालेला आहे. (औरंगाबाद कॉलेज फॉर वुमेन्स) (१ पद)

(२७) यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, सिल्लोड (१ पद)

(२८) आर.बी.अट्टल महाविद्यालय, गेवराई (१ पद)

(२९) तपस्वी पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, येवती संचालित व्यंकटेश महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय, उस्मानाबाद (२ पदे)

(३०) आदर्श महाविद्यालय, उमरगा जि.उस्मानाबाद (१ पद)

(३१) सर सय्यद महाविद्यालय, औरंगाबाद (१ पद)

(३२) विवेकानंद कला व सरदार दलिपसिंग वाणिज्य महाविद्यालय, औरंगाबाद (४ पदे)

(३३) राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय, जालना (१ पद)

(३४) बलभीम कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बीड (३ पदे)

(३५) रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, उस्मानाबाद (१ पद)

**_नागपूर विभाग_**

(३६) हिस्लॉप कॉलेज, नागपूर (४ पदे)

(३७) कमला नेहरु महाविद्यालय, नागपूर (५ पदे)

(३८) कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय, कोराडी जि.नागपूर (२ पदे)

(३९) धोटे बंधु विज्ञान महाविद्यालय, गोंदिया (४ पदे)

(४०) जनता महाविद्यालय, चंद्रपूर (३ पदे)

(४१) एस.एन.भोर महाविद्यालय, तुमसर जि.भंडारा (२ पदे)

(४२) सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर (३ पदे)

वेळी यांना तुम्ही बॉटम स्केल दिले होते काय? असे दोन प्रश्न विचारले. या दोनही प्रश्नांवर उच्च शिक्षण सचिवांनी "होय" असे उत्तर दिले. मुख्यमंत्र्यांनी त्या बैठकीत सरळ सरळ "सहाव्या वेतन आयोगात या शिक्षकांना बॉटम स्केल देण्यात यावे" असा आदेश दिला. आता या प्रश्नावर चर्चा होणार नाही असेही सांगितले. परंतु दिनांक २० ऑगस्ट २००९ पासून तर २५ ऑगस्ट २००९ पर्यंत या बैठकीचे कार्यवृत्त तयार होणार नाही याची काळजी उच्च शिक्षण सचिवांनी घेतली. त्यामुळे आंदोलन सुरूच राहिले. या पाच-सहा दिवसांच्या काळात उच्च शिक्षणमंत्र्यांनी बोलाविलेल्या बैठकीला सचिव उपस्थित राहत नसत व आपल्या कार्यालयात बसून आंदोलन चिघळण्यासाठी वृत्तपत्रांना जाहिरात देत असत. दिनांक २६ ऑगस्ट २००९ रोजी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री श्री.राजेश टोपे यांनी थेट मुख्यमंत्र्यांकडे तक्रार केली व उच्च शिक्षण सचिव सहकार्य करीत नसल्याचे सांगितले. त्यावर मा.मुख्यमंत्र्यांनी मुख्य सचिवांना बोलावून घेतले व तुम्ही तुमच्या दालनात बैठक घ्या व २० तारखेला ठरल्याप्रमाणे कार्यवृत्त तयार करा असे आदेश दिले. त्याप्रमाणे मुख्य सचिवांच्या दालनात बैठक बोलाविण्यात आली व उच्च शिक्षण सचिवांना उपस्थित राहणे भाग पडले. कार्यवृत्त तयार झाले व आंदोलन मागे घेण्यात आले. मुख्यमंत्र्यांशी संगणकशास्त्र या विषयीच्या प्रश्नावर सोमवारी बैठक आयोजित केलेली आहे असे जेव्हा श्री.राजेश टोपे सांगत होते तेव्हा त्यावर विश्वास ठेवणे मला भाग होते. निदान शासनातर्फे तसे सभागृहात सांगितल्या गेले पाहिजे हा आग्रह मी धरला व तो त्यांनी मान्य केला.

**४५.** शुक्रवार, दिनांक २३ जुलै २०१० रोजी सभागृहामध्ये चर्चा सुरू झाली. मुळामध्ये "पदवी स्तरावरील अनुदानप्राप्त विज्ञान शाखेअंतर्गत शिकविल्या जाणाऱ्या संगणक शास्त्र या वैकल्पिक विषयाला अनुदान देतांना दिल्या जाणाऱ्या भेदभावपूर्ण वागणुकीबाबत मा.उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने २००७ च्या याचिका क्रमांक ९९८ मध्ये दिलेल्या निर्णयाप्रमाणे कारवाई करण्याच्या विचाराधीन प्रश्नावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय," या प्रश्न भाग एकला "संगणकशास्त्र या विषयास अनुदान मंजूर करण्याच्या प्रस्तावास शासन मान्यता मिळालेली नाही." असे उत्तर शासनातर्फे देण्यात आले होते. अगदी सुरुवातीलाच त्यामध्ये मा.राज्यमंत्र्यांनी दुरुस्ती केली ती पुढीलप्रमाणे :-

"सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरात मला आपल्या परवानगीने पुढील सुधारणा करावयाची आहे. "**संगणकशास्त्र या विषयास अनुदान मंजूर करण्याच्या प्रस्तावास शासन मान्यता मिळालेली नाही**" याऐवजी "**संगणकशास्त्र या विषयास अनुदान मंजूर करण्याचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे**" असे वाचण्यात यावे."

**४६.** सभागृहामध्ये अनुपूरक चर्चा सुरू झाली तेव्हा याबाबतचे सर्व तपशील सांगितल्यावर विचारलेल्या पहिल्याच उपप्रश्नाला "यासंदर्भात लवकरात लवकर निर्णय घेतल्या जाईल" असे उत्तर मा.राज्यमंत्र्यांनी दिले. ती चर्चा शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी छापील उत्तरामध्ये केलेली दुरुस्ती स्वागतार्ह आहे. याचे कारण अगोदर देण्यात आलेले उत्तर स्वागतार्ह नव्हते. भेदभावपूर्ण वागणूक दिल्याचे प्रकरण हायकोर्टामध्ये मांडण्यात आले तेव्हा दि. २६ नोव्हेंबर २००७ रोजी हायकोर्टाने निर्णय दिला की, हा एवढा भेदभाव आहे, तो तुम्ही तपासा व आठ आठवड्यात त्याबाबत निर्णय करा. हायकोर्टाने आठ आठवड्यात निर्णय करा असे सांगितल्यानंतरही तो निर्णय झाला नाही. हायकोर्टाने त्या शिक्षकांना, पिटीशनर्सना, मॅनेजमेंटला सांगितले होते की, तुमच्याकडे असलेले मुद्दे तुम्ही शासनासमोर मांडा. त्याप्रमाणे त्यांनी २३ भेदभावाचे मुद्दे असलेले निवेदन मंत्रिमहोदयांकडे, शासनाकडे दिल्यानंतर

---

(४३) कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय, तुकुम, चंद्रपूर (२ पदे)
(४४) निळकंठ शिंदे महाविद्यालय, भद्रावती (२ पदे)
(४५) डॉ.आंबेडकर महाविद्यालय, नागपूर (५ पदे)
(४६) व्ही.एम.वसंत कॉमर्स, जे.एम.ठकार आर्टस ॲण्ड जे.जे.पटेल सायन्स महाविद्यालय, वर्धमाननगर, नागपूर (३ पदे)
(४७) कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय, आर्वी जि.वर्धा (१ पद)
(४८) हुतात्मा कला विज्ञान महाविद्यालय, आष्टी जि.वर्धा (१ पद)
(४९) एम.बी.पटेल महाविद्यालय, साकोली, भंडारा (१ पद)
(५०) विज्ञान महाविद्यालय, पवनी जि.भंडारा (१ पद)
(५१) भवभूती महाविद्यालय, आमगांव जि.गोंदिया (३ पदे)
(५२) एस.एफ.एस. महाविद्यालय, नागपूर (३ पदे)

***नांदेड विभाग***

(५३) यशवंत महाविद्यालय, नांदेड (२ पदे)
(५४) ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी जि.परभणी (२ पदे)
(५५) संत जनाबाई महाविद्यालय, परभणी जि.परभणी (२ पदे)
(५६) ज्ञानोपासक महाविद्यालय, जिंतूर जि.परभणी (२ पदे)
(५७) गोदावरी शिक्षण प्रसारक मंडळ, परभणी चे बी. रघुनाथ महाविद्यालय, परभणी जि.परभणी (१ पद)
(५८) बळीराम पाटील महाविद्यालय, किनवट, जि.नांदेड (१ पद)
(५९) शारदा भवन ए.सो. चे इंदिरा गांधी महाविद्यालय, नांदेड जि.नांदेड (१ पद)
(६०) महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर जि.लातूर (१ पद)
(६१) दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर जि.लातूर (१ पद)
(६२) श्री कुमारस्वामी महाविद्यालय, औसा जि.लातूर (१ पद)
(६३) आदर्श महाविद्यालय, हिंगोली जि.हिंगोली (१ पद)
(६४) सायन्स महाविद्यालय, नांदेड जि.नांदेड (३ पदे)
(६५) प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड जि.नांदेड (१ पद)
(६६) नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड जि.नांदेड (२ पदे)
(६७) वसंतराव नाई महाविद्यालय, नवीन नांदेड जि.नांदेड (२ पदे)
(६८) कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय, शंकरनगर, ता.बिलोली जि.नांदेड (१ पद)
(६९) ग्रामीण महाविद्यालय, वसंत नगर, कोडग्याळ ता.मुखेड जि.नांदेड (१ पद)
(७०) लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय, धर्माबाद जि.नांदेड (१ पद)
(७१) वै. धुंडा महाराज महाविद्यालय, देगलूर जि.नांदेड (१ पद)
(७२) राजश्री शाहू महाविद्यालय, लातूर जि.लातूर (१ पद)
(७३) हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर (१ पद)
(७४) महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर जि.लातूर (२ पदे)
(७५) शिवाजी महाविद्यालय, परभणी जि.परभणी (१ पद)
(७६) संत तुकाराम महाविद्यालय, परभणी जि.परभणी (१ पद)

***कोल्हापूर विभाग***

(७७) के.आर.पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर, जि.सांगली (३ पदे)
(७८) शिवराज कला वाणिज्य व डी.एस.कदम विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज जि.कोल्हापूर (१ पद)
(७९) एस.एम.डॉ.बापुजी साळुंखे महाविद्यालय, मिरज जि.सांगली (१ पद)
(८०) कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पलूस जि.सांगली (१ पद)
(८१) गोपाळकृष्ण गोखले महाविद्यालय, कोल्हापूर (१ पद)
(८२) मिरज महाविद्यालय, मिरज जि.सांगली (१ पद)
(८३) विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर (३ पदे)

***सोलापूर विभाग***

(८४) सांगोला महाविद्यालय, सांगोला जि.सोलापूर (१ पद)

***अमरावती विभाग***

(८५) जगदंबा महाविद्यालय, अचलपूर जि.अमरावती (१ पद)
(८६) कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय, किरण नगर, अमरावती (३ पदे)
(८७) आर.एल.टी. विज्ञान महाविद्यालय, अकोला (३ पदे)
(८८) लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी जि.यवतमाळ (१ पद)
(८९) श्री.शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, आकोला (३ पदे)
(९०) श्रीमती जी.एस.गावंडे महाविद्यालय, उमरखेड जि.यवतमाळ (२ पदे)
(९१) ब्रिजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय, अमरावती (१ पद)
(९२) विद्याभारती महाविद्यालय, अमरावती (१ पद)
(९३) आर.ए.कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय, वाशिम (२ पदे)
(९४) जिजामाता महाविद्यालय, बुलढाणा (१ पद)
(९५) भारतीय महाविद्यालय, अमरावती (२ पदे)
(९६) मलकापूर विज्ञान महाविद्यालय, मलकापूर जि.बुलढाणा (१ पद)
(९७) स्व.पुज्यपिता श्री.मस्कुजी बिरूजी बुरूंगुले शिक्षण संस्था, शेगांव जि.बुलढाणाचे श्री.ज्ञानेश्वर मस्कुजी बुरूंगुले विज्ञान महाविद्यालय, शेगांव जि.बुलढाणा (१ पद)
(९८) अमृत सेवाभावी संस्था, शिवरामनगर, वसमत रोड, परभणीचे कै.कु.दुर्गा क.बनमेरू विज्ञान महाविद्यालय, लोणार जि.बुलढाणा (१ पद)
(९९) कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चिखलदरा जि.अमरावती (१ पद)
(१००) कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बाळापूर जि.अकोला (१ पद)

हे भेदभावाचे मुद्दे असल्याचे मंत्रिमहोदयांनी सभागृहामध्ये कबूल केले होते. आणि हे भेदभाव संपुष्टात आणण्यासाठी पॉझीटीव्ह निर्णय घेऊ असे ते म्हणाले. दिनांक २३ डिसेंबर २००८ रोजी ते असे म्हणाले की, "**हा विषय उच्च शिक्षण विभागाकडून मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी आणला जाईल आणि पुढील अधिवेशनाच्या अगोदर या विषयाच्या संदर्भात सकारात्मक निर्णय घेतला जाईल.**" असे सांगितल्यानंतर आजचे हे भयानक उत्तर या ठिकाणी आले. ते दुरुस्त केल्याबद्दल मी आपला आभारी आहे. कुणीतरी त्यासाठी निर्णयासाठी वेळ दिला पाहिजे हे हायकोर्टाने सांगितल्यानंतर आठ हप्त्यामध्ये निर्णय घेतला नाही हे योग्य झाले नाही. आपण सांगितल्यानंतर सुध्दा त्याबद्दल निर्णय झाला नाही. आणि म्हणून याठिकाणी देण्यात आलेले उत्तर चुकीचे होते त्याबद्दल मी जास्त बोलत नाही ते आपण दुरुस्त केले आहे. तेव्हा यासंबंधीचा निर्णय केव्हा होईल? आठ दिवसात होईल? एक महिन्यात होईल की, दोन महिन्यात होईल?

**प्रा.वर्षा गायकवाड** : सभापती महोदय, या संदर्भात लवकरात लवकर निर्णय घेतला जाईल." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : शुक्रवार, दिनांक २३ जुलै २०१० : खंड १५६, क्रमांक ९, पृष्ठ ३३)*

**४७.** पुढे या विषयावर बरीच अनुपूरक चर्चा झाली पण सोमवारी मा.मुख्यमंत्र्यांकडे बैठक घेण्यात येईल हे उत्तर काही येत नव्हते. तेव्हा सारे तपशील पुन्हा नमूद करून विचारले असता "सभागृहाची भावना ओळखून यासंदर्भात मा.मुख्यमंत्र्यांकडे सोमवारी बैठक घेण्यात येईल" अशा प्रकारचे उत्तर राज्यमंत्र्यांनी दिले. ती चर्चा शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"**प्रा.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, मी या ठिकाणी महत्वाचा प्रश्न उपस्थित करू इच्छितो. जे सभागृहात बोलणे उचित नाही जे उत्तर देणे योग्य नाही असे उत्तर या ठिकाणी दिले जाऊ नये. माननीय राज्यमंत्र्यांनी ते दुरुस्त करावे किंवा माननीय मंत्रिमहोदय या ठिकाणी बसलेले आहेत त्यांनी ते दुरुस्त करावे. सभापती महोदय, हायकोर्टाच्या निर्णयाची एक ओळ मी याठिकाणी वाचून दाखवितो. ""The Government is directed to take decision in this respect within a period of 8 weeks from the date of receipt of such representation." १९ डिसेंबर,२००७ ला शासनाला हे निवेदन मिळाले. हे निवेदन मिळाल्यापासून आठ आठवड्याच्या आत निर्णय करा असे हायकोर्टाचे आदेशच आहेत. मी मुद्दाम सांगत आहे कारण माननीय राज्यमंत्री महोदयांनी लवकरात लवकर असे म्हटले आहे. आमचा कन्टेम्प्ट आम्ही सहन करून घेऊ. सभागृहाचा कन्टेम्प्ट सभागृह काही वेळा सहन करू शकेल पण हायकोर्टाच्या बाबतीत असा निर्णय झाल्यानंतर असे उत्तर देणे हे बरोबर नाही. त्यामुळे माननीय मंत्रिमहोदयांनी ते उत्तर दुरुस्त करावे.

**प्रा.वर्षा गायकवाड** : सभापती महोदय, सभागृहाचा मान ठेवला पाहिजे आणि कोर्टाचा सुद्धा मान ठेवला पाहिजे. **सभागृहाची भावना ओळखून यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांकडे सोमवारी बैठक घेण्यात येईल.** *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : शुक्रवार, दिनांक २३ जुलै २०१० : खंड १५६, क्रमांक ९, पृष्ठ ३४ ते ३५)*

**४८.** शुक्रवार, दिनांक २३ जुलै २०१० रोजी सभागृहामध्ये राज्यशासनातर्फे देण्यात आलेले "**मा.मुख्यमंत्र्यांकडे सोमवारी बैठक घेण्यात येईल**" हे आश्वासन महत्त्वपूर्ण तर होतेच पण मुदतबंदही असल्यामुळे या प्रश्नाला न्याय देणारे होते. संगणकशास्त्र अनुदान कृती समितीचा पाठपुरावा, उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे याचिकाकर्त्यांनी भेदभावासंबंधि दिलेले २३ मुद्यांचे तपशीलवार निवेदन, त्या निवेदनावर आठ आठवड्याच्या आत निर्णय घेण्याचे मा.उच्च न्यायालयाचे आदेश, विधापरिषदेमध्ये त्यानंतर सातत्याने या प्रश्नावर झालेला पाठपुरावा, विसंगत वर्तन झालेले आहे तसेच पर्यायाने भारतीय संविधानाच्या कलम १४ च्या विरोधात हे वर्तन असल्याचे शासनातर्फे सभागृहात स्पष्टपणे कबूल केले जाणे, सभागृहात एका मागून एक देण्यात आलेली आश्वासने या सर्व गोष्टी या प्रश्नाचा प्रवास योग्य दिशेने पुढे नेणाऱ्या होत्या. यामुळे या प्रश्नाच्या सोडवणुकीला चांगलाच वेग आला हे खरे असले तरी भेदभावपूर्ण वागणुकीच्या साम्यामुळे संगणकशास्त्र या विषयाबरोबर इलेक्ट्रॉनिक्स, शारीरिक शिक्षण हे विषय सुद्धा या प्रकरणास जोडल्या जाणे, त्याची माहिती गोळा करण्याच बराच विलंब लागणे व त्यामुळेच या प्रश्नावर निर्णय घेण्यासाठी काही कालावधी लागण्याची शक्यता आहे असे वारंवार शासनातर्फे सभागृहात सांगितल्या जाणे, या बाबी गतिरोधक ठरल्या. आनंदाची गोष्ट अशी की, संगणकशास्त्र या विषयाबरोबर इलेक्ट्रॉनिक्स व शारीरिक शिक्षण हे विषय जोडून घेतल्यामुळे इलेक्ट्रॉनिक्स हा विषय चालविणारी १३ महाविद्यालये व शारीरिक शिक्षण हा विषय चालविणाऱ्या ४१ महाविद्यालयातील सर्व शिक्षकांना अनुदान तत्वावर आणण्यास मंजुरी मिळाली. या दोन विषयातील शिक्षकांची एकंदर संख्या लक्षात घेता स्वतंत्रपणे त्यांना चळवळ करून हे यश पदरी पाडून घेता आले नसते असे दिसून येते. हा सर्व आटापिटा संपून शेवटी "**अकृषी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील संगणकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स व शारीरिक शिक्षण या विषयांना अनुदान मंजूर करण्याबाबत**" या मथळ्याचा शासननिर्णय *(यापुढे उल्लेख '**शासननिर्णय**' असा)* महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दिनांक ४ एप्रिल २०१२ रोजी निर्गमित केला. हा शासननिर्णय सोबत **सहपत्र : ८** म्हणून प्रसृत करण्यात आलेला आहे.

**४९.** हा शासननिर्णय काळजीपूर्वक वाचला तर असे दिसून येते की, निर्णयापेक्षा या शासननिर्णयातील प्रस्तावनेचा विस्तार हा मोठा आहे. प्रस्तावनेमध्ये निरनिराळ्या बाबतीत भेदभावपूर्ण वागणूक दिल्या जात होती ही गोष्ट स्पष्टपणे कबूल करण्यात आलेली आहे. भेदभावपूर्ण वागणूक मान्य करणारी प्रस्तावनेतील विधाने लक्षात घेतली तर संगणकशास्त्र कृती समितीच्या एखाद्या कार्यकर्त्याने किंवा नेत्याने ती लिहिली असावी असे वाटते. इतका हा भेदभाव ठळकपणे प्रस्तावनेत मान्य करण्यात आलेला आहे. प्रस्तावनेतील भेदभावदर्शक वर्तन उघड करणारी विधाने स्वतंत्रपणे याठिकाणी नमूद करण्याचे मी टाळले आहे.

*सहपत्र १० : परिच्छेद ५२ पहा*

## शासन निर्णय क्र. नाविस २००५/(७६/०५)/मशि-४ दि. ४ एप्रिल, २०१२ सोबतचे जोडपत्र-ब

***टिप :** सदरहू जोडपत्रातील उतारा : सुरुवातीला महाविद्यालयाचे नाव व त्यानंतर अनुज्ञेय पदाची संख्या नमूद केलेली आहे.*

### इलेक्ट्रॉनिक्स विषय

(१) धनाजी नाना चौधरी विद्या प्रबोधनीचे कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, जळगांव (२ पद)

(२) दि भुसावळ पिपल्स बँक चॅरिटेबल संस्थेचे दादासाहेब देविदास नामदेव भोळे महाविद्यालय, भुसावळ जि.जळगांव (१ पद)

(३) सरस्वती विद्या प्रसारक मंडळ संचालित पी.के.कोटेचा महिला महाविद्यालय, भुसावळ जि.जळगांव (१ पद)

(४) श्रीमती जी.जी.खडसे विज्ञान व श्रीमती के.एम.सी. कला महाविद्यालय, मुक्ताईनगर, जि.जळगांव (२ पदे)

(५) आर.सी.पटेल कला व विज्ञान महाविद्यालय, शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे (१ पद)

(६) रहेबर एज्युकेशन सोसायटी, औरंगाबाद संचालित सर सय्यद महाविद्यालय, औरंगाबाद (२ पदे)

(७) इंदिरा गांधी महाविद्यालय, नांदेड जि.नांदेड (१ पद)

(८) श्री.गुरूबुद्धीस्वामी महाविद्यालय, पूर्णा जि.परभणी (१ पद)

(९) संत तुकाराम महाविद्यालय, परभणी जि.परभणी (२ पदे)

(१०) श्री हावगीसवमी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर (२ पदे)

(११) ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी जि.परभणी (२ पदे)

(१२) स्व.पुज्यपिता श्री.मस्कुजी बिरूजी बुरूगुले शिक्षण संस्था, शेगांव जि.बुलढाणाचे श्री.ज्ञानेश्वर मस्कुजी बुरूगुले विज्ञान महाविद्यालय, शेगांव जि.बुलढाणा (१ पद)

(१३) अमृत सेवाभावी संस्था, शिवरामनगर, वसमत रोड, परभणीचे कै.कु.दुर्गा क.बनमेरू विज्ञान महाविद्यालय, लोणार जि.बुलढाणा (१ पद)

मूळ शासननिर्णय सोबत प्रसृत केलेला असल्यामुळे प्रस्तावनेतील ही विधाने वाचकांना वाचता येतील.

**५०.** या शासननिर्णयातील निर्णयाचा एकूणच समाधानकारक न्याय देणारा परिच्छेद १ मधील मजकूर पुढीलप्रमाणे :-

"शासनाने सन १९८८-८९ पूर्वी, तसेच १९८९ ते २३.९.१९९१ व **१९९१ ते जून २००१ पर्यंत ज्या महाविद्यालयांना त्यांच्या विज्ञान व वाणिज्य विद्याशाखांतर्गत संगणकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स व शारीरिक शिक्षण या विषयांना कायम विनाअनुदानाच्या अटीवर परवानगी दिली होती, त्यात सुधारणा करून या शासननिर्णयासोबतच्या परिशिष्ट-अ प्रमाणे संगणकशास्त्र-१००, परिशिष्ट-ब प्रमाणे इलेक्ट्रॉनिक्स-१३, व परिशिष्ट-क प्रमाणे शारीरिक शिक्षण-४१ महाविद्यालयातील विषयांना अनुदान तत्वात बदल करून दि. १ एप्रिल, २०१२ पासून १००% अनुदानावर आणण्यास मंजुरी देण्यात येत आहे.**"

**५१.** या शासननिर्णयाच्या शेवटी जोडपत्र-अ जोडलेले असून संगणकशास्त्र हा ऐच्छिक विषय पदवी परीक्षेसाठी सुरू असलेल्या १०० महाविद्यालयांची यादी व त्या प्रत्येक महाविद्यालयामध्ये अनुदानास पात्र ठरलेली शिक्षकीय पदांची संख्या ही जोडपत्र-अ मध्ये नमूद केलेली आहे. या जोडपत्रातील मजकूर सोबत **सहपत्र** : ९ म्हणून प्रसृत केलेला आहे.

**५२.** या शासननिर्णयाच्या शेवटी जोडपत्र-ब जोडलेले असून इलेक्ट्रॉनिक्स हा ऐच्छिक विषय पदवी परीक्षेसाठी सुरू असलेल्या १३ महाविद्यालयांची यादी व त्या प्रत्येक महाविद्यालयामध्ये अनुदानास पात्र ठरलेली शिक्षकीय पदांची संख्या ही जोडपत्र-ब मध्ये नमूद केलेली आहे. या जोडपत्रातील मजकूर सोबत **सहपत्र : १०** म्हणून प्रसृत केलेला आहे.

**५३.** या शासननिर्णयाच्या शेवटी जोडपत्र-क जोडलेले असून शारीरिक शिक्षण हा ऐच्छिक विषय पदवी परीक्षेसाठी सुरू असलेल्या ३२ महाविद्यालयांची यादी व त्या प्रत्येक महाविद्यालयामध्ये अनुदानास पात्र ठरलेली शिक्षकीय पदांची संख्या ही जोडपत्र-क मध्ये नमूद केलेली आहे. या जोडपत्रातील मजकूर सोबत **सहपत्र : ११** म्हणून प्रसृत केलेला आहे.

**५४.** एकाच महाविद्यालयामध्ये आपण काम करतो आणि आपल्या विद्याशाखेमध्ये काम करणाऱ्या इतर सर्व विषयांच्या शिक्षकांना शासन नियंत्रित १०० टक्के वेतन अनुदानाची व्यवस्था लागू आहे व आपल्याला ती व्यवस्था लागू नाही. या भेदभावपूर्ण वागणुकीतून निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा शिक्षकांच्या मनोधर्यावर काय परिणाम होतो? हे दुःख 'जावे त्यांच्या वंशा' तेव्हाच कळू शकते अशा स्वरुपाचे आहे. हा शासननिर्णय निर्गमित झाल्याने या शिक्षकांना आनंद होणे स्वाभाविक होते. असा आनंद व्यक्त करणारे पत्र या संगणकशास्त्र कृती समितीचे एक नेते प्रा.पराग भालचंद्र यांनी मला दिनांक १८ मे २०२२ रोजी पाठविले. हा आनंद व्यक्त करणारा पत्रातील मजकूर पुढीलप्रमाणे :-

"मी आणि आम्ही जे काही आहोत त्याचे शिल्पकार आपण आहात. संगणकशास्त्र शिकविणाऱ्यांचे वेतन पाच आकडी झाले आहे. त्यांच्या आयुष्यात स्थैर्यता, आनंद, समाधान दिसत आहे. अशा लोकांच्या मुलाखती घेताना, CAS च्या कॅम्पमध्ये त्यांचे प्रस्ताव पाहताना मन भरून येते."

**५५.** संघटनांच्या मेहनतीमुळे ज्या न्याय्य व्यवस्था शिक्षकांना प्राप्त झाल्या, त्यातून त्या त्या विद्याशाखामध्ये काम करणाऱ्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मागे उच्च शिक्षण विभागातील दप्तर दिरंगाईची व कर्मचाऱ्यांच्या अपव्यवहाराची भुणभुण लागल्यामुळे हा आनंद कसा हिरावून घेतल्या जातो याचे मोठे मार्मिक वर्णन प्रा.पराग भालचंद्र यांनी त्यांच्या १८ मे २०२२ च्या पत्रामध्ये नमूद केलेले आहे ते पुढील शब्दातः-

"एकविसाव्या शतकात तंत्रज्ञानाधिष्ठीत युगात लोकांचे प्रश्न संपतील व

*सहपत्र ११ : परिच्छेद ५३ पहा*

## शासन निर्णय क्र. नाविस २००५/(७६/०५)/मशि-४ दि. ४ एप्रिल, २०१२ सोबतचे जोडपत्र-क

*टिप : सदरहू जोडपत्रातील उतारा : सुरुवातीला महाविद्यालयाचे नाव व त्यानंतर अनुज्ञेय पदाची संख्या नमूद केलेली आहे.*

### शारीरिक शिक्षण विषय

(१) बंकटस्वामी महाविद्यालय, बीड (२ पदे)

(२) छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा, जि.उस्मानाबाद (२ पदे)

(३) वेणूताई चव्हाण प्रतिष्ठाणचे कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, अंबाजोगाई जि.बीड (१ पद)

(४) लोकसेवा एज्युकेशन सोसायटीचे कला व विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद (१ पद)

(५) एकता महाविद्यालय, बिडकीन ता.पैठण जि.औरंगाबाद (१ पद)

(६) ज्ञानेश्वर शिक्षण संस्था संचालित शिवछत्रपती महाविद्यालय, पाचोड जि.औरंगाबाद (१ पद)

(७) परिवर्तन एज्युकेशन सोसायटी जालना संचालित राजर्षी शाहू वरिष्ठ कला महाविद्यालय, वाळूज जि.औरंगाबाद (१ पद)

(८) कोहिनूर शिक्षण संस्था संचालित कोहिनूर कला महाविद्यालय, खुलताबाद जि.औरंगाबाद (१ पद)

(९) विजय शिक्षण प्रसारक मंडळ संचालित दगडोजीराव देशमुख कला महाविद्यालय, वाळूज जि.औरंगाबाद (१ पद)

(१०) धारेश्वर शिक्षण संस्था, औरंगाबाद संचालित कला महाविद्यालय, लिंबाजी चिंचोली ता.कन्नड जि.औरंगाबाद (२ पदे)

(११) सरस्वती शिक्षण प्रसारक मंडळ, ईश्वरनगर ता.अंबड जि.जालना संचालित गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि.जालना (१ पद)

(१२) सिद्धार्थ कला वाणिज्य महाविद्यालय, जाफ्राबाद जि.जालना (१ पद)

(१३) मत्स्योदरी शिक्षण संस्था संचालित कला व वाणिज्य महाविद्यालय, अंबड आता या महाविद्यालयाचे नांव मत्स्योदरी शिक्षण संस्था संचालित कला, वाणिज्य विज्ञान महाविद्यालय अंबड असे आहे. (१ पद)

(१४) श्री.पंडितगुरू पार्डीकर महाविद्यालय, सिरसाळा ता.परळी वैजनाथ जि.बीड (१ पद)

(१५) अमोलक जैन विद्याप्रसारक मंडळ, कडा संचालित श्रीमती एस.के.गांधी कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय, कडा, ता.आष्टी जि.बीड (२ पदे)

(१६) नवगण शिक्षण संस्था संचालित कला व वाणिज्य महाविद्यालय, परळी वैजनाथ जि.बीड (१ पद)

(१७) वसंत महाविद्यालय, केज ता.केज जि.बीड (२ पदे)

(१८) जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला महाविद्यालय, पाटोदा जि.बीड (१ पद)

(१९) जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळ, गेवराई संचालित कला महाविद्यालय, गढी ता.गेवराई जि.बीड (१ पद)

(२०) कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय, माजलगांव जि.बीड (१ पद)

(२१) बलभीम कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बीड (२ पदे)

(२२) पद्मभूषण वसंतदादा पाटील कला महाविद्यालय, पाटोदा जि.बीड (१ पद)

(२३) शिवसागर सेवाभावी शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद संचालित कला महाविद्यालय, नांदूरघाट ता.केज जि.बीड (१ पद)

(२४) मा.विद्यापीठ केज संचालित सरस्वती महाविद्यालय, केज जि.बीड (१ पद)

(२५) आदर्श महाविद्यालय, उमरगा जि.उस्मानाबाद (१ पद)

(२६) शिवसेवा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, कळंब संचालित छत्रपती शिवाजी महाविद्यालय, कळंब जि.उस्मानाबाद (२ पदे)

(२७) श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर (२ पदे)

(२८) उज्वल ग्रामीण महाविद्यालय, घोणशी जि.लातूर (१ पद)

(२९) शिवाजी महाविद्यालय, हिंगोली जि.हिंगोली (२ पदे)

(३०) बापूसाहेब एकंबेकर ग्रामीण महाविद्यालय, हाणेगांव, जि.नांदेड (१ पद)

(३१) पानसरे महाविद्यालय, अर्धापूर जि.नांदेड (१ पद)

(३२) ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी जि.परभणी (२ पदे)

जीवन सुसह्य होईल असे वाटायचे. **पण भलतेच झाले आहे. लोकांचे प्रश्न खूप वाढले आहेत. समस्या, G.R., आदेश, निर्णय, Red Tapeism, हितसंबंध या सगळ्यांनी जीवन हैराण झाले आहे. समाधान, शांतता, कामाचा आनंद या सर्वांचा विसर पडला असून संघर्ष, दगदग, मंत्रालयाचे उंबरे झिजविणे असेच काहीतरी सुरू झाले आहे.**"

*सहपत्र १२ : परिच्छेद ५५ पहा*

***प्रा. पराग उ. भालचंद्र (अंबाजोगाई)***
संगणकशास्त्र संकुल,
स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड-४३१६०६
**दिनांक : १८.०५.२०२२**

**आदरणीय डॉ.बी.टी.देशमुख भाऊ,**

आदरणीय सर,

सादर नमस्कार. आपली प्रकृती व कुटुंबातील सर्वांचे सर्व काही ठीक असेल असे गृहीत धरतो. परमात्मा आपल्याला उत्तम आरोग्य देवो व उदंड आयुष्य लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना. आपली आठवण नेहमीच येते. लहानपणी आईने शिकविलेल्या प्रार्थना, श्लोक, स्तोत्रांच्या नंतर ईश्वराशी होणाऱ्या संवादात आपण नेहमी आहात. आपल्याविषयी धन्यवादाची भावना अखंड असते. कर्मयोगी, लोकांचे प्रश्न-समस्या सोडविण्यासाठी झिजलेले आयुष्य, आपुलकी, मार्गदर्शन, अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी आम्हाला दिलेले पाठबळ-सोबत या सर्व गोष्टींसाठी नेहमी माझ्या, आमच्या, सर्वांच्या प्रार्थनात आणि आठवणीत आहात.

काळ फार वेगाने निघून जातो. दिवस सुरू होतो व संपतो. काय चालले आहे हे कळत नाही, पण दिवसाच्या शेवटी प्रार्थनांमध्ये तुम्ही येतात. आपला प्रवास कसा घडला हे आठवते. तुम्हाला भेटावं, पत्र लिहावं हे खुपदा ठरवतो पण तो योग आज जुळून यायचा असावा.

**मी आणि आम्ही जे काही आहोत त्याचे शिल्पकार आपण आहात. संगणकशास्त्र शिकविणाऱ्यांचे वेतन पाच आकडी झाले आहे. त्यांच्या आयुष्यात स्थैर्यता, आनंद, समाधान दिसत आहे. अशा लोकांच्या मुलाखती घेताना, CAS च्या कॅम्पमध्ये त्यांचे प्रस्ताव पाहताना मन भरून येते.** तुमच्या सारख्या तपस्वी, भगीरथामुळे या शक्यता प्रत्यक्षात आल्या. आजच्या व्यवहारवादी जगात तुमच्यासारखे प्रामाणिक लोक खूप दुर्मिळ असतात. वाळवंटातील ओएसिस प्रमाणे प्रगल्भ बुद्धि, प्रशासकीय यंत्रणा व पद्धतींचा परिपूर्ण अभ्यास, लोकांचे प्रश्न हाताळण्याची शैली, संवेदनशीलता, माणुसकी, 'मनुष्य सेवा हीच ईश्वरसेवा' या धर्तीवर चालणाऱ्या समर्पित आयुष्याचे आपण एक मूर्तीमंत उदाहरण आहात.

**एकविसाव्या शतकात तंत्रज्ञानाधिष्ठीत युगात लोकांचे प्रश्न संपतील व जीवन सुसह्य होईल असे वाटायचे. पण भलतेच झाले आहे. लोकांचे प्रश्न खूप वाढले आहेत. समस्या, G.R., आदेश, निर्णय, Red Tapeism, हितसंबंध या सगळ्यांनी जीवन हैराण झाले आहे. समाधान, शांतता, कामाचा आनंद या सर्वांचा विसर पडला असून संघर्ष, दगदग, मंत्रालयाचे उंबरे झिजविणे असेच काहीतरी सुरू झाले आहे.** शासनाशी भांडताना आपल्या सारख्या देव माणसाची उणीव नेहमी भासते व ती कायम भासणार. आपल्या तडफदार शैलीतील कार्यवाहीमुळे संगणकशास्त्राला अनुदान मिळून तब्बल एक तप झाले सुद्धा. त्याच धरतीवर इलेक्ट्रॉनिक्स, शारीरिक शिक्षण या विषयांचे सुद्धा भले झाले. याचे पूर्ण श्रेय आपल्याला जाते. You were chosen by God to give us justice.

आपले आयुरारोग्य उत्तम रहावे अशी प्रार्थना. ईश्वराचे आपण व आपल्या परिवारावर कृपाछत्र कायम राहावे. या पत्राच्या निमित्ताने आज अंतर्मनातले सगळे भाव व्यक्त करण्याची संधी मिळाली. आणखी एक विनंती आहे, या पत्रासोबत एक भेट व काही वाचनीय पुस्तके पाठवित आहे. वडिलधारेपणाच्या नात्याने त्यांचा स्वीकार करावा.

घरच्या सर्वांना यथोचित नमस्कार. आपला आशीर्वाद व स्नेह अखंड असावा, अशी विनंती.

धन्यवाद.

आपला
**प्रा.पराग उपेंद्र भालचंद्र** (अंबाजोगाई)
फोन नं. ९४२२२४०३०१
srtmun.parag@gmail.com

या पत्राच्या शेवटी प्रा.पराग भालचंद्र यांनी "आपले आयुरारोग्य उत्तम रहावे अशी प्रार्थना. ईश्वराचे आपण व आपल्या परिवारावर कृपाछत्र कायम राहावे. या पत्राच्या निमित्ताने आज अंतर्मनातले सगळे भाव व्यक्त करण्याची संधी मिळाली. आणखी एक विनंती आहे, या पत्रासोबत एक भेट व काही वाचनीय पुस्तके पाठवित आहे. वडिलधारेपणाच्या नात्याने त्यांचा स्वीकार करावा." असे नमूद केले होते. भेटीदाखल पुस्तकं हा माझ्यासाठी आनंदाचा विषय होता पण सोबतच भेट म्हणून एक सुंदर रंगीत शर्ट सुद्धा त्यांनी पाठविला होता. माझी अडचण अशी होती की, मी आजपर्यंत रंगीत शर्ट कधीही वापरला नाही. आता वस्त्ररंग बदलण्याचे वयसुद्धा निघून गेलेले. सबब तो शर्ट परत पाठविणे मला एकदम अनुचित वाटत होते. मी माझ्या कनिष्ठ बंधुंना विनंती केली. ती त्यांनी मान्य केली. मी तो शर्ट त्यांच्या सुपूर्द केला व त्या शर्टाची अंदाजे किंमत दोन हजार रुपये धरून तेवढ्या रकमेचा रेखांकित धनादेश नुटाच्या कोषाध्यक्षांच्या स्वाधिन केला. प्रा.पराग भालचंद्र यांचे ते पत्र सोबत **सहपत्र : १२** म्हणून प्रसृत केलेले आहे.

**५६.** व्यावसायिक संघटना म्हणून काम करीत असतांना त्या त्या संघटनेला आपल्या स्वतःच्या बळावरच आपले प्रश्न सोडवावे लागतात हे खरे असले तरी सर्व सामान्य माणसांची व एकंदर समाजाची तुमच्या संघटनेकडे व तुमच्या प्रश्नाकडे पाहण्याची वृत्ती कशी आहे? ही गोष्ट सुद्धा लक्षात घेण्यासारखी असते. "ही संघटना फक्त आपल्यापुरतच पाहते" किंवा "ही संघटना समाजाच्या प्रश्नांकडेसुद्धा सजगपणे पाहत असते" यापैकी कोणती प्रतिमा आपल्या वाट्याला यावी याचा विचार संघटनेला करावाच लागतो. संघटना म्हणून असा अनुभव आहे की, लोकांच्या प्रश्नामध्ये व्यावसायिक संघटना जागरुकपणे रस घेत असतील तर लोकसुद्धा संघटनेच्या प्रश्नाकडे डोळसपणे पाहतात. हा विचार लक्षात ठेवूनच आमच्या संघटनेने सुरुवातीपासून महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल उघड करणारी पुस्तके व बुलेटीन प्रकाशित करण्याची जबाबदारी स्वीकारल्याचे दिसून येते. हा विचार लक्षात घेऊन सर्वसामान्यांच्या प्रश्नाविषयी संघटनेने यापूर्वी काढलेले विशेषांक पुढीलप्रमाणे :-

**(१)** अमरावती महानगरपालिका अनुदान सुत्र विशेषांक : १९९१ चे पृष्ठ क्रमांक १ ते २० **(२)** जलसिंचन अनुशेष विशेषांक : १९९२ चे पृष्ठ क्रमांक १ ते ३६ **(३)** घाटंजी शहरासाठी वाढीव पाणी पुरवठा योजना : १९९६ चे पृष्ठ क्रमांक २९ ते ४० **(४)** अनुशेष विशेषांक : १९९६ चे पृष्ठ क्रमांक ४१ ते ११२ **(५)** वणी शहरासाठी वाढीव पाणी पुरवठा योजना : १९९७ चे पृष्ठ क्रमांक ४९ ते ६० **(६)** पांढरकवडा शहरासाठी वाढीव पाणी पुरवठा योजना : १९९७ चे पृष्ठ क्रमांक ६१ ते ७४ **(७)** अकोला पूर नियंत्रक योजना विशेषांक : १९९८ चे पृष्ठ क्रमांक ९३ ते १०८ **(८)** अकोला पूर नियंत्रक योजना विशेषांक : २००२ चे पृष्ठ क्रमांक ६९ ते ८० **(९)** असामान्य गुणवत्तेचा निम्न पेढी प्रकल्प : २००७ चे पृष्ठ क्रमांक ९३ ते १४० **(१०)** केळकरी कारस्थान विशेषांक : २०१५ चे पृष्ठ क्रमांक १५७ ते २०८ (हे सर्व अंक संघटनेच्या www.nuta.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.)

**५७.** नुटा बुलेटीनच्या प्रकाशनाला यावर्षी ५० वर्षे पूर्ण होत आहेत. नुटा बुलेटीन हे व्यावसायिक संघटनेचे मुखपत्र या नात्याने या नियतकालिकाचा सुवर्ण जयंती महोत्सव किंवा रजत जयंती महोत्सव कसा साजरा करावा? याविषयीच्या काही वहीवाटी संघटनेने स्वीकारलेल्या आहेत. २५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर नुटा बुलेटीन रजत जयंती विशेषांक मालिकेचे प्रकाशन त्यावेळेला करण्यात आले होते. व्यावसायिक जीवनाशी संबंधित २६ विशेषांक त्यावेळेला प्रकाशित करण्यात आले होते. ते पुढीलप्रमाणेः-

**(१)** विशेषांक पहिला, सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ विशेषांक पृष्ठ ११३ ते १५२ **(२)** विशेषांक दुसरा, 'नुटा बुलेटीन' (१९७६ ते २०००) अनुक्रमणिका - विशेषांक पृष्ठ १५३ ते २०४ **(३)** विशेषांक तिसरा, शिक्षणाचे वाटोळेकरण - विशेषांक पृष्ठ २०५ ते २३२ **(४)** विशेषांक चौथा, नेट/सेट - विशेषांक पृष्ठ २३३ ते ३२४ **(५)** विशेषांक पाचवा, 'वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती सुविधा' विशेषांक पृष्ठ ३२५ ते ३६४ **(६)** विशेषांक सहावा, सेवा निवृत्तीवेतन व उपदान योजना विशेषांक पृष्ठ ३६५ ते ४३२ **(७)** विशेषांक सातवा, रजा प्रवास सवलत विशेषांक पृष्ठ ४३३ ते ४८० **(८)** विशेषांक आठवा, वेतन अनुदान व्यवस्था विशेषांक पृष्ठ ४८१ ते ५०८ **(९)** विशेषांक नववा, संघटना - संस्थापना विशेषांक पृष्ठ ५०९ ते ५३६ **(१०)** विशेषांक दहावा, महत्वपूर्ण दस्तऐवज विशेषांक पृष्ठ ५३७ ते ५७२ **(११)** विशेषांक अकरावा, नेट/सेट (दुसरा) विशेषांक पृष्ठ ५७३ ते ६००. याशिवाय शिक्षक प्रतिनिधींनी सभागृहामध्ये उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांची माहिती देणारे १५ विशेषांक 'शब्दयुद्ध विशेषांक' या मथळ्याने त्यावेळेला सन २००१ च्या नुटा बुलेटीन मालिकेमध्ये

***म्हणजे काय मौज आहे पहा. महाविद्यालय १०० टक्के अनुदानावर असतांना त्या महाविद्यालयातील फक्त संगणकशास्त्र विषयाला मात्र अनुदान द्यायचे नाही असा भारतीय संविधानाच्या कलम १४ चा भंग करणारा धोरणात्मक निर्णय मंत्रीमंडळाने घेतला नव्हता, खात्याच्या मंत्र्यांनी घेतला नव्हता, उच्च शिक्षणमंत्र्यांच्या बैठकीत सुद्धा असा निर्णय झालेला नव्हता. धोरणात्मक निर्णयच झालेला नव्हता. त्यामुळे बिचारे उच्च शिक्षण विभागातील अधिकारी त्या निर्णयाची प्रत उपलब्ध करून देऊ शकत नव्हते. मात्र त्या निर्णयाची धुमधडाक्यात अंमलबजावणी करण्यात तेच अधिकारी आपली शक्ती खर्च करीत होते.*** *(परिच्छेद ९ पहा)*

प्रकाशित करण्यात आले होते. (हे सर्व अंक संघटनेच्या www.nuta.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.)

**५८. व्यावसायिक जीवनाशी संबंधित प्रश्नांवरील विशेषांक :** विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक जीवनाशी संबंधित असलेल्या अनेक प्रश्नांच्या बाबतीत नुटा बुलेटीनचे विशेषांक यापूर्वी प्रकाशित करण्यात आलेले आहेत. उदा. (१) विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांनी केलेला तिसऱ्या वेतन आयोगापर्यंतचा संघर्ष २०१९ चे पृष्ठ क्रमांक १७७ ते २२० (२) वेतन वितरण व्यवस्थेची स्थापना २०२० चे पृष्ठ क्रमांक १८५ ते २४४ (३) विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांनी केलेला चौथ्या वेतन आयोगासाठीचा संघर्ष २०२१ चे पृष्ठ क्रमांक ६९ ते १६० (४) न्यायाधिकरणाची स्थापना २०२१ चे पृष्ठ क्रमांक २३३ ते २७२ (५) विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांनी केलेला पाचव्या वेतन आयोगासाठीचा संघर्ष २०२२ चे पृष्ठ क्रमांक १३ ते ७२ (६) विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांनी केलेला सहाव्या वेतन आयोगासाठीचा संघर्ष २०२२ चे पृष्ठ क्रमांक १८५ ते २८२. (हे सर्व अंक संघटनेच्या www.nuta.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.)

**५९.** नुटा बुलेटीनला ५० वर्षे पूर्ण होत आहेत, त्या निमित्ताने नुटा बुलेटीनची सुवर्ण महोत्सवी विशेषांक मालिका प्रकाशित करण्याचा निर्णय नुटाच्या आमसभेने घेतला आहे. दिनांक ३० जून २०२४ रोजी झालेल्या सभेत विषय क्रमांक ८७२ अन्वये "नुटा बुलेटीनची सुवर्ण महोत्सवी विशेषांक मालिका" या मथळ्याचा एक ठराव संमत करण्यात आला असून त्या ठरावातील परिच्छेद ३ (तीन) पुढीलप्रमाणे आहे :-

"**तीन : विधिमय मार्गाने प्रश्न सुटू शकतात याची माहिती देणारे विशेषांक** : गेल्या काही वर्षामध्ये असे आढळून आलेले आहे की, संचालक, सहसंचालक उच्च शिक्षण विभाग व खुद्द उच्च शिक्षण विभाग यामध्ये लाचलुचपतीची प्रकरणे फार मोठ्या प्रमाणात वाढलेली आहेत. प्रत्यक्ष लाचलुचपत करतांना भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागाने पकडलेल्या अधिकाऱ्यांची संख्या ही डोळ्यात भरण्यासारखी असली तरी न पकडल्या गेलेल्या अधिकाऱ्यांची संख्यासुद्धा बरीच मोठी आहे. अशा परिस्थितीमध्ये भ्रष्टाचारी मार्गाचा वापर न करता निर्धारपूर्वक विधिमय मार्गानेच आपला प्रश्न सुटला पाहिजे यासाठी कष्टपूर्वक प्रयत्न करणाऱ्या शिक्षकांची संख्या सुद्धा आज अभिमान वाटावा अशी आहे. संघटनेने सुद्धा याबावतीत ठामपणे धोरणात्मक निर्णय घेतले असून त्याची दृढतापूर्वक अंमलबजावणी करण्यात येत आहे. विधिमय मार्गाने सुटलेल्या अशा प्रश्नांविषयीचे विशेषांक प्रकाशित करणे हा नुटा बुलेटीन सुवर्ण महोत्सवी विशेषांक मालिकेचा एक महत्त्वाचा भाग असेल."

प्रा.पराग भालचंद्र यांनी त्यांच्या पत्रात "लोकांचे प्रश्न खूप वाढले आहेत. समस्या, G.R., आदेश, निर्णय, Red Tapeism, हितसंबंध या सगळ्यांनी जीवन हैराण झाले आहे. समाधान, शांतता, कामाचा आनंद या सर्वांचा विसर पडला असून संघर्ष, दगदग, मंत्रालयाचे उंबरे झिजविणे असेच काहीतरी सुरू झाले आहे." या शब्दात हीच भावना व्यक्त केलेली आहे. **(सहपत्र : १२)**

**६०.** या सुवर्ण महोत्सवी वर्षातील नुटा बुलेटीनच्या विशेषांक मालिकेत विधिमय मार्गांनी प्रश्न सोडविण्याचे एक उदाहरण म्हणून "**संगणकशास्त्र या विषयाला दिल्या जाणाऱ्या भेदभावपूर्ण वागणुकीचे निर्मूलन - विशेषांक**" काढण्याचे ठरविले आहे. सन २०२५ मध्ये काढण्यात येणाऱ्या मालिकेतील हा दुसरा विशेषांक आहे. अशा प्रकारची विशेषांक मालिका प्रकाशित करणे यासाठी फार मोठ्या अर्थबळाची गरज असते. त्याबाबतचा विचारसुद्धा आमसभेने केलेला असून आमसभेच्या उपरोक्त ठरावाच्या परिच्छेद ५ मधील उपपरिच्छेद (i) व (ii) पुढीलप्रमाणे आहे. :-

"**५. विशेषांक मालिकेच्या प्रकाशनासाठीच्या अर्थबळ उभारणीचा प्रश्न :** अशा प्रकारच्या विशेषांक मालिकेच्या प्रकाशनामध्ये फार मोठ्या अर्थबळाची गरज असते.

**(i)** रजत जयंती महोत्सवी विशेषांक मालिकेच्या प्रकाशनाच्यावेळी प्रत्येक शिक्षकाने आपला अल्पसा स्वेच्छाधीन सहभाग त्यावेळेला या कामासाठी उपलब्ध करून दिला होता. त्यासाठी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी दौऱ्यांचे आयोजन केले होते व अशा स्वेच्छाधीन सहभागाची विनंती करून अर्थबळ उभे केले होते. असा स्वेच्छाधीन सहभाग देणाऱ्या शिक्षकांची नावे त्यावेळेला नुटा बुलेटीनमध्ये प्रकाशित करण्यात आली होती. सुवर्ण महोत्सवी विशेषांक मालिकेसाठी सुद्धा किमान दोन हजार रुपयांचा (२०००/- रूपये) स्वेच्छाधीन सहभाग शिक्षकांनी द्यावा अशी विनंती करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.

**(ii)** विधिमय मार्गाचा वापर करून ज्या व्यक्तींचे प्रश्न सुटलेले आहेत त्यांनी असा विशेषांक प्रकाशित करण्यासाठीच्या अर्थबळ उभारणीमध्ये स्वेच्छाधीन सहभाग द्यावा अशी विनंती करण्याचा निर्णय सुद्धा घेण्यात येत आहे."

मुळात हा स्वेच्छाधीन सहभाग आहे. हा सहभाग संघटित करण्याची जबाबदारी संगणकशास्त्र अनुदान कृती समितीच्या सदस्यांकडे मी सोपवित आहे. नुटाचे अध्यक्ष डॉ.प्रवीण रघुवंशी यांच्याशी चर्चा करून या कामाची घडी त्यांना बसविता येईल.

**६१. अतिशय महत्त्वाचा प्रश्न :** विज्ञान शाखेमध्ये इतर सर्व शिक्षकांना १०० टक्के वेतन अनुदान लागू असणार मात्र आपल्याला ते अजिबात लागू नसणार. १०० टक्के वेतन अनुदान नसल्यामुळे तद्नुषंगिक इतर लाभ जसे की, निवृत्तीवेतन व्यवस्था, वैद्यकीय सुविधा, रजा प्रवास सवलत इत्यादी सुविधांपासून १०० टक्के वंचित रहावे लागणार हा विचार केला तर हा प्रश्न अतिशय महत्त्वाचा प्रश्न होता असे म्हणता येईल. **प्रश्न सोडविण्याचा सर्वात हुकमी मार्ग उपलब्ध नाही :** देशभरातील कामगार आणि शिक्षकांच्या चळवळीचा अभ्यास करणाऱ्यांच्या हे चटकन लक्षात येईल की, अन्याय दूर करण्यासाठीचा हुकमी मार्ग म्हणजे आंदोलन. या शिक्षकांना हा मार्गसुद्धा उपलब्ध नव्हता. कारण संपूर्ण महाराष्ट्रामध्ये या शिक्षकांची संख्या ही शे-पाचशेच्या घरात होती. शिवाय हे सर्व शिक्षक निरनिराळ्या विद्यापीठांमध्ये विखुरलेले. त्यामुळेच आंदोलनाचा मार्ग वापरणे ही जवळ जवळ अशक्य गोष्ट होती. या बाबी लक्षात घेऊन संगणकशास्त्र अनुदान कृती समितीच्या नेतृत्वाखाली हे शिक्षक एकत्र आलेत व उपलब्ध असलेल्या अन्य विधिमय मार्गांचा वापर करून हा प्रश्न मार्गी लावण्यात ते यशस्वी झाले. या संगणकशास्त्र अनुदान कृती समितीचे पदाधिकारी सर्वश्री प्रा.पराग भालचंद्र, प्रा.चंद्रशेखर सावरकर, प्राचार्य श्रीकांत देशपांडे, श्री.नानासाहेब चिमणपूरे प्रा.संजय घुले, प्रा.वैभव पाठक, प्रा.अच्युत मुळजकर, प्रा.नरेंद्र जाठे, प्रा.दिनेश सातंगे, प्रा.लक्ष्मीधर मुळे, प्रा.दिपक पाटील, प्रा.आर.पी.वैद्य यांचे त्याबद्दल मी मनापासून अभिनंदन करतो.

*****

## नुटा बुलेटीनची सुवर्ण महोत्सवी विशेषांक मालिका
## विशेषांक दुसरा

# NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

[B.P.T.A.Regn.No.F-1564 & Soc. Regn.- Act Regn.No.MAH/15/73(NGP]
**PROF.P.B.RAGHUWANSHI,** *President NUTA,*
Buty Plot, Near Mahajan wadi, Rajapeth, Amravati-444 601 Mob. No. 9422155603

**To,**

**(1)** The Chief Secretary, State of Maharashtra, Mantralaya, Mumbai-32. **(2)** The Principal Secretary Higher and Technical Education Government of Maharashtra, Mantralaya, Mumbai-32. **(3)** The Director of Higher Education, Administrative Building, Shivaji Nagar, Pune. **(4)** The Joint Director of Higher Education, Amravati Division, Amravati. **(5)** The Joint Director of Higher Education, Nagpur Division, Nagpur.

**Sub:** to release and pay difference of the gratuity amount to teachers retired on 01.01.2016 and onwards.

**Ref:** Govt. Resolution dated 10.10.2024.

**Applicant:** Nagpur University Teacher's Association (NUTA), Through Its President Shri Pravin Balisingh Raghuwanshi.

**Sir,**

**1.** That the applicant Nagpur University Teacher's Association (NUTA) is the registered Association of Teachers having registration no. F-1564 under the Bombay Public Trust Act and Mah-1573 (Ngp) under Societies Registration Act with aims to works for the rights and welfares of its members. The issue concern here is in respect of members of the Association who were the full-time approved teachers retired on and after 01.01.2016 and had served at different aided Colleges which were/are affiliated to Non-Agricultural Universities.

**2.** That ceiling on gratuity was increased from time to time by the State Govt.. That as per the Central Govt., the State of Maharashtra decided and agreed to raise maximum limit of gratuity from 14 lakh to 20 lakh by issuing the above referred GR dated 10.10.2024.

**3.** That the grievance of the applicant association is against the cutoff date fixed in this GR i.e. 01.09.2024 for raising the gratuity. As per this GR it will be applicable to teachers who retired after 01.09.2024. In fact, it should be appliable to all the employees who are retired from 01.01.2016 and onwards,otherwise it will be a discrimination between the pensioners which is arbitrary and unconstitutional.

**4.** That the similar issue was earlier arose in the State while gratuity was enhanced from Rs.5 Lacs to Rs.7 Lacs. But the effective date for the benefit of enhanced gratuity was mentioned as 01.09.2009. Being aggrieved by this illegal cutoff date, several petitions were filed at that relevant time by the teachers and organizations challenging this cutoff date as unconstitutional.

**5.** That matter went upto the Hon'ble Supreme Court in S.L.P.(C) No.3700/2012. That, the Hon'ble Supreme Court after considering the G.R's. dated 05.05.2009 and 21.08.2009 was pleased to allow the S.L.P. of employees' organization by judgment dated 30.01.2013 and directed the respondent State of Maharashtra to pay the difference of gratuity in terms of G.R. dated 21.08.2009 to the employees like the petitioners therein within 3 months from the date of receipt of the above judgment.

**6.** That the benefit of gratuity was and is made applicable to all those employees of Universities and Affiliated Non-Government Colleges to whom the Pension Scheme under the Maharashtra Civil Services Pension Rules, 1982. Admittedly it is applicable to the employees who retired on 01.01.2016 onwards and who retired on 01.09.2024 and onwards and admittedly there is no separate law for pensioners retired at different time. Hence, there should not be any discrimination between them as they both have constituted one class as pensioners.

**7.** That, as once the Hon'ble Apex Court had decided the similar issue and held that the petitioners therein and other similarly situated employees are entitled for the enhanced benefits of gratuity, the State Govt. are not justified in refusing these benefits by giving irrational date of implementation. Their act of not releasing the difference amounts to all the employees who retired on 01.01.2016 and onwards is in violation of the Fundamental Rights as guaranteed under Articles 14, 19 and 21 of the Constitution of India. In fact, the above act of the State fixing the cutoff date amounts to contempt of the Hon'ble Supreme Court.

**8.** That the teachers are retired employees and in the advance stage of their life and governed by the common law. Most of them are ailing from the old age-related ailments, the provision for gratuity and pension is being made so that a retired employee should not be in harness after his retirement. If no positive action is taken for the applicability of scheme to all the pensioners who retired from 01.01.2016 and onwards, it will be resulted into defeating the above pious principle, therefore the cutoff date i.e. 01.09.2024 mentioned in GR dated 10.10.2024 as stated for implementing the scheme should be removed in the interest of justice.

**9.** Hence in view of the above facts and considering the legal position, it is requested from your good authorities to extend the benefits ofraising of gratuity amount of Rs.20 Lakh as refer in GR dated 10.10.2024 to all the teachers who retired on and after 01.01.2016 and pay the difference of the gratuity amount in their favour as early as possible and in the interest of justice.

Hence this representation.

Yours Faithfully,
President,
Nagpur University Teacher's
Association (NUTA),

Amravati.

**Date: 22.11.2024**

**Encl:** Govt. Resolution dated 10.10.2024.

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Dr. Prakash Tayade , 55, "Aai" Dr. Punjabrao Deshmukh Colony, Near V.M.V. Campus, Amravati 444 604 Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. AMT/RNP/78/2024-26 (Uploaded on www.nuta.in on 08.01.2025) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 15.01.2025**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

---

To,.......................................................................

.............................................................................

.............................................................................

.............................................................................